जुलै २०१४/ पाने ६०/ किंमत ₹ १०

# लोकराज्य




सर्वांत पुढे महाराष्ट्र माझा

# मेट्रो : मुंबईचे भूषण

**मंबईच्या परिवहन व्यवस्थेत क्रांतिकारक परिवर्तन घडवून आणणाऱ्या मेट्रो रेल्वेचे स्वप्न पूर्ण झाले आहे. सुरक्षित, जलद आणि आरामदायी प्रवासाचा अनुभव देणारी मेट्रो मुंबईकरांच्या सेवेत दाखल झाली आहे. आधुनिकतेच्या दिशेने महाराष्ट्राची वाटचाल वेगाने होत आहे. मेट्रो हे त्याचेच प्रतीक.**



वर्ष ६६ वे | अंक २ | जुलै २०१४

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

# लोकराज्य

## संपादन

- अतिथी संपादक मनीषा पाटणकर-म्हैसकर
- मुख्य संपादक प्रल्हाद जाधव
- संपादक सुरेश वांदिले
- सहसंपादक किरण केंद्रे

## प्रशासन

- प्रशासन व वितरण अधिकारी दिगंबर पालवे
- वितरण अधिकारी विलास बोडके
- साहाय्य विद्या कदम

## मांडणी

- मांडणी, सजावट संदीप पवार
- मुद्रण एच.टी. मीडिया लि. दिघे, नवी मुंबई



## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, दालन क्र. ३३, तळ मजला, मंत्रालय, मुंबई-३२. संपादकीय संपर्क : ०२२-२२६२२२१६
email : lokrajya2011@gmail.com

## वितरण आणि वर्गणीदार

वर्गणीदार व तक्रार निवारण - ०२२-२२०२१५३०
वितरण - ०२२-२२६१६९७६
email : lokvitaran@dgipr.maharashtra.gov.in
lokrajyavitaran@gmail.com

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in


# अंतरंग



## मजबूत पायाभरणी...

राज्यातील पायाभूत सुविधा उभारण्यास अग्रक्रम देण्यात आला. त्यादृष्टीने गतिमान दळणवळण, उर्जेचा अखंडित पुरवठा, वेगवान संपर्क जाळे, मुंबईचा मेकओव्हर, समतोल नागरीकरण, मागास भागांचा विकास, परवडणाऱ्या घरांची उभारणी अशा प्रयत्नांमुळे महाराष्ट्र सर्वाधिक सक्षम व उद्योगस्नेही राज्य झाले आहे. ६

## अग्रेसर महाराष्ट्र



महाराष्ट्राच्या विकासासाठी रस्ते, वीज, उद्योग, पर्यावरण, पर्यटनासारख्या क्षेत्रात परिवर्तन घडवण्यात यश आले आहे. भारनियमनातून मुक्तता होत आहे. विकासाची चाके गतिमान करणाऱ्या रस्त्यांचे प्रभावी जाळे विणले गेले आहे. सांगताहेत उपमुख्यमंत्री अजित पवार.... ९

## भारनियमनमुक्तीकडे यशस्वी वाटचाल



राज्यातील भारनियमनाच्या समस्येवर मात करण्यासाठी सिंगल फेजिंग व गावठाणांसाठी स्वतंत्र फिडर्स या अल्पकालीन व विद्युत निर्मितीची क्षमतावाढ, २५-२५ वर्षांचे वीजखरेदी करार अशा दीर्घकालीन नियोजनामुळे संपूर्ण भारनियमनमुक्तीकडे महाराष्ट्राची वाटचाल सुरू आहे. १३



## गतिमान आणि ग्लोबल

आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर म्हणून जागतिक स्तरावर मुंबईची नवी ओळख निर्माण करण्यासाठी शासनाने गेल्या काही वर्षांत केलेल्या सुनियोजित, ठोस आणि परिणामकारक उपाययोजनांचे दृष्य परिणाम आता दिसू लागले आहेत. १८

## गुंतवणुकीत अग्रेसर, रोजगारात आघाडी



नवीन औद्योगिक धोरणे, विशाल प्रकल्प धोरण, ॲडव्हँटेज विदर्भ, विशेष आर्थिक क्षेत्र, दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर प्रकल्प यामुळे राज्याने औद्योगिक क्षेत्रातील घोडदौड कायम राखली आहे. थेट परकीय गुंतवणुकीमध्ये देशात अग्रेसर असलेल्या महाराष्ट्राने रोजगार निर्मितीला प्राधान्य दिले आहे. २३

## वस्त्रोद्योग - समृद्धीची नवी संधी



उत्पादित होणाऱ्या कापसावर राज्यातच प्रक्रिया व्हावी या दृष्टीने वस्त्रोद्योग धोरण आखण्यात आले. या धोरणाच्या माध्यमातून येत्या पाच वर्षात मोठी गुंतवणूक अपेक्षित आहे. त्यामुळे असंख्य नवे रोजगार निर्माण होतील. शेतकऱ्यांच्या कापसालाही २६

## पारदर्शक, अत्याधुनिक आणि गतिमान

नागरिकांच्या विविध प्रकरणांची हाताळणी तात्काळ आणि प्रभावी पद्धतीने व्हावी, यासाठी महसूल प्रशासन अधिक गतीमान आणि पारदर्शक झाले आहे.



४५




## महा-आयटी -राष्ट्र

प्रशासनात गतिमानता आणि पारदर्शकता आणण्यासाठी शासनाने ई-प्रशासन धोरण तयार केले. अशा प्रकारचे धोरण बनविणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य आहे. ४२

## याशिवाय


शाश्वत ऊर्जा ...१६
उत्कृष्ट रस्ते : बदलता महाराष्ट्र ... २८
सर्वांसाठी निवारा ... ३०
वनांचा समृद्ध वारसा ... ३६


श्रद्धांजली



ज्येष्ठ नेते स्व. गोपीनाथ मुंडे यांचा जीवनपट
**संघर्षयात्री**




**प्रेरणादायी यशकथा**

मे महिन्याचा 'फुलणारे हसू, घडणारा महाराष्ट्र' हा अंक वाचून खूप आनंद झाला. महाराष्ट्र विविध क्षेत्रात देशात आघाडीवर आहे, याचा आम्हाला नेहमीच अभिमान वाटतो. सामाजिक क्षेत्रात आपण खूप प्रगती केल्याचे अंक वाचून लक्षात येते. लोकराज्यमुळे विकासविषयक नवनवीन घडामोडी कळत असतात. या अंकातील यशकथा तर प्रेरणादायी अशाच आहेत. गरीब घरची मुलगी स्कॉलरशीपचा आधार घेत परदेशात जाऊन डॉक्टर होते ही अभिमानाची बाब आहे. अशा यशकथा महाराष्ट्रात सदैव घडत राहो, ही सदिच्छा!

**– विलास पाटील,**

**नव्या महाराष्ट्राची नांदी**

जून महिन्याचा लोकराज्य वाचून मनाला आनंद झाला. राज्य शासनाच्या विवधि योजनांच्या माध्यमातून महाराष्ट्राचा होत असलेला सर्वसमावेशक विकास दिलासा देणारा आहे. सामान्य माणसासाठी शासन करीत असलेले प्रयत्न कौतुकास्पद आहेत. पाणी, वीज, शिक्षण, आरोग्य, अन्नसुरक्षा याबाबतीत अनेक नावीन्यपूर्ण योजना राबविल्या जात आहेत. नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करीत आपली वाटचाल आधुनिक महाराष्ट्राकडे होत आहे. नव्या महाराष्ट्राची ही नांदी आहे, असे म्हणावे वाटते.

**– सुजीत फाळके**

**मार्गदर्शक**

दर महिन्याला आम्ही लोकराज्यची आवर्जून वाट पाहत असतो. प्रत्येक वेळी नवा विषय आमच्या ज्ञानात भर टाकत जातो. शासकीय पातळीवरील अनेक घटना, घडामोडी, महत्त्वाचे निर्णय याविषयी माहिती मिळते. नवनवीन योजना कळतात. यामुळे लोकराज्य आम्हाला नेहमीच मार्गदर्शक वाटत आला आहे.

**– प्रशांत वाघमारे**, विजयनगर, नांदेड

**वाचनीय**

'लोकराज्य' मासिकात अतिशय चांगल्या प्रकारचे लेख प्रकाशित होतात. यातील माहिती वाचनीय असते.

**– दिनेश एकनाथ नलावडे**,रायगड

**लोकराज्य : एक दीपस्तंभ**

लोकराज्य हे स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या ग्रामीण भागातील तरुणांसाठी वरदान आहे. विविध क्षेत्रात होणारी राज्याची प्रगती, शासकीय योजना, ग्रामीण भागाचा वेगाने बदलणारा चेहरा ह्या सर्व बाबींची इत्यंभूत माहिती आम्हाला लोकराज्यमुळे मिळते. लोकराज्य हा महाराष्ट्राच्या प्रगतीचा आरसा आहे. प्रत्येक अंकाची आम्ही उत्सुकतेने वाट पाहत असतो. लोकराज्य माहितीचा महासागर तर आहेच, पण आमच्यासाठी दीपस्तंभदेखील आहे.

**– सचिन मोरे,** गोवर्धन, वाशीम

**प्रतिक्रियांचे स्वागत**

लोकराज्य हे महाराष्ट्राच्या जनतेचे हक्काचे व्यासपीठ आहे. प्रत्येक अंकात अधिकाधिक उपयुक्त माहिती आकर्षक स्वरूपात देण्यात येते. या अंकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया अवश्य पाठवा. या प्रतिक्रियांची योग्य ती दखल घेण्यात येईल.

**पत्ता :** संपादक, लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, पाचवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, नवीन मंत्रालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई–४०० ००१

## वार्षिक वर्गणी

**वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई–४०००२१ या पत्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वटणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००)**

'लोकराज्य'मधील लेखांचे पुनर्मुद्रण केल्यास आम्हाला आनंदच होईल...

लोकराज्यची वर्गणी ऑनलाईन भरण्यासाठी

http:``dgipr.maharashtra.gov.in

अतिथी संपादकीय

# सर्वांत पुढे महाराष्ट्र माझा



सामाजिक जीवनात उच्चपदावर पोहचलेल्या व्यक्तींची अनेक वैशिष्ट्ये असतात. मनाचा उमदेपणा आणि निर्मळतेने दाद देण्याचे अशा व्यक्तीचे वैशिष्ट्य आपल्या कायम लक्षात राहते. महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री आणि केंद्रीय ग्राम विकासमंत्री स्व. गोपीनाथजी मुंडे यांच्या संदर्भातील अनेक आठवणी सांगता येतील. पण लोकराज्यच्या संदर्भातील एक आठवण माझ्या मनात कायम राहिली आहे.

मुंबई महापालिकेमध्ये मी कार्यरत असताना एकदा गोपीनाथजी भेटले. त्यावेळी त्यांनी आवर्जून लोकराज्यची आठवण काढली. न्यू लूक लोकराज्यची उत्कृष्टता, गावपातळीपर्यंत लोकराज्यची पोहच, शासनाच्या विविध विकास कामांची लोकराज्यमधून होणारी सचित्र प्रभावी मांडणी याचा त्यांनी उल्लेख केला आणि मनापासून कौतुक केले. न्यू लूक लोकराज्यच्या निर्मितीसाठी प्रारंभीच्या काळात टीम लोकराज्यने खूप परिश्रम घेऊन लोकराज्य अधिक आकर्षक, दर्जेदार आणि वाचनीय बनवले. शासनाच्या विविध योजना आणि निर्णयांना अतिशय प्रभावीपणे जनसामान्यांपर्यंत पोहचवले. गोपीनाथजींची ही कौतुकाने भारलेली प्रतिक्रिया जेव्हा मी टीम लोकराज्यला सांगितली तेव्हा सर्वांचा उत्साह द्विगुणित झाला. टीम लोकराज्यच्या वतीने स्व. गोपीनाथजींना भावपूर्ण श्रध्दांजली!

'फुलणारे हसू घडणारा महाराष्ट्र' ही थीम घेऊन प्रकाशित झालेल्या जून २०१४ च्या लोकराज्यबद्दल अतिशय चांगल्या प्रतिक्रिया मिळाल्या. सर्वसामान्यांना समाधान, आनंद मिळावे आणि त्यांना उत्तम व दर्जेदार आयुष्य जगण्याची संधी मिळावी, हाच शासनाच्या योजना आणि निर्णयांचा मुख्य हेतू असतो. तो हेतू साध्य होत असल्याचे व्यक्तिगत लाभार्थ्यांच्या उदाहरणांवरून दिसून येते.

जूनच्या अंकात सामाजिक क्षेत्राचा सविस्तर आढावा घेतल्यानंतर जुलैच्या अंकात महाराष्ट्राच्या पायाभूत सुविधांच्या विकासाच्या विविध पैलूंचा ऊहापोह केला आहे. महाराष्ट्राचा २०१४-२०१५ चा अतिरिक्त अर्थसंकल्प यावर भर देणारा आहे. महाराष्ट्र हे थेट परकीय गुंतवणुकीत देशात आघाडीवर असलेले राज्य आहे. याचे मुख्य कारण म्हणजे आपल्या राज्यात उत्तम रस्ते, वीज, पाण्याची उपलब्धता, सुरक्षा असल्यानेच हे शक्य होऊ शकते. या गुंतवणुकीतून औद्योगिक प्रकल्प राज्याच्या वेगवेगळ्या भागांमध्ये स्थापित होतात. त्यातून रोजगार-स्वयंरोजगाराला गती मिळते. रस्त्यांच्या चौपदरीकरणामुळेही ग्रामीण भाग मुख्य शहरांशी जोडला गेला आहे. प्रगती आणि विकासाच्या नव्या संधींची निर्मिती यामुळे झाली आहे. विजेचे भारनियमन कमी करण्याच्या शासनाच्या प्रयत्नांना यश आल्याने साधारणतः ८५ टक्क्यांहून भागात अखंडित वीज मिळू लागली आहे. व्यापारी, उद्योजक, लहान व्यावसायिक, बँका यांच्या दैनंदिन व्यवहारात चांगला प्रभाव पडून नवे चैतन्य निर्माण झाल्याची अकोला शहरातील यशकथा मन उल्हसित करणारी आहे.

या अंकात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांचे याच अनुषंगाने लिहिलेले लेख 'समृद्ध, सुरक्षित आणि सुसंस्कृत' महाराष्ट्राच्या प्रगतीवर नवा प्रकाश टाकतात. अर्थसंकल्पातील ठळक मुद्दे, विविध क्षेत्रातील यशकथा हे या अंकाचे वैशिष्ट्य आहे.

आमच्या दिलखुलास या कार्यक्रमाने लोकप्रियतेचा नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. गेली सात वर्षे सोमवार ते शनिवार आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत प्रसारित होणाऱ्या या कार्यक्रमाने २००० भागांचा टप्पा गाठला आहे. इतका प्रदीर्घ काळ सुरू असणारा हा एकमेव कार्यक्रम आहे. विविध लोकोपयोगी कार्यक्रमांमुळे 'दिलखुलास' शासन आणि जनता यामधील दरी दूर करण्यात यशस्वी झाला आहे.

लोकराज्यच्या इतर अंकांप्रमाणेच हाही अंक आमच्या वाचकांना आवडेल अशी आशा आहे.

**मनीषा पाटणकर-म्हैसकर**
सचिव
(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)

# मजबूत पायाभरणी...

राज्याची धुरा हाती घेतल्यावर पायाभूत सुविधा उभारण्यास अग्रक्रम देण्याचा माझा संकल्प होता. त्यादृष्टीने उद्योग आणि शेतीसह नागरिकांना पुरेसे पिण्याचे पाणी , गतिमान दळणवळण, उर्जेचा अखंडित पुरवठा, वेगवान संपर्क जाळे, मुंबईचा मेकओव्हर, समतोल नागरीकरण, विकासाच्या विकेंद्रीकरणासह मागास भागांचा विकास, परवडणाऱ्या घरांची उभारणी अशा प्रयत्नांमुळे महाराष्ट्र सर्वाधिक सक्षम व उद्योगस्नेही राज्य झाले आहे.

**देशातील सर्वाधिक थेट परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात झाली आहे. सर्वाधिक विशेष आर्थिक विभाग राज्यात आहेत. एकाच पट्ट्यात केंद्रित झालेल्या विकासामुळे निर्माण होणारी विषमता टाळण्यासाठी नागपूर, नाशिक व औरंगाबाद अशी नवी विकासकेंद्रे घडवण्यात येत आहेत.**

महाराष्ट्राची प्रगती समतोल आहे. तिला जनकल्याणाचा मानवी चेहरा असल्याने ती समाजातल्या शेवटच्या माणसाचे जीवनमान बदलण्यातही यशस्वी ठरली आहे.

**मुंबईचा विकास**

पाश्चात्य देशात सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अतिशय प्रभावी असल्याने तेथील शहरांवर फारसा ताण येत नाही. मात्र मुंबईचे तुलनेने कमी असलेले क्षेत्रफळ व त्यावरील मोठ्या लोकसंख्येचा ताण याचा शहरावर प्रतिकूल परिणाम होत आहे. अशा परिस्थितीतही मुंबईच्या परिवहन क्षेत्रात जे परिवर्तन शासनाने आणले आहे, त्याचे वर्णन क्रांती असेच होऊ शकेल.

देशातील वैशिष्ट्यपूर्ण पहिली मोनो रेल्वे चेंबूर- वडाळा मार्गावर धावू लागली आहे. दुसरा टप्पा ऑगस्ट २०१५ पर्यंत पूर्ण होणार आहे. वर्सोवा-घाटकोपर मेट्रोच्या रूपाने मुंबई आता देशाच्या मेट्रो सुविधेच्या नकाशावर आले आहे. मोनो-मेट्रोच्या उपलब्धीमुळे मुंबईची पश्चिम व पूर्व उपनगरे जोडणारा मोठा दुवा कार्यान्वित झाला आहे.

यासोबत १७ उड्डाणपूल, ३६ स्कायवॉक खुले झाले असून १२ नवे मार्ग, पश्चिम

**"औद्योगिक विकासात महाराष्ट्राचे देशात अव्वल स्थान आहे. गेल्या पाच वर्षात येथील वाढीचा दर ८.६ टक्के आहे. राज्याच्या आर्थिक विकासाचा वेग वाढवण्यासाठी मजबूत पायाभूत सुविधांच्या निर्मितीवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने सुस्पष्ट धोरणे आखून त्याची काटेकोर अंमलबजावणी केली जात आहे. शाश्वत विकासाचा पाया पायाभूत सुविधाच घालतात हे जाणून त्यावर सरकारने भर दिला आहे." सांगताहेत, मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण**





## वीजनिर्मितीला प्राधान्य

महाजेनकोने ११ व्या योजनेच्या काळात २,५०० मेगावॅट औष्णिक ऊर्जा वाढविण्यासह ३ हजार २३० मेगावॅट ऊर्जा प्रकल्पांचे काम सुरू केले आहे. याशिवाय ३ हजार ९५० मेगावॅट औष्णिक ऊर्जानिर्मिती प्रकल्पांसाठी भूसंपादन सुरू झाले आहे. विजेच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी ११ हजार कोटींची योजना राबविल्याने त्याचा मोठा परिणाम दिसून येत आहे. महाजेनकोची २००७-०८ मध्ये असणारी वितरण हानी २४.०९ टक्क्यांवरुन २०१२-१३ मध्ये १४.६७ टक्क्यांवर कमी करण्यात आली आहे. तसेच वीज देयकांच्या वसुलीत ९७ ते ९८ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे.

**भारनियमनमुक्तीच्या दिशेने**

महाजेनकोकडून क्षमतावृद्धीचे विविध प्रकल्प राबविण्यात येत असून यामुळे राज्य ८२ टक्के भारनियमनमुक्त झाले आहे. त्यासोबतच राज्यातील विजेच्या दरात २० टक्के कपात केल्याने ग्राहकांना दिलासा मिळाला आहे. गेल्या पाच वर्षांमध्ये विजेची मागणी व पुरवठा यातील तफावत १८ टक्क्यांवरुन ३ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात यश आल्याने महाराष्ट्राची भारनियमनमुक्तीच्या दिशेने वाटचाल सुरू झाली आहे.

केवळ शहरी भागासाठी नव्हे तर ग्रामीण भागातही ऊर्जा पोहोचवण्याचे शासनाचे प्रयत्न यशस्वी होत आहेत. त्या दृष्टीने केलेल्या कार्यवाहींतर्गत राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनमध्ये ४७०९ खेड्यांचे विद्युतीकरण झाले आहे.

द्रुतगती मार्ग व पूर्व द्रुतगती मार्गाचे काम पूर्ण झाले आहे. त्यातील पूर्व मुक्त मार्गाचे दोन टप्पे वाहतूकीसाठी खुलेही झाले आहेत. यामुळे मुंबईतील जीवनमान गतिमान आणि सुलभ झाले आहे. भविष्यात कुलाबा-वांद्रे सीप्झ मेट्रो रेल कॉरिडॉर, विरार-अलिबाग कॉरिडॉर, मुंबई ट्रान्स-हार्बर लिंक, विस्तारित मुंबई-उरण पायाभूत प्रकल्पांतर्गत २७५ किलोमीटरहून अधिक लांबीच्या रस्त्यांचा विकास यामुळे मुंबईच्या विकासाचे नवे पर्व सुरू होणार आहे.

**विकासाचा नवा महामार्ग**

दिल्ली- मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉरमुळे राज्यातील बऱ्याच मोठ्या क्षेत्राच्या विकासास गती मिळणार आहे. राज्यातील १८ टक्के क्षेत्र या प्रकल्पाच्या प्रभावक्षेत्रात असून पहिल्या टप्प्यातील ७१ हजार ४५१ कोटी रुपयांच्या प्रकल्पांना सुरुवात झाली आहे. या प्रकल्पाच्या अनुषंगाने औरंगाबाद-नाशिक द्रुतगती मार्ग, कराड-संगमेश्वर बोगदा, शेंद्रा-बिडकीन पाणीपुरवठा योजना व प्रदर्शन केंद्र, लॉजिस्टिक पार्क आदींची उभारणी होणार आहे.

**रस्त्यांचे जाळे**

सागरी सेतूपासून द्रुतगती मार्गापर्यंतच्या प्रकल्पांची निर्मिती करून राज्यातील परिवहन गतिमान करण्यात आले आहे. रस्ते विकास महामंडळामार्फत नांदेड, अमरावती, नंदूरबार, सोलापूर, औरंगाबाद, पुणे आणि नागपूर येथील रस्तेविकासाची कामे हाती घेण्यात आली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत राज्यातील ४०,८६८ खेड्यांपैकी ४० हजार ५७७ म्हणजे एकूण ९९ टक्के खेडी बारमाही रस्त्याने जोडली गेली आहेत. खासगीकरणांतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ४,६९० किलोमीटर रस्ता लांबीचे १३७ प्रकल्प हाती घेण्यात आले आहे. त्यापैकी १०६ प्रकल्प पूर्ण झाले असून त्यातून २,४४७ किलोमीटर लांबीचे रस्ते वापरात आले आहेत. रस्ता चौपदरीकरणाचे काम प्रगतीप्रथावर आहे. त्यामुळे १,१६३ किमी लांबीच्या रस्त्यांचे चौपदरीकरण होणार आहे.

## हवाई दळणवळणाचे जाळे

जगाशी असणारी महाराष्ट्राची कनेक्टिव्हीटी वाढवण्यासाठी प्रभावी प्रयत्न सुरू आहेत. त्यादृष्टीने हवाई दळणवळण सुसज्ज व अत्याधुनिक करण्याच्या उद्देशाने महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हा त्यात अग्रक्रमावर आहे. या प्रकल्पाच्या उभारणीतील सर्व अडथळे दूर करण्यात आले असून त्याची आंतरराष्ट्रीय निविदाही प्रसिद्ध झाली आहे. २०१८ मध्ये हा विमानतळ कार्यान्वित होणे अपेक्षित आहे.

मुंबईतील छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळावर नव्यानेच उभारण्यात आलेल्या टी-२ टर्मिनलच्या माध्यमातून या विमानतळाची सुसज्जता लक्षणीय ठरली आहे.

राज्यातील हवाई दळणवळणाचे जाळे सर्वत्र विकसित व्हावे यासाठी राज्यातील प्रमुख शहरांमध्ये २४ नवीन विमानतळ निर्माण केले जाणार आहेत. त्यासाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडे चंद्रपूर, अमरावती, जळगाव, धुळे, फलटण, कराड आणि सोलापूर हे विमानतळ पुढील कार्यवाहीसाठी हस्तांतरित केले आहेत. शिर्डी येथे ग्रीन फिल्ड विमानतळ विकसित करण्यात येणार असून परिसरातील पर्यटनासाठी त्याची मोठी उपयुक्तता असेल. विमानतळांच्या उभारणीमुळे पायाभूत सुविधांचे जाळे अधिक वेगवान होणार असून मागास भागात येणाऱ्या औद्योगिकीकरणाची वाट अधिक सुलभ होईल. नागपूरचा मिहान प्रकल्प प्रगतिपथावर असून विदर्भाच्या विकासाचे एक महाद्वार या प्रकल्पाच्या निमित्ताने उघडले जाईल. विदर्भाला जागतिक दळणवळणाच्या नकाशावर महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त करून देण्याची क्षमता या प्रकल्पामध्ये आहे. शासन या दृष्टीने त्याच्या पूर्णत्वासाठी प्रयत्नशील आहे.



# समतोल विकास

**मुंबई-पुणे परिसरात असलेला विकासाचा केंद्रबिंदू महाराष्ट्राच्या अविकसित भागाकडे सरकावा यासाठी समतोल विकासाला प्राधान्य देण्यात येत आहे. त्यादृष्टीने काही विशिष्ट प्राधान्यक्रम ठरवले आहेत. नवे औद्योगिक धोरण जाहीर करताना त्यात मोठ्या प्रमाणावरील रोजगार पुनर्निर्माण आणि संतुलित विभागीय विकास केंद्रस्थानी ठेवण्यात आला. राज्याच्या औद्योगिक विकासाची जागतिक औद्योगिक वर्तुळात सकारात्मक दखल घेण्यात आली आहे. त्याचा दृश्य परिमाण राज्यातील वाढत्या परकीय गुंतवणुकीतून दिसत आहे.**



**समतोल पायाभूत सुविधा**

विशाल प्रकल्प धोरणांतर्गत ३.२१ लाख कोटींच्या गुंतवणुकीसहित ४०३ महाप्रकल्प मंजूर झाले असून त्यामधून ३.५७ लाख व्यक्तींना रोजगार मिळणे अपेक्षित आहे यापैकी ११४ प्रकल्पांमध्ये प्रत्यक्ष उत्पादनास सुरुवातही झाली आहे. देशातील सर्वाधिक थेट परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात आकर्षित झाली आहे. ऑगस्ट १९९१ पासून मार्च २०१२ पर्यंत ९७ हजार ७९९ कोटींच्या थेट परकीय गुंतवणुकीचे ४,२४६ प्रस्ताव राज्यात मंजूर झाले आहेत. राष्ट्रीय गुंतवणुकीत राज्याचा २३ टक्के हिस्सा असून यापैकी थेट परकीय गुंतवणूकीच्या दोन हजार प्रकल्पात रु. ४९ हजार ७७६ कोटींच्या गुंतवणुकीसह उत्पादन सुरू झाले आहे. विदर्भासह मागास भागात प्राथम्याने गुंतवणुकीसाठी पोषक-पूरक वातावरण तयार झाले आहे.

भविष्यकाळात अधिकाधिक एसईझेड (स्पेशल इकॉनॉमिक झोन) क्षेत्र अधिसूचना रद्द करण्याचा अथवा त्यातून अंग काढून घेण्याचा पर्याय निवडतील अशी शक्यता असल्याने एक सुयोग्य निर्गम (एक्झिट) धोरणाची आखणी करण्यात आली असून या योजनेखाली अधिसूचित केलेल्या एकूण औद्योगिक क्षेत्राच्या किमान ६० टक्के क्षेत्रफळ औद्योगिक विकासासाठी आणि उर्वरित ४० टक्के क्षेत्रफळ पायाभूत कामांच्या विकासासाठी वापरले जाईल. यात निवासी तसेच व्यावसायिक बांधकामे करण्यात येतील.

**समतोल नागरीकरण**

राज्यातील लहान व मध्यम शहरांच्या प्रश्नांबाबत जाणीवपूर्वक प्रयत्न करीत आहे. टाऊनशिप प्रकल्पांसाठी आकर्षक धोरण आखण्यात आले असून भाडेतत्त्वावरील गृहनिर्मितीसाठी सवलती देण्यात येत आहेत. विकास नियंत्रण नियमावलीमध्ये शासनाने सुधारणा केल्याने अत्यल्प, अल्प, मध्यम आणि उच्च उत्पन्न गटासाठी वाढीव चटईक्षेत्रासह अधिक सदनिका उपलब्ध झाल्या आहेत. १३८ तालुक्यांमध्ये नवीन नगरपंचायत आणि नगरपरिषदांची स्थापना केली आहे. मुंबईतील कोळीवाडे आणि गावठाणांच्या विकासासाठी वाढीव चटईक्षेत्राचा वापर करता येईल.

रस्ते, वीज, ऊर्जा, पाणी, जलद दळणवळण, सुविधायुक्त शहरे यासोबतच पायाभूत सुविधांना जोड असावी लागते. ती राजकीय स्थैर्य, सामाजिक स्वास्थ, प्रशासकीय गतिमानता आणि विधायक सकारात्मकतेची. या साऱ्याच दृष्टिकोनातून महाराष्ट्र परिपूर्णतेकडे वाटचाल करत आहे.

**- शब्दांकन- हेमराज बागूल**
(मुख्यमंत्र्यांचे माहिती अधिकारी)

## वस्त्रोद्योगात गुंतवणूक

राज्याच्या औद्योगिक क्षेत्रात वस्त्रोद्योग हा महत्त्वाचा व मोठा घटक आहे. त्यामुळे त्याच्या विकासासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात येत आहेत. याचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे राज्याचे वस्त्रोद्योग धोरण. या क्षेत्रात ४० हजार कोटींची नवीन गुंतवणूक आकर्षित करण्यासह २०१६-१७ पर्यंत ११ लाख नवे रोजगार निर्माण होणे अपेक्षित आहे. विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्र या भागांमध्ये विस्तार प्रकल्प आणि नव्या वस्त्रोद्योग एककांसाठी १० टक्के भांडवल सबसिडी दिली जाणार असल्याने या व्यवसायाला नवी उर्जितावस्था मिळेल. यंत्रमागाच्या उन्नतीकरणासाठी केंद्राच्या सहाय्यासोबतच राज्याचे जास्तीचे १० हजार रुपयांचे अर्थसहाय्य प्राप्त होईल. या क्षेत्रात १८०० कोटींच्या गुंतवणुकीच्या सामंजस्य करार करण्यासह केंद्र शासनपुरस्कृत योजनेंतर्गत राज्यात १४ एकात्मिक वस्त्रोद्योग पार्कांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यापैकी २०१२-१३ या आर्थिक वर्षात ८ वस्त्रोद्योग पार्कांसाठी रु. ४० कोटी मंजूर झाले आहेत.



# अग्रेसर महाराष्ट्र

राज्यातील वीजनिर्मिती क्षमता वाढीबरोबरच वीज वितरण यंत्रणेचे सक्षमीकरण करण्यात येत आहे. त्यासाठी ११ हजार कोटी रुपयांचा पायाभूत आराखडा प्रकल्पाचा पहिला टप्पा यशस्वीरीत्या राबविला गेला आहे. ६,५०० कोटीच्या दुसऱ्या टप्प्याचे काम सध्या सुरू आहे. भुसावळ आणि खापरखेडा येथील औष्णिक वीज प्रकल्पांची क्षमता १,५०० मेगावॅटने वाढवण्यात यश आले आहे. चंद्रपूर येथे ५०० मेगावॅटचे दोन संच आणि कोराडी येथील अत्याधुनिक सुपर क्रिटिकल तंत्रज्ञानावर आधारित ६६० मेगावॅट क्षमतेचे तीन संच तसेच परळी येथे २५० मेगावॅटचा संच क्रमांक ८ उभारणीचे काम वेगाने सुरू आहे. भुसावळ येथे ६६० मेगावॅट क्षमतेचा आणखी एक संच उभारण्यात येणार आहे. गेल्यावर्षी साक्री तालुक्यात (जि.धुळे) १२५ मेगावॅट सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यात आला. एकाजागी उभारण्यात आलेला आशियातील हा एकमेव महाकाय सौरऊर्जा प्रकल्प आहे.

**भारनियमनमुक्त महाराष्ट्र**

विविध उपाययोजनांमुळे वीज टंचाईवर आपण मात केल्याने भारनियमनापासून आपण मुक्तता मिळविण्याकडे. २५ औद्योगिक वसाहतींमध्ये २४ तास सेवा देणारी 'ब्रेकडाऊन अटेंडिंग व्हॅन' उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

गेल्या ५ वर्षात १० लाख कृषिपंपांना वीज जोडण्या देण्यात आल्या. सर्व जोडण्या ऑनलाइन पद्धतीने आणि एका पानाच्या सुटसुटीत अर्जाच्या आधारे देण्यात येतात. वीज बिल भरण्याची ऑनलाइन सुविधाही महावितरणने उपलब्ध करून दिली आहे. एसएमएसद्वारे ग्राहक वीज बिलाचा भरणा करू शकतात. वीज ग्राहकांच्या तक्रारींची २४ तास नोंद घेतली जाते.

**उद्योगांना प्रोत्साहन**

औद्योगिक गुंतवणुकीतील महाराष्ट्राचे अग्रस्थान कायम राखण्यासाठी राज्य शासनाने गेल्यावर्षी 'महाराष्ट्र औद्योगिक धोरण' जाहीर केले. औद्योगिकदृष्ट्या मागास भागात गुंतवणुकीस चालना देण्याचा प्रयत्न या धोरणाच्या माध्यमातून केला जात आहे.

राज्यात होणाऱ्या संपूर्ण कापसावर 'कापूस ते तयार वस्त्रनिर्मिती'च्या विविध स्तरावरील प्रक्रिया स्थानिकरीत्याच व्हाव्यात म्हणून वस्त्रोद्योग धोरण जाहीर केले आहे.

**''महाराष्ट्राच्या विकासासाठी रस्ते, वीज, उद्योग, पर्यावरण, पर्यटनासारख्या क्षेत्रात परिवर्तन घडवण्यात यश आले आहे. विकासाची चाके गतिमान करणाऱ्या रस्त्यांचे प्रभावी जाळे विणले गेले आहे. शहरांचा चेहरा-मोहरा बदलला आहे. ई-प्रशासनासारख्या उपायांनी पारदर्शकतेवर भर देण्यात आला आहे. औद्योगिक विकास साधताना कामगारांच्या कल्याणावरही लक्ष केंद्रित करण्यात आले आहे,'' सांगताहेत उपमुख्यमंत्री अजित पवार....**

पर्यटन स्थळांच्या गतिमान विकासावर भर देण्यात आला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात सी वर्ल्ड प्रकल्प उभारण्यासंदर्भात कार्यवाही सुरू आहे. विदर्भात इको-टुरिझमला चालना देण्यात आली आहे. पर्यटन आणि तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.





**हार्डवर्कला स्मार्टवर्कची जोड**

शासनाने ई-प्रशासन धोरण जाहीर केले आहे. ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांपर्यंत शासकीय, निमशासकीय व खाजगी सेवा पोहोचवण्यासाठी ३४ हजारांपेक्षा जास्त 'महा ई सेवा' केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. बहुसंख्य ग्रामपंचायती इंटरनेटने जोडण्यात आल्या आहेत. आधार नोंदणीतही महाराष्ट्राने आघाडी घेतली आहे.

**मुंबईच्या गतिमानतेसाठी**

मुंबई व इतर महानगरांच्या पायाभूत गरजा पूर्ण करण्यासाठी सरकार महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवीत आहे. पहिल्या टप्प्यातील मोनोरेल सुरू झाली आहे. भारतातील ही पहिली मोनोरेल आहे. वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर हा मेट्रो मार्ग. छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळाला थेट पश्चिम द्रुतगती मार्गाशी जोडणाऱ्या सहार उन्नत मार्गामुळे प्रवाशांची गैरसोय दूर झाली आहे. मुंबई महानगर प्रदेशात जवळपास ३०० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचे काम प्रगतिपथावर आहे.

**नवी मुंबई विमानतळ**

नवी मुंबई येथे १,१६० हेक्टर क्षेत्रावर ग्रीनफिल्ड आंतरराष्ट्रीय विमानतळ विकसित करण्याची कार्यवाही सुरू आहे. मुख्य विमानतळ परिसरामुळे स्थलांतरित होणाऱ्या १० गावांमधील प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या घराच्या पायाक्षेत्राच्या तिप्पट क्षेत्राचा विकसित भूखंड मिळणार आहे.

**नैसर्गिक संपत्तीचे जतन**

राज्य जैवविविधता मंडळ स्थापन करण्यात आले आहे. संरक्षित क्षेत्रातील खेड्यांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. वाघांच्या संरक्षणासाठी विविध उपाययोजना राबविल्या आहेत.

विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील नवीन वस्त्रोद्योग प्रकल्पांना १० टक्के भांडवली अनुदान देण्याच्या योजनेचा यात प्राधान्याने समावेश केला आहे.

**कामगारांना संरक्षण**

कामगारांच्या हितासाठी किमान वेतन दरात सुधारणा करण्यात आली आहे. कामगारांची वाढती न्यायालयीन प्रकरणे लक्षात घेऊन पुणे, नाशिक आणि औरंगाबाद येथे अतिरिक्त कामगार न्यायालये सुरू करण्यात आली आहेत.

कामाच्या किंवा कार्यालयाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळास प्रतिबंध करण्यासाठी खाजगी आस्थापना आणि कारखान्यांमध्ये महिला तक्रार निवारण समित्या स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. बाल कामगार निर्मूलनाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी टास्क फोर्स निर्माण करण्यात आले आहेत. घरेलू कामगारांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी घरेलू कामगार मंडळाची स्थापना करण्यात आली आहे.

**शहरांमध्ये पायाभूत सुविधा**

विस्तारणाऱ्या शहरांना पायाभूत सेवासुविधा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करून देण्यात येत आहेत. अलीकडेच लातूर, चंद्रपूर आणि परभणी या नगरपालिकांचे महानगरपालिकेत रूपांतर करण्यात आले आहे. हद्दवाढ झालेल्या महानगरपालिका आणि नगरपालिकांना विशेष अर्थसाहाय्य केले जात आहे. राज्यातील १३८ तालुका मुख्यालयांमध्ये असलेल्या ग्रामपंचायतींचे नगरपरिषदा किंवा नगरपंचायतीत रूपांतर करण्यात येणार आहे. त्र्यंबकेश्वर, आळंदी, जेजुरी, पंढरपूर, तुळजापूर, रामटेक आणि पैठण नगरपालिकेच्या यात्राकर अनुदानात वाढ करण्यात आली आहे.

**महानगरांमध्ये मेट्रो रेल्वे**

मुंबईबरोबरच नवी मुंबई, पुणे आणि नागपूरमध्ये देखील मेट्रो रेल्वे उभारण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबईतील मेट्रो रेल्वे धावू लागली आहे. नवी मुंबईतील मेट्रो रेल्वेचे काम प्रगतिपथावर आहे. पुणे महानगर क्षेत्रातील मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील दोन मार्गिकांना सुधारित मान्यता देण्यात आली आहे. नागपूर मेट्रो रेल्वेच्या दोन उन्नत मार्गिकांनाही शासनाने मंजुरी दिली आहे.

**घराच्या स्वप्नपूर्तीसाठी**

सर्वसामान्यांच्या घराच्या स्वप्नपूर्तीसाठी म्हाडामार्फत मुंबईसह सर्व राज्यभरात गृहनिर्माणाच्या योजना राबविल्या जात आहेत. ग्रामीण भागात दारिद्र्यरेषेखालील बेघर कुटुंबांसाठी इंदिरा आवास योजना राबवली जात आहे. रमाई आवास घरकूल योजना, शबरी घरकूल योजनेद्वारे समाजातील दुर्बल घटकांना घरे उपलब्ध करून देण्यात येत आहेत. अल्पसंख्याकबहुल तालुके, शहरे आणि गावांमधील अल्पसंख्याक समुदायातील नागरिकांना घरे बांधून देण्यात येत आहेत. बांधकाम व्यावसायिकांकडून सर्वसामान्य नागरिकांच्या फसवणुकीस आळा घालण्यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण अधिनियम २०१२ लागू करण्यात आला आहे.

**मराठीचे जतन व संवर्धन**

ई-प्रशासन धोरणात मराठीचा वापर बंधनकारक करण्यात आला आहे. मुंबईत 'भाषा भवन' उभारणीसाठी ८० कोटी रुपयांच्या खर्चास तत्त्वत: मान्यता देण्यात आली आहे. आदिवासी विभागातर्फे आदिवासी साहित्यिकांनाही पुरस्कार देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**सुरक्षिततेला प्राधान्य**

राष्ट्रीय सुरक्षा दलाच्या धर्तीवर राज्यात 'फोर्सवन' व 'शीघ्र कृती दला'ची निर्मिती केली आहे. गुप्तवार्ता विभागाचे सक्षमीकरण करण्यात आले आहे. गुप्तवार्ता अधिकाऱ्यांचे स्वतंत्र केडर तयार केले आहे. सायबर गुन्ह्यांचा उकल करण्यासाठी डिसेंबर २००० मध्ये स्वतंत्र सायबर गुन्हे शाखेची स्थापना केली आहे. अत्याचार व बलात्काराचे खटले निकाली काढण्यासाठी १३ विशेष व १०० जलदगती न्यायालये पुढील पाच वर्षांसाठी सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. पोलिस ठाण्यांच्या दक्षता समित्यांमध्ये महाविद्यालयीन युवतींना प्रतिनिधित्व देण्यात आले आहे.

**रस्त्यांमुळे विकासाला गती**

शासनाने ४ हजार ४६५ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचे चौपदरीकरण व दुपदरीकरणाचे १३४ प्रकल्प हाती घेतले आहेत. चौपदरीकरणाचे ७१४ किलोमीटर लांबीचे १६ प्रकल्प पूर्ण झाले आहेत.

**(शब्दांकन : जगदीश मोरे)**
उपमुख्यमंत्र्यांचे
जनसंपर्क अधिकारी

अर्थसंकल्प २०१४-१५

# पायाभूत सुविधांवर भर

**रस्ते, वीज, पाणी यांसारख्या पायाभूत सुविधांवर भर देणारा, युवक-युवतींना कौशल्यवृद्धीची संधी, कायदा व सुव्यवस्था राखणे, शेतकऱ्यांना पुरेशी आर्थिक मदत, महिला व उपेक्षित घटकांवर अन्याय होणार नाही याची दक्षता बाळगण्यास सर्वोच्च प्राधान्य देणारा राज्याचा २०१४-१५ चा अतिरिक्त अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत सादर केला. करांमध्ये सवलत आणि करप्रणालीत अधिक सुटसुटीतपणा आणून व्यापारवृद्धीस चालना देण्याचा प्रयत्नही या अर्थसंकल्पात करण्यात आला आहे.**

**शेतकऱ्यांना दिलासा**



◆ नैसर्गिक आपत्तिग्रस्त शेतकऱ्यांना २,३५० कोटी रुपयांची मदत.

◆ आपत्तिग्रस्त शेतकऱ्यांची जानेवारी ते जून २०१४ या कालावधीतील वीजदेयके राज्य शासन भरणार.

◆ २०१३-१४ या कालावधीत पीक कर्ज घेतलेल्या बाधित शेतकऱ्यांचे शेती कर्जावरील व्याज राज्य शासनामार्फत भरण्यात येणार.

◆ आपत्तिग्रस्त शेतकऱ्यांना कर्जफेडीसाठी डिसेंबर २०१४ अखेरपर्यंत मुदतवाढ देण्याचे, तसेच तोपर्यंत सक्तीने कर्जवसुली न करण्याचे बँकांना निर्देश.

**सिंचन सुविधा**

◆ अवर्षणग्रस्त भागात आतापर्यंत १,५०० सिमेंट काँक्रिट नाला बांधाची उभारणी. २०१४-१५ मध्ये २६१ कोटी रुपयांची तरतूद.



◆ जलस्रोतांची दुरुस्ती, नूतनीकरण व पुनर्स्थापनेसाठी १६४ कोटी रुपयांची तरतूद.


**वस्त्रोद्योग धोरण**

◆ वस्त्रोद्योग धोरणांतर्गत नोंदणी क्रमांक घेण्याची अट शिथिल. व्याज सवलतीच्या दरात सुधारणा.

◆ धोरणांतर्गत आतापर्यंत ४,२५५ कोटी रुपयांची गुंतवणूक व त्यामधून सुमारे २७,००० रोजगारांची निर्मिती. ◆ या धोरणांतर्गत योजनेसाठी रुपये १००.४० कोटी तरतूद.

**वीज वितरण व्यवस्थेचे बळकटीकरण**

◆ सिंगल फेजिंग, गावठाणासाठी स्वतंत्र फिडरसारख्या उपाययोजना आणि विद्युतनिर्मिती क्षमतेत वाढ, तसेच वीज खरेदी करारांमुळे मागणीप्रमाणे वीज पुरवठ्याची क्षमता.



◆ ८०१ नवीन उपकेंद्रे, १,५६,७७१ नवीन रोहित्रांमुळे गेल्या पाच वर्षांत ६० लाख नवीन विद्युत जोडण्या.

◆ पायाभूत आराखडा टप्पा दोन अंतर्गत सुमारे ६,५०० कोटी रकमेच्या गुंतवणुकीची कामे सुरू. त्यामुळे २६ लाख नवीन जोडण्या देणे शक्य.

◆ औद्योगिक वसाहतीमध्ये आठवड्याचे सातही दिवस २४ तास विद्युत पुरवठा.

◆ वीज देयके भरण्यासाठी शेतकऱ्यांकरिता नवीन कृषी संजीवनी योजना सुरु करणार.

**रस्ते विकास**

◆ २०१४-१५ मध्ये रस्ते विकासासाठी २,८३६ कोटी रुपयांची तरतूद.

◆ केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या प्रारंभापासून मार्च २०१४ अखेर २२ हजार ३०६ किलोमीटर लांबीचे ७ हजार ८११ लोकवस्त्या जोडणारे ५ हजार २३४ रस्ते बांधण्यात आले आहेत.


◆ जिल्हा परिषदांतर्गत रस्तेदुरुस्तीसाठी २०१४-१५ साठी ४५६.५५ कोटी रुपयांची तरतूद.

**नवी मुंबई विमानतळ**

◆ अंदाजे १४,५७४ कोटी रुपये खर्चाच्या प्रकल्पास केंद्र शासनाची तत्वत: मंजुरी.



◆ आकर्षक पॅकेज देण्याच्या निर्णयामुळे



**औद्योगिक क्षेत्र**

◆ परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र अग्रेसर. देशाच्या एकूण थेट परकीय गुंतवणुकीतील १८ टक्के वाटा आकर्षित करण्यात राज्याला यश.

◆ एका महिन्यात दहा विशाल प्रकल्पांना मान्यता, त्यामध्ये २,७०२.७९ कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित. ५,८०९ व्यक्तींना रोजगाराची संधी.

◆ समूह विकास कार्यक्रमांतर्गत तीन वर्षांत ४७० कोटी रुपयांची गुंतवणूक.

◆ औद्योगिक प्रोत्साहनासाठी २,५०० कोटी रुपयांची तरतूद.

◆ भारत हेवी इलेक्ट्रीकल्सच्या सोलार फोटो होल्टाइक प्रॉडक्ट प्रकल्पाद्वारे २,७३१ कोटी रुपयांच्या भांडवली गुंतवणुकीने सुमारे १,००० व्यक्तींना रोजगाराच्या संधी.

◆ राज्याने अलीकडेच जाहीर केलेल्या औद्योगिक धोरणाचे पुनर्विलोकन सुरू असून उद्योगजगताला आकर्षक वाटेल आणि औद्योगिक विकासाला प्रोत्साहन देणारे सुधारित धोरण लवकरच जाहीर केले जाईल.

प्रकल्पबाधितांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्यामुळे भूसंपादनाची व निविदा प्रक्रियेची कार्यवाही सुरू.

**बंदरे विकास**

◆ खाजगीकरणाच्या माध्यमातून रेवस-आवरे, दिघी, धामणखोल-जयगड, आंग्रे, विजयदुर्ग आणि रेडी या ६ बंदराचा विकास करण्यात येत आहे.

◆ धामणखोल-जयगड बंदरात पहिल्या टप्प्यातील २ धक्के कार्यान्वित.

◆ लहान बंदरातून पाच वर्षांत अडीच पट माल हाताळणी वाढली असून २०१३-१४ मध्ये ती २४.६ दशलक्ष टन झाली आहे.

**रोजगाराला प्रोत्साहन**

◆ राज्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण आयोगाची स्थापना.


◆ मुंबई उपनगर, सिंधुदुर्ग, औरंगाबाद, सांगली आणि नागपूर व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्राची स्थापना. त्याद्वारे २१,३५० उमेदवारांना रोजगार देण्याचे लक्ष्य.

◆ राज्यातील विविध भागात २०१४-१५ या वर्षात १५० रोजगार मेळावे घेण्याचे उद्दिष्ट.

◆ आदिवासी तरुणांना विशेष प्रशिक्षणांतर्गत ८ केंद्राद्वारे प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षणाची सुविधा.

◆ गडचिरोली जिल्ह्यात १९.४० कोटी रुपये किंमतीच्या सहकारी तत्त्वावरील पथदर्शी प्रकल्पास मान्यता. त्यासाठी रुपये १३.६२ कोटीची तरतूद.

**आरोग्यविषयक सुविधा**



◆ विविध आरोग्य कार्यक्रमाद्वारे मातामृत्यू दर, अर्भकमृत्यू दर आणि प्रजनन दरामध्ये लक्षणीय घट.

◆ गरजू रुग्णांना तातडीने रक्त पुरवठा व्हावा यासाठी जीवन अमृत सेवा कार्यान्वित. आतापर्यंत ३,६१७ रक्त पिशव्यांचे वितरण.

◆ प्रधानमंत्री स्वास्थ सुरक्षा योजनेंतर्गत ४ वैद्यकीय महाविद्यालयांना केंद्र शासनाची मान्यता.

◆ नागरी व ग्रामीण आरोग्य संस्थांच्या बांधकामासाठी ३७०.१० कोटी रुपयांची तरतूद.

**महिलांच्या कल्याणासाठी**

◆ महिलांच्या सुरक्षा व्यवस्थेसाठी शहरे व तालुक्यांमध्ये बिनतारी संदेश यंत्रणेसह वाहने उपलब्ध करून देणार.

◆ सध्या कार्यरत असलेल्या २७ विशेष न्यायालयांबरोबरच २५ नवीन न्यायालयांची स्थापना करणार.

**अल्पसंख्याक विकास**



◆ अल्पसंख्याक समाजातील तरुणांना शासकीय सेवा आणि बँकांमध्ये नोकरीच्या संधी प्राप्त होण्यासाठी मोफत प्रशिक्षण योजना अधिक प्रभावी करणार.

◆ अल्पसंख्याक विकासासाठी २०१४-१५ या वर्षासाठी ३६२ कोटी रुपयांची तरतूद.

**अनुसूचित जाती कल्याण**

◆ नागरी व ग्रामीण भागातील अनुसूचित जातीच्या वस्त्यांमध्ये पाणीपुरवठा, वीज, मलनि:स्सारण समाजमंदिर इत्यादी कामे करण्यासाठी २०१४-१५ साठी ९०० कोटी रुपयांची तरतूद.

◆ अत्याचार प्रतिबंधक कायद्याखालील प्रकरणांसाठी ६ विशेष न्यायालये.

◆ रमाई आवास योजनेच्या अनुदानात ७० हजार रुपयांवरुन १ लाख रुपयांची वाढ.

**न्यायिक सुविधा**

◆ सन २०१४-१५ मध्ये न्यायालयीन इमारती न्यायाधीशांची निवासस्थाने यासाठी रुपये ४१३ कोटी नियतव्यय.

◆ महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणातर्फे मुंबई, नागपूर, औरंगाबाद व पुणे येथे सार्वजनिक सेवेबाबतची प्रकरणे चालविण्यासाठी स्थायी लोक अदालतींची स्थापना.

**मराठी भाषेच्या विकासासाठी**

◆ मराठी भाषा संशोधन विकास व सांस्कृतिक केंद्र उभारणीसाठी अंदाजित ८० कोटी २० लाख रुपयांच्या आरखड्यास मंजुरी.



◆ मराठीतील ९५६ दुर्मीळ ग्रंथांपैकी २८ ग्रंथांचे संगणकीकरण पूर्ण.

◆ मोडी हस्तलिखितांचे देवनागरीमध्ये रूपांतर करण्याचा प्रकल्प राबविला जात आहे.

**कर सवलत व करप्रणालीत सुटसुटीतपणा**

◆ व्यवसाय कर आकारणीची वेतनमर्यादा ५ हजारवरून ७ हजार ५०० रुपये.

◆ मूल्यवर्धित कर कायद्याखाली (व्हॅट) नोंदणीसाठी उलाढालीची मर्यादा ५ लाखावरून रुपये १० लाख.

◆ कापसावरील कर ५ टक्क्यांवरून २ टक्के.

◆ कर वर्ष २०१३-१४ करिता ऊस खरेदी कर माफ.

◆ लेखापरीक्षण अहवाल सादर करण्यासाठी



उलाढालीची मर्यादा ६० लाखांवरून १ कोटी रुपये.

◆ सिनेमॅटोग्राफिक फिल्मच्या चित्रपटगृहतील प्रदर्शनाकरिता कॉपी राईटच्या विक्री/लिजवरील कर १ एप्रिल २००५ ते ३० एप्रिल २०११ करिता माफ.

◆ आपसमेळ योजना अधिक आकर्षक. किरकोळ व्यापाऱ्यास एकूण उलाढालीच्या १ टक्के अथवा करपात्र उलाढालीच्या दीड टक्के इतकी रक्कम भरण्याची सवलत.

◆ विमान देखभाल व दुरुस्ती उद्योगास चालना देण्यासाठी विमानांचे सुटे भाग करमुक्त.

◆ तारण-गहाण दस्तांवर मुद्रांक शुल्काची कमाल मर्यादा १० लाख रुपये.

◆ केंद्र किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही विभागास भांडवली वस्तूंची विक्री केल्यास विक्री कराचा दर १२.५ टक्केवरुन ५ टक्के.

◆ ऐषाराम करमाफीच्या मर्यादेत वाढ. ७५० रुपयांऐवजी १ हजार रुपयांपर्यंत करमाफी, १ हजार रुपयांपेक्षा जास्त, परंतु दीड हजार रुपयांपर्यंत ४ टक्के व दीड हजार रुपयांपेक्षा जास्त दरावर १० टक्के कर.

# भारनियमनमुक्तीकडे यशस्वी वाटचाल


**राज्यातील भारनियमनाच्या समस्येवर मात करण्यासाठी सिंगल फेजिंग व गावठाणांसाठी स्वतंत्र फिडर्स या अल्पकालीन व विद्युत निर्मितीची क्षमतावाढ, २५-२५ वर्षांचे वीजखरेदी करार अशा दीर्घकालीन नियोजनामुळे डिसेंबर २०१२ मध्ये राज्यातील विजेच्या उपलब्धतेचा प्रश्न निकाली काढण्यात शासनाला यश आले. ग्राहकांना तत्पर सेवा देणे, वीज हानी कमी करणे तसेच सुरळीत व पुरेशा दाबाने वीज पुरवठा व्हावा म्हणून विविध अभिनव उपक्रम राबविणे सुरू आहे. यामुळे संपूर्ण भारनियमनमुक्तीकडे महाराष्ट्राची वाटचाल सुरू आहे.**

गेली अनेक वर्षे राज्यात होणारे भारनियमन हा चर्चेचा व चिंतेचा विषय होता. वीजविषयक प्रत्येक व्यासपीठावर या विषयाची चर्चा होत होती. मुळात हा प्रश्न काही केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित नव्हता. देशातील बहुतेक राज्यात हा प्रश्न निर्माण झाला होता. या प्रश्नावर मात करण्यासाठी सिंगल फेजिंग व गावठाणांसाठी स्वतंत्र फिडर्स या अल्पकालीन व विद्युत निर्मितीची क्षमतावाढ, २५-२५ वर्षांचे वीजखरेदी करार अशा दीर्घकालीन नियोजनामुळे डिसेंबर २०१२ मध्ये राज्यातील विजेच्या उपलब्धतेचा प्रश्न निकाली काढण्यात शासनाला यश आले आहे.

**राज्य भारनियमनमुक्त**

सरकारने जाहीर केल्याप्रमाणे राज्य डिसेंबर २०१२ मध्ये भारनियमन मुक्त झाले. डिसेंबर २०१२ मध्ये आवश्यक असलेली वीज उपलब्ध करून देण्याची जबाबदारी महावितरणची होती, ती महावितरणाने पूर्ण केली. डिसेंबर २०१२ मध्ये विजेची मागणी १४,००० ते १४,५०० मे.वॅ. च्या दरम्यान होती. तेव्हा मागणीएवढी वीज पुरवण्याची क्षमता महावितरणामध्ये होती. एप्रिल-मे २०१४ महिन्यात विजेची मागणी सातत्याने १६,००० ते १६,५०० मे.वॅ. होती. महावितरण नियमितपणे १५,८०० ते १६,००० मे.वॅ. वीज पुरवीत आहे.

२००५ मध्ये महावितरणच्या यंत्रणेत असलेली विजेची १८ टक्के तूट केवळ ३ टक्क्यांवर आली आहे. विजेच्या उपलब्धतेअभावी भारनियमन केले जात नाही. राज्यातील ज्या भागात नियमितपणे बील भरले जात नाही व वीजचोरीचे प्रमाण जास्त आहे अशा भागात जाणीवपूर्वक भारनियमन केले जाते. राज्य भारनियमनमुक्त करण्यासाठी महावितरणकडून अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना करण्यात आल्या. त्यात खालील उपाययोजनांमुळे भारनियमनमुक्ती शक्य झाली.



**ग्रामीण भागातील विद्युत हानी कमी करणे यासाठी सुमारे १५ हजार गावात सिंगल फेजिंग व १८ हजार गावात स्वतंत्र गावठाण फिडर योजना राबविण्यात आली.**

## कृषी संजीवनी

कृषीपंपाच्या ३१ मार्च २०१४ पर्यतच्या मूळ वीज बिलाच्या एकूण थकबाकीपैकी ५० टक्के रक्कम शेतकऱ्यांनी भरल्यास उरलेली ५० टक्के रक्कम आणि एकूण थकबाकीच्या रकमेवरील १०० टक्के व्याज आणि दंड माफ करणारी कृषी संजीवनी योजना-२०१४ जाहीर करण्यात आली. ज्या शेतकऱ्यांकडे ३१ मार्च २०१४ रोजी कृषीपंपाची कुठलीही थकबाकी नाही, त्यांना पुढील २ त्रैमासिक बिलात (सहा महिने) ५० टक्के सूट देण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना मूळ थकबाकीपोटी २ हजार ९७७ कोटी रुपये माफ करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांच्या थकबाकीवरील व्याज आणि दंडापोटी ४ हजार ४१७ कोटी रुपये माफ करण्यात येणार असून हा बोजा महावितरण सहन करणार आहे.

शेतकऱ्यांना थकबाकीची ५० टक्के रक्कम भरणे सोयीचे व्हावे म्हणून त्यांनी ३१ ऑगस्ट २०१४ पर्यत किमान २० टक्के, ३० सप्टेंबर २०१४ पर्यत २० टक्के आणि ३१ आक्टोंबर २०१४ पर्यत किमान १० टक्के किंवा उर्वरित रक्कम भरणे आवश्यक आहे. थकबाकीदार शेतकऱ्यांनी ५० टक्के मूळ थकबाकी एकरकमी भरण्याची सोय असून ही रक्कम ३१ ऑगस्ट २०१४ पूर्वी भरणे आवश्यक आहे.

राज्यात विजेच्या दरात २० टक्के कपात.

- राज्यात दरवर्षी विजेची मागणी १० टक्क्याने वाढत असल्याने येत्या ५ वर्षातील विजेची ही मागणी भागवू शकेल अशा रीतीचे महाजेनकोचे क्षमतावृद्धीचे विविध प्रकल्प. यामुळे राज्य ८५ टक्के भारनियमनमुक्त.
- गेल्या ५ वर्षांमध्ये वीज मागणी-पुरवठा तफावत १८ टक्क्यांवरून ३ टक्क्यांपर्यंत कमी.
- महाजेनकोला २००७-०८ साली असणारा तोटा, २६.०८ टक्क्यांवरून २०१२-१३ मध्ये १८.६८ टक्क्यांवर. वीज देयकांच्या वसुलीत ९७ ते ९८ टक्के वाढ.
- कृषी ग्राहकांना दिवसा ८ तास आणि रात्री १० तास असा आळीपाळीने वीजपुरवठा. मागणी १४,००० मेगावॅटची असून सरासरीने जवळजवळ १३,५०० मेगावॅट वीजपुरवठा. त्यामुळे वितरण, वाणिज्यिक तोटा ४२ टक्क्यांहुन अधिक असलेल्या फीडर्सवरच ५०० ते ७५० मेगावॅटचे भारनियमन.
- महाजेनकोने ११ व्या योजनेच्या काळात २,५०० मेगावॅट औष्णिक ऊर्जा वाढविली. ३,२३० मेगावॅट ऊर्जा प्रकल्पांचे काम सुरू. याशिवाय ३९५० मेगावॅट औष्णिक ऊर्जानिर्मिती प्रकल्पांसाठी भूसंपादन सुरू.
- ग्रामीण विद्युतीकरण योजनेमध्ये ४७०९ खेड्यांचे विद्युतीकरण.
- ग्राहकांसाठी कॉल सेंटर्स, ऑनलाइन पेमेंट अशा सुविधा.

**विजेच्या मागणीचे व्यवस्थापन**

भारनियमन आटोक्यात आणण्यासाठी विद्युत निर्मितीची क्षमता वाढवण्यासोबतच विजेच्या मागणीचे व्यवस्थापन करणे आवश्यक होते. राज्यातील सुमारे ४१ हजार शहरे व गावांपैकी सुमारे ३३ हजार शहरे व गावे ही कृषीबहुल आहेत. या भागातील कृषिपंपांच्या मागणीचे व्यवस्थापन करणे, विद्युतदाबात सुधारणा करणे व ग्रामीण भागातील विद्युत हानी कमी करणे यासाठी सुमारे १५ हजार गावांत सिंगल फेजिंग व १८ हजार गावांत स्वतंत्र गावठाण फिडर योजना राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. या योजनेंतर्गत शेतीसाठी स्वतंत्र फिडर टाकण्यात आला. त्यामुळे शेतीसाठी सलग आळीपाळीने दिवसा ८ तास आणि रात्री १० तास वीज उपलब्ध करून देण्यात आली आहे. अशा पद्धतीने शेतीचा वीजपुरवठा वेगळा केल्यामुळे गावठाणासाठी अधिक तास वीज उपलब्ध करून देणे शक्य झाले. यामुळे महावितरणच्या पायाभूत आराखड्याच्या रचनेत मोठी सुधारणा झाली.

ही योजना जवळजवळ पूर्ण झाली असून यामुळे सुमारे अडीच हजार ते तीन हजार विजेच्या मागणीचे व्यवस्थापन करणे शक्य झाले. सध्याच्या भारनियमनमुक्तीत या योजनांचा महत्त्वाचा वाटा आहे.

**वीज उपलब्धता**

सध्याची व भविष्यातील विजेची मागणी पूर्ण करण्यासाठी महानिर्मिती कंपनी, केंद्रीय प्रकल्पाद्वारे विद्युत निर्मितीची क्षमता वाढवण्याचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. राज्यात विजेची उपलब्धता वाढावी यासाठी महानिर्मितीशिवाय अदानी, जेएसडब्ल्यू, इंडिया बुल्स इत्यादी खाजगी विकासकांसोबत २५-२५ वर्षांचे दीर्घकालीन वीज खरेदी करार करण्यात आले. यामुळे एकीकडे विजेची मागणी नियंत्रणात आणत असतानाच विजेच्या मागणीची गरज भागविण्याची तरतूद करण्यात आली आहे.

गेल्या १० वर्षांत वीज निर्मितीच झाली नाही, असे एक विधान अनेकदा केले जाते. ते चुकीचे आहे. मुळात २००६ पासून २०१३-१४ पर्यन्त महानिर्मिती, केंद्रीय प्रकल्प, दीर्घकालीन वीज खरेदी करार यातून नेहमीची सुमारे १२,३८४ मे.वॅ. वीज उपलब्ध झाली आहे.

**अपारंपरिक ऊर्जा स्रोत**

राज्यात स्वयंवापरासाठी १,२८० मे.वॅ., उसाच्या चिपाडापासूनचे १,१०१ मे.वॅ., सौर ऊर्जावर आधारित १९७.७५ मे.वॅ. आणि पवन ऊर्जेवर आधारित २,४२२ मे.वॅ., लघु जलविद्युत ९३ मे.वॅ. असे सुमारे ५,००० मे.वॅ. चे अपारंपारिक विजेचे प्रकल्प गेल्या १० वर्षांत उभे राहिले आहेत. भविष्यात विजेच्या उपलब्धतेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी शासनाच्या मदतीने महावितरणाने २०२० पर्यंत नियोजन केले आहे.

**- राम दुतोंडे**
(जनसंपर्क अधिकारी-महाजेनको)



## भारनियमनमुक्तीचे टप्पे

- ऑक्टोबर २०११ पासून नागपूर, अमरावती, औरगांबाद, नाशिक, पुणे, नवी मुंबई ही सर्व महसुली मुख्यालये भारनियमनमुक्त करण्यात आली.
- जिल्हा मुख्यालयात रात्री १० पर्यन्त असणारे भारनिमयन ७ वाजेपर्यंत सुरू ठेवण्यात आले.
- राज्याची स्थापना झाल्यापासून औद्योगिक वसाहतीत १६ तासांची आठवडी सुट्टी होती (Staggering Day) मध्यंतरी वीज टंचाईमुळे ही सुटी ४८ तासांपर्यन्त पोहोचली होती. फेब्रुवारी २०१२ पासून ही सुटी पूर्णत: रद्द करण्यात येऊन औद्योगिक वसाहतीत २४ x ७ वीजपुरवठा करण्यात येत आहे.
- २४ एप्रिल २०१२ पासून भारनियमन प्रोटोकॉलच्या अ, ब, क गटातील भारनियमन बंद करण्यात आले. यात राज्यातील १४२ विभागांपैकी ९४ विभाग भारनियमनमुक्त झाले. म्हणजे राज्यातील ६६ टक्के भाग भारनियमन मुक्त झाला.
- पूर्वी विभागनिहाय भारनियमन करण्यात येत असे. ग्राहकांना जास्तीत जास्त फायदा व्हावा यासाठी ऑक्टोबर २०१२ पासून फिडरनिहाय भारनियमन सुरू करण्यात आले.
- १ ऑक्टोबर २०१२ पासून 'ड' गटातील भारनियमन बंद करण्यात आले.
- सध्या राज्यातील ८५ टक्के भाग भारनियमनमुक्त असून केवळ वितरण व वाणिज्यिक हानी जास्त असलेल्या ई, एफ, जी या भागात भारनियमन करण्यात येत आहे.
- विजेची मागणी १६,००० ते १६,५०० मे.वॅ. आहे. सातत्याने १५,८०० ते १६,००० मे.वॅ. वीज उपलब्ध करून देण्यात येत आहे.
- २००५ साली महावितरणच्या यंत्रणेत १८ टक्के तूट होती. सध्या ही तूट ३ टक्क्यांपेक्षा कमी झाली आहे.

प्रेरणादायी यश

# फिटे अंधाराचे जाळे

**महावितरणाच्या वतीने राज्यभरात फिडर्सनिहाय विजेचे भारनियमन करण्यात येते. यामध्ये वीजबिलाची वसुली व वीजचोरी (गळती) या आधारावर गट पाडण्यात आले आहेत. सध्या राज्यातील ८५ टक्के भाग भारनियमनमुक्त असून १५ टक्के भागात भारनियमन केले जात आहे. सध्या अनेक फीडर्स भारनियमनातून भारनियमनमुक्त गटात आल्यामुळे त्यांना २४ तास वीज उपलब्ध झाली. यामुळे वीजग्राहकांना अतिशय मोठा दिलासा मिळाला.**

### व्यापारी खूश... ग्राहक आनंदी

अकोला शहरातील मध्यवर्ती भागातील किराणा बाजार व इतर सर्व घाऊक व्यापार कॉटन मार्केट या फीडरवर होता. हा भाग पूर्वी ई या गटामध्ये होता. मागील पाच महिन्यापासून ड गटात असल्यामुळे भारनियमनमुक्त आहे. याच भागात विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्सचे माजी अध्यक्ष असलेले अशोक गुप्ता यांचे प्रतिष्ठान आहे. त्यांनी सांगितले की, ही शहरातील महत्त्वाची बाजारपेठ असून भारनियमनामुळे व्यापारी त्रस्त झाला होता. व्यापाऱ्यांची जवळपास सर्वच कामे तसेच अकाऊंटिंग संगणकाद्वारे केल्या जाते.



अशोक गुप्ता

ऑनलाइन बँकिंग, ई-फायलिंग व इतरही कामे विजेवर अवलंबून असल्याने व्यापारी तसेच ग्राहक सेवेला याचा फटका बसत होता. महावितरणाने वीज थकबाकीच्या अनुषंगाने केलेल्या जनजागृतीच्या पार्श्वभूमीवर येथील व्यापारी संघटनेने ५ जणांची समिती बनवली. त्या समितीने व्यापाऱ्यांना थकबाकी व वेळेत वीज बील भरण्याचे आवाहन केले. त्याचा उत्तम प्रतिसाद मिळाला. त्यामुळे येथील व्यापाऱ्यांना उन्हाळ्यामध्ये सुद्धा २४ तास वीज उपलब्ध झाली. सध्या व्यापाऱ्यांना त्यांची कामे करताना अडचण येत नसून ग्राहकांनासुद्धा समाधानकारक सेवा देता येते.

### बँकेला फायदा

याच कॉटन मार्केट फिडरवर अनेक बँकांची मुख्य कार्यालयेसुद्धा आहेत. भारनियमनामुळे या सेवेवरही परिणाम झाला. मात्र भारनियमनमुक्तीनंतर सेवेत बदल झाला असल्याचे अकोला जनता कमर्शियल को.ऑप.बँक लि. अकोलाचे व्यवस्थापकीय संचालक प्रदीप गोयंका यांनी सांगितले. बँकिंग क्षेत्राचे पूर्णत: संगणकीकरण झाल्याने पूर्णपणे विजेवर अवलंबून राहावे लागते.



प्रदीप गोयंका

पूर्वी या भागातील फीडरवर भारनियमन असल्याने जवळपास पन्नास हजार ग्राहक खाते असलेल्या आमच्या बँकेमध्ये ग्राहक सेवेवर परिणाम झाला. इन्व्हर्टर चार्जिंगचा प्रश्न, एअर कंडिशनर व लिफ्ट बंद राहायची. सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला होता. कारण बँकेमध्ये असलेली रोकड व ग्राहकांनी आणलेली रक्कम यासंदर्भात असुरक्षितता वाटत होती. त्यामुळे भारनियमन वेळापत्रकाकडेच लक्ष राहत होते, भारनियमनमुक्तीमुळे ग्राहक सेवा पुन्हा सुरळीत झाली. पूर्वी जवळपास १०० ते ११० लीटर डिझेल जनरेटरसाठी लागायचे. त्यामध्ये बचत झाली.

### व्यवसाय बहरला

अकोला जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यातील पारस ही मोठी ग्रामपंचायत सोबतच औष्णिक वीज केंद्रामुळे राज्यभर परिचित असलेले गाव!



प्रसाद भगत

मात्र वीज बिलवसुली कमी व गळतीमुळे भारनियमनाची झळ येथेही बसली. येथील बस स्टँडवर प्रसाद स्टुडिओचे संचालक प्रसाद भगत यांनी सांगितले की, फोटोग्राफीमध्ये प्रकाश योजनेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. मात्र ज्यावेळी आमच्याकडे भारनियमन व्हायचे त्यावेळी स्टुडिओ बंद ठेवण्याशिवाय पर्याय नसायचा. कॅमेऱ्याच्या बॅटरी चार्जिंगचाही प्रश्न होता. बॅटरी चार्जिंगला जवळपास ६ तास लागतात. एखाद्याला अर्जंट पासपोर्ट फोटो देणे शक्य होत नसे. लग्न किंवा स्वागत समारंभामध्ये व्हिडिओ शूटिंग अथवा फोटोग्राफी हा अविभाज्य घटक. मात्र तेथेही रात्रीच्या कार्यक्रमामध्ये वीज नसल्यास समारंभावर पाणी फेरले जायचे. असे क्षण जीवनात पुन्हा येत नाही त्यामुळे व्यवसायावर गदा आली. भारनियमनमुक्तीनंतर २४ तास मिळत असलेल्या विजेने आमच्या व्यवसायासह समारंभामध्ये खऱ्या अर्थाने 'प्रकाश' आणला.

### कारखाना पुन्हा सुरळीत

अकोला शहराला लागून असलेल्या न्यू तापडीया नगर येथे जांगीड वेल्डिंग वर्क्स आहे. येथे वेल्डिंगची व त्या संदर्भातील सर्व कामे चालतात. या कारखान्याच्या संचालिका गीता कैलास जांगीड यांनी सांगितले की, पूर्वी आमचा भाग भारनियमनात होता.



गीता जांगीड

हे भारनियमन गळती व विजेचे बिले न भरल्यामुळे होत होते. मी स्वत: उद्योजक असल्यामुळे विकलेल्या वस्तूचे पैसे न मिळाल्यास व्यवसायावर काय परिणाम होतो, याची मला जाणीव आहे. भारनियमनामुळे ग्राहकांची विशेषत: बांधकाम व्यावसायिकांची कामे खोळंबत होती. त्यामुळे माझ्यासोबतच माझ्या ग्राहकांनाही त्रास व्हायचा. माझ्याकडे असलेले ७ ते ८ कामगार बसून असायचे. कारण व्यवसायच पूर्णत: विजेवर अवलंबून आहे. छोट्या-छोट्या कामासाठीसुद्धा त्रास व्हायचा. आर्थिक गणिताबरोबरच वेळेचे नियोजन कोलमडले. मात्र मागील एक वर्षापासून हा भाग भारनियमनमुक्त झाल्याने सध्या माझे काम सुरळीत सुरू असून ठरलेल्या वेळेत मी ग्राहकांचे काम पूर्ण करून देऊ शकते. याचे मला समाधान आहे.

# शाश्वत ऊर्जा

ऊर्जा निर्मितीमध्ये स्वयंपूर्ण असणे प्रत्येक राज्यासाठी आवश्यक आहे. ऊर्जा निर्मितीमध्ये महाराष्ट्र अग्रेसर असले तरी विजेचा वापर वाढल्यामुळे मागणी आणि पुरवठा यामध्ये तफावत दिसून येते. वीजनिर्मितीसाठी लागणाऱ्या इंधनाच्या साठ्याची मर्यादित उपलब्धता या पार्श्वभूमीवर शाश्वत वीज उपलब्धतेसाठी अपारंपरिक पद्धतीने वीज निर्मिती करण्याला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे.

**विविध प्रकल्प**

शासनाने वेळोवेळी जाहीर केलेल्या धोरणांमुळे अपांरपरिक ऊर्जा स्रोताचा विकास राज्यात मोठ्या प्रमाणात होण्यास मदत झाली आहे. नोव्हेंबर, २०१३ अखेर एकूण ५२६१.३६ मे.वॅट क्षमतेचे सुमारे रु. २८,९३५ कोटी गुंतवणुकीचे प्रकल्प खाजगी गुंतवणूकदारांमार्फत स्थापित करण्यात आले. त्यामध्ये पवन ऊर्जा प्रकल्प – ३४४८.८१ मे.वॅट, सहवीज निर्मिती प्रकल्प – ११५५.५० मे.वॅट, कृषी अवशेषांपासून ऊर्जा निर्मिती प्रकल्प – १८० मे.वॅट, सौर औष्णिक व प्रकाशीय ऊर्जा प्रकल्प – १७९.९५ मे.वॅ., औद्योगिक कचऱ्यापासून वीज निर्मिती प्रकल्प – २६.१० मे.वॅ. व लघु जल ऊर्जा प्रकल्प – २७१ मे.वॅ. अशा क्षमतेच्या प्रकल्पांचा समावेश आहे. शासनाकडून प्रकल्प विकासकांना प्रोत्साहन म्हणून मूलभूत सुविधा उभारणीसाठी अनुदान उपलब्ध करून देण्यात येते.

अपारंपरिक ऊर्जा स्रोतांच्या विकासासाठी निधी उपलब्ध व्हावा याकरिता औद्योगिक व वाणिज्यिक ग्राहकांवर प्रतियुनिट ८ पैसे कर लागू करून प्रकल्प विकास निधी उपलब्ध करून देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे.

**पवन ऊर्जा**

पवन ऊर्जा निर्मिती स्थळांचा अभ्यास करण्यासाठी वारापरिमापन केंद्रे उभारण्यात येतील. मार्च २०१३ पर्यंत ३९२ ठिकाणी वारामापन केंद्रे स्थापन करण्यात आली. सध्य:स्थितीत महाराष्ट्रात १११ ठिकाणी वाऱ्यांच्या वेगाचे मोजमाप चालू आहे. आतापर्यंत ४६ ठिकाणे पवनऊर्जा प्रकल्पासाठी योग्य म्हणून जाहीर करण्यात आली आहेत.

**सौर ऊर्जा मापन**

सौर ऊर्जेपासून वीजनिर्मिती प्रकल्पांच्या उभारणीस चालना देण्यासाठी निरनिराळ्या भौगोलिक क्षेत्रांमध्ये सौर प्रारण मापन केंद्रांची स्थापना करण्यात येणार आहे. २०१३–१४ मध्ये ४ सौर प्रारण मापन केंद्रे स्थापन करण्यात येतील. अशा प्रकारे राज्य निधीतून सौर प्रारण मापन केंद्र स्थापन करण्यासाठी पुढाकार घेणारे महाराष्ट्र पहिलेच राज्य आहे.

**पवन सौर संकरित ऊर्जा**

देशात सर्वात जास्त म्हणजे १७५१ किलोवॅट क्षमतेची पवन–सौर संकरित संयंत्रांची स्थापना झाली असून आणखी ४७४

**शासनाने अपारंपरिक व नित्यनूतनशील ऊर्जा स्रोतांद्वारे वीज निर्मिती करण्यावर भर दिला आहे. या क्षेत्राचा विकास करण्यासाठी या ऊर्जा स्रोतांपासून ऊर्जा निर्मितीचे धोरण आखले आहे. अपारंपरिक ऊर्जा निर्मिती क्षमतेच्या बाबतीत महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे. २०१५ पर्यंत वीजनिर्मितीच्या १० टक्के वीज अपारंपरिक ऊर्जेमार्फत निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठरवण्यात आले आहे.**



आशिया खंडातील सर्वात मोठा ५४५ मे.वॅट पवन ऊर्जा प्रकल्प धुळे जिल्ह्यातील ब्राम्हणवेल येथे विकसित करण्यात आला आहे.

कि.वॅ. क्षमतेची संयंत्रे उभारण्यात येत आहेत. ८९४ कि.वॅ. क्षमतेची संयंत्रे उभारण्याचे प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठवण्यात आले आहेत.

**ग्रामीण पाड्यांचे विद्युतीकरण**

अपारंपरिक ऊर्जा स्रोतांच्या साहाय्याने ग्रीड जोडणी न झालेल्या दुर्गम गावाचे विद्युतीकरण करण्यात येत आहे. मार्च, २०१३ अखेर या कार्यक्रमांतर्गत एकूण ४०४ गावे व ८३८ पाडयांचे विद्युतीकरण करण्यात आले आहे. २०१३-१४ मध्ये १२६ गावे व १२ पाडयांचे विद्युतीकरण करण्याचे उद्दिष्ट आहे.

ग्रामपंचायतीमध्ये सौर ऊर्जेवर आधारित सामुदायिक अभ्यासिका उभारण्याचा कार्यक्रम मोठया प्रमाणावर घेण्यात आला आहे. त्याचा फायदा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना होत आहे. गेल्या वर्षी १५,०६२ गावांमध्ये हा कार्यक्रम राबविण्यात आला असून २०१३-१४ मध्ये ७,००० गावांमध्ये हा कार्यक्रम राबविण्यात येईल. सर्व ग्रामपंचायतींमध्ये सौर अभ्यासिका स्थापन करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

**ऊर्जा बचत, ऊर्जा निर्मिती**

ऊर्जा कार्यक्षमतेसाठी शासकीय इमारती, स्थानिक स्वराज्य संस्था यांमध्ये विविध योजना राबविण्याला प्रोत्साहन देण्यात येते. गेल्या वर्षी १४ शासकीय



आजपर्यंत ५,००० गावात सुमारे ६५,००० ऊर्जा कार्यक्षम पथदिवे लावण्यात आले आहेत.

इमारतींमध्ये व १९ नगरपालिका / महानगरपालिकांमध्ये ऊर्जा कार्यक्षमता / ऊर्जा बचत यांचे प्रकल्प राबवण्यात आले. गावातील पथदिव्यांत ऊर्जा बचत करण्यासाठी ऊर्जा कार्यक्षम पथदिवे उभारण्यात येत आहेत. त्यासाठी ग्रामपंचायतींना आर्थिक साहाय्य उपलब्ध करून देण्यात येते.

मोठे उद्योग तसेच लघू व मध्यम उद्योगांनी ऊर्जा परीक्षणासाठी पुढे यावे म्हणून आर्थिक साहाय्य दिले जाते. गेल्या वर्षी ६४२ घटकांनी या योजनेचा लाभ घेतला असून सुमारे ८२ कोटी रुपयांची ऊर्जा बचत केली आहे. जनतेमध्ये ऊर्जा कार्यक्षमता / ऊर्जा बचत याबाबत जागृती निर्माण करण्यासाठी महाऊर्जातर्फे प्रचार व प्रसार करण्यात येत आहे. या प्रयत्नांमुळे गेल्या वर्षात सुमारे ३६० मे.वॅट एवढी ऊर्जा बचत साध्य झाली. ऊर्जा बचत म्हणजेच ऊर्जा निर्मिती असल्याने ऊर्जा बचतीला विशेष महत्त्व प्राप्त होते.

अपारंपरिक साधनाद्वारे ऊर्जा निर्मितीमध्ये वाढ करण्याचे महत्त्वपूर्ण काम महाऊर्जा करत आहे.

**- विष्णू काकडे**

ऊर्जा संवर्धन क्षेत्रातील अत्युत्कृष्ट कामगिरीबद्दल राष्ट्रीय स्तरावरील प्रथम पुरस्कार सलग दुसऱ्यांदा आणि सौर उष्णजल संयंत्र उभारण्यामध्ये उत्तम कामगिरीबद्दल राज्यास (महाऊर्जा) पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.



# सौर ऊर्जेचा यशस्वी प्रयोग

अन्न, पाणी, निवारा या मूलभूत गरजांसोबतच वीज ही मूलभूत गरज झाली आहे. एक तासभर जरी वीज नसली तरी सगळे व्यवहार ठप्प होतांना दिसतात. त्यामुळेचा विजेचा वापर खूप मोठ्या प्रमाणात वाढला आहे. वापराच्या तुलनेत वीजनिर्मिती कमी असल्यामुळे भारनियमन अपरिहार्य होत आहे. उन्हाळ्यात विजेच्या संकटाला मोठ्या प्रमाणात सामोरे जावे लागते. या संकटावर मात करण्याचा उत्तम पर्याय म्हणून सौरऊर्जा पुढे येत आहे. घरगुती साधनांसाठी सौरऊर्जेचा वापर वाढताना दिसतो. सौरऊर्जेचा यशस्वी प्रयोग चंद्रपूर महाऔष्णिक वीज निर्मिती केंद्रात करण्यात आला आहे. अंभोरा येथे महाजेनकोने सौरऊर्जेचे तीन प्रकल्प उभारले आहेत. थिनफिल्म पद्धतीचे दोन तर क्रिस्टल लाइन पद्धतीचा एक प्रकल्प अशा तीनही प्रकल्पातून दररोज पाच वॅट वीज निर्मिती होते.

पहिला प्रकल्प २०१० ला तर उर्वरित दोन प्रकल्प २०१२ ला वीस हेक्टर जागेत उभारण्यात आले. हा राज्यातील पहिला मोठा प्रकल्प आहे. हा प्रकल्प इकोफ्रेंडली म्हणजेच प्रदूषण विरहित आहे. एकदा प्रकल्प उभारल्यानंतर देखभालीव्यतिरिक्त कोणताही खर्च येत नाही.

सौरऊर्जा ही डीसी स्वरूपात प्राप्त होते. इन्व्हर्टरच्या माध्यमातून डिसीचे एसीमध्ये रूपांतर केले जाते व त्यानंतरच ते वीज वापरासाठी योग्य असते. १ मेगावॅट थिनफिल्म प्रकल्पास १२ हजार २८८ पॅनल लागतात. एका पॅनलमधून ९२.५ व्होल्ट ऊर्जा संकलित केली जाते. त्याद्वारे ८४ वॅट वीज निर्माण होते. ही वीज महाजेनको विकत घेऊन ग्राहकांना वितरित करते.

देशात एकूण १ लाख ४६ हजार ७५३ मेगावॅट वीज निर्मिती होते. त्यापैकी ५४ टक्के कोळशावर आधारित असून २५ टक्के हायड्रो पद्धतीची आहे. केवळ ८ टक्के सौरऊर्जा निर्मिती होते. उर्वरित वीज निर्मिती वायू व अणुशक्ती आधारित आहे इतक्या मोठ्या प्रमाणात वीजनिर्मिती होत असतानासुद्धा विजेची टंचाई भासते. त्यामुळे सौरऊर्जेकडे वीज निर्मितीचा महत्त्वाचा पर्यायी स्रोत म्हणून पाहणे आवश्यकता आहे. चंद्रपूर येथील प्रकल्प यशस्वी झाल्याने अनेक खाजगी संस्था सौरऊर्जा निर्मितीकडे वळताना दिसत आहेत.

**- रवी गिते**

# गतिमान आणि ग्लोबल

**प्रगत आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शहराची थोडक्यात वैशिष्ट्ये विचारताच उत्कृष्ट आणि जलद, आरामदायी वाहतूक व्यवस्था, वाहतूक कोंडी टाळून प्रवास घडविणारे उड्डाणपूल, लोकसंख्येच्या प्रमाणात पुरेशी घरे, रस्ते, हवाई, जल इ.विविध मार्गांनी वाहतुकीची उपलब्धता पादचाऱ्यांसाठी स्कायवॉक, २४ तास अखंड वीज व पाणी पुरवठा, १०० टक्के सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, पावसाच्या पाण्याचा उत्तम निचरा करणाऱ्या पर्जन्य जलवाहिन्या, जलस्रोत विकास, घनकचरा व्यवस्थापन, पर्यावरणपूरक समतोल विकास साधणारी आधुनिक जीवनशैली, उच्च राहणीमान. इ.बाबींचा ठळकपणे उल्लेख करावा लागतो. ही कल्पना प्रत्यक्षात आणणारे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर म्हणून जागतिक स्तरावर मुंबईची नवी ओळख निर्माण करण्यासाठी शासनाने गेल्या काही वर्षात केलेल्या सुनियोजित, ठोस आणि परिणामकारक उपाययोजनांचे दृश्य परिणाम आता दिसू लागले आहेत.**

एखादा आंतरराष्ट्रीय प्रवासी ए-३८० या जगातील सर्वात मोठ्या व्यावसायिक वाहतूक करणाऱ्या विमानाने, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सोयी-सुविधांनी युक्त अतिभव्य चकचकीत अत्याधुनिक विमानतळावर उतरतो. विमानतळावरील भव्यता नजरेत टिपून घेत, तो प्रवासी वाहनाने विमानतळाबाहेर पडतो. नयनरम्य आणि गुळगुळीत अशा मार्गावरून दुतर्फा शोभेच्या झाडांचा देखावा बघत, सुमारे अडीच किलोमीटरचे अंतर सिग्नलविरहितपणे, वेगवानपणे कापत तो ४ ते ५ मिनिटांत शहराच्या उपनगरात प्रवेश करतो. शहरातील त्याच्या वास्तव्यादरम्यान अखंडित वीज, पाणी पुरवठा, गगनचुंबी इमारती, जगातील आंतरराष्ट्रीय ब्रँडसची उपलब्धता, व्यापार-उद्योगासाठी आश्वासक वातावरण, गतिमानता, जिवंत, सळसळता उत्साह अनुभवत तो या शहराचा चाहता होतो. या शहरात वारंवार येण्याचा निश्चय करतो. हा सुखद अनुभव कुठल्याही परदेशी भूमीवरच्या आधुनिक शहरातील आपल्या मुंबईतील आहे.

स्वातंत्र्यानंतरच्या ६७ वर्षात मुंबईने पायाभूत सोयी-सुविधा, शिक्षण, आरोग्य, दळणवळण इ. सर्वच सार्वजनिक सेवांमध्ये लक्षणीय प्रगती केली आहे.

**अग्रस्थान कायम**

मुंबईवरील महाराष्ट्राचा हक्क अबाधित राखत १९६० मध्ये मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. राज्यनिर्मितीचा मंगल कलश आणणारे राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या दूरदृष्टीने, धोरणीपणाने राज्यनिर्मितीनंतर विकासाचा रथ आणखी वेगाने धावू लागला. रिझर्व बँक, बॉम्बे स्टॉक एक्सेंज, नॅशनल स्टॉक एक्सेंज, सेक्युरिटीज ॲण्ड एक्सेंज बोर्ड ऑफ



देशातील पहिला डबलडेकर उड्डाणपूल,(सांताक्रुझ-चेंबूर लिंक रोड, मुंबई)

इंडिया इ. सर्व वित्तीय संस्थांची मुख्यालये मुंबई येथे झाली. महाराष्ट्राच्या राजधानीचा सन्मान प्राप्त झालेली मुंबई देशाची अघोषित वित्तीय, व्यापारी, मनोरंजन उद्योग राजधानी म्हणून उदयास आली.

**सूत्रबद्ध विकास**

गेल्या १०-१५ वर्षांच्या काळात मुंबई महानगरपालिका, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, सिडको इ. यंत्रणांच्या माध्यमातून मुंबईचा झपाट्याने, कायमस्वरूपी आणि दीर्घकाळ उपयोगी ठरणारा तसेच नागरिकांचे आयुष्य सुखकर करणारा विकास सूत्रबद्धरीत्या करण्यात आला.

संपूर्ण देशातील लोक रोजगार, स्वयंरोजगार मिळवण्यासाठी मोठ्या संख्येने मुंबईत दररोज येत असतात. इथली अपुरी जागा, लोकसंख्येत दररोज पडणारी भर, भौगोलिक रचनेमुळे विकासावर येणाऱ्या मर्यादा, वाढत्या लोकसंख्येला घर, पाणी, वीज, वाहतूक इ. सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देताना यंत्रणांवर पडणारा ताण, विकासकामे करताना भू-संपादन, पुनर्वसन, जुन्या इमारतींचा पुनर्विकास, झोपडपट्ट्यांचा प्रश्न, पर्यावरणाचे प्रश्न इ. साऱ्याच मर्यादांवर, अडचणींवर मात करत दुर्दम्य राजकीय इच्छाशक्ती, निर्णयक्षमता आणि ठोस अंमलबजावणी, यांना प्रशासन आणि नागरिकांची मिळालेली साथ या साऱ्यांच्या बळावर मुंबईच्या विकासाचे हे स्वप्न प्रत्यक्षात आलेले दिसत आहे.

**महानगर प्राधिकरण**

एमएमआरडीए अर्थात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण या संस्थेच्या माध्यमातून शासनाने बृहन्मुंबई, नवी मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी-निजामपूर व मिरा-भाईंदर या ७ महानगर पालिका, १३ नगरपरिषदा व ९०० च्या वर खेडी असा ४,३५५ चौरस कि.मी. क्षेत्राचा नियोजनबद्ध विकास घडवला.

**मुंबईतील वाहतूक**

रस्ते, हवाई, जल, रेल्वे इ. सर्व मार्गांची वाहतूक सुविधा, दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर, बंदर विकास, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सोयी-सुविधांनी युक्त विमानतळ, विमानतळापासून शहरात जलदपणे नेणारे गुळगुळीत रस्ते इत्यादी वैशिष्ट्यांनी युक्त मुंबईतील वाहतूक सुविधांच्या काही अभिमानास्पद नोंदी पुढीलप्रमाणे आहेत:


❐ इ.स. १८५३ - पहिले वाफेचे इंजिन-मुंबई ते ठाणे दरम्यान धावले, इ.स. १८७४ - पहिली ट्राम, इ.स.१९०७ - पहिली इलेक्ट्रिक ट्राम, इ.स. १९२५ - इलेक्ट्रिक इंजिन , इ.स. १९२६ - पहिली बेस्ट बस, इ.स. १९२८ - पहिले प्रवासी वाहतूक करणारे विमानतळ, इ.स. १९३७ - पहिली डबलडेकर बस , इ.स. १९९८ - नवीन एसी बस. ❐ देशातील पहिली मोनो रेल, स्वतंत्र भारतातील मुंबईची पहिली नवीन सार्वजनिक वाहतूक सेवा. ❐ वांद्रे-वरळी सागरी सेतू. ❐ देशातील पहिली जमिनीवर, भुयारातून व पुलावरून अशा तिन्ही मार्गांनी जाणारी मेट्रो. ❐ देशातील पहिला मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग.

❐ सहार उन्नत मार्ग- सिग्नलविरहित मार्ग ❐ १७ उड्डाण पूल, ३६ स्कायवॉक. ❐ आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ. ❐ मीलन रेल्वे ओव्हरब्रिज. ❐ उपनगरीय रेल्वे सेवा अंदाजे ७० लाख लोक उपनगरीय रेल्वेने दररोज प्रवास करतात. ❐ बेस्ट बस सेवा अंदाजे ३० लाख लोक बेस्ट बस, टॅक्सी, ऑटो, खाजगी वाहनाने दररोज प्रवास करतात. ❐ मुंबई पोर्ट ट्रस्ट, जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट ही दोन्ही बंदरे व्यापारी वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहेत. देशाच्या सागरी वाहतूकीपैकी ६० टक्के व्यापार जेएनपीटी मधून होतो.

**बहुउद्देशीय प्रकल्प**

महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (MUTP),मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (MUIP), मुंबई नागरी विकास प्रकल्प- फिरता निधी, वांद्रे-कुर्ला संकुलाचा विकास, महाराष्ट्र नागरी सुविधा निधी (MUIF), मुंबई मेट्रो व मोनो रेल इ. प्रकल्प राबविण्यात येत आहेत.

विविध प्रकल्पांमधून मुंबईचा चेहरा-मोहरा संपूर्णपणे बदलून शहराचे नवनिर्माण झाले आहे. १९११ ते २०१४ या शतकभराच्या वाटचालीत झालेले मुंबईचे नवनिर्माण देशाचा अभिमान ठरले आहे.



पूर्व द्रुतगती मार्ग, मुंबई

## मोनोरेल

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी उभारलेल्या देशातील पहिल्या मोनो रेलचे उदघाटन १ फेब्रुवारी २०१४ रोजी उद्‌घाटन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते झाले.

संत गाडगे महाराज चौक-वडाळा- चेंबूर अशी एकूण २० कि.मी. अंतर कापणारी मुंबई मोनोरेल ही देशातील पहिली मोनोरेल आहे. जागतिक स्तरावरची ही दुसऱ्या क्रमांकाची सर्वात जास्त लांबीची मोनो रेल सेवा.

संत गाडगे महाराज चौक-वडाळा-चेंबूर या मार्गावर मोनोची एकूण १७ स्थानके आहेत.

मोनोमध्ये ३ लाख प्रवासी प्रवास करू शकतात. या रेलचा वेग ताशी ३५ ते ८० कि.मी

आहे. दर तासाला ४ ट्रेन धावतात. त्यातून सुमारे २० हजार प्रवाशांची वाहतूक होते.

पहिला टप्पा – १ फेब्रुवारी २०१४ रोजी वडाळा डेपो, भक्ती पार्क, म्हैसूर कॉलनी, भारत पेट्रोलियम, फर्टिलायझर टाऊनशीप, व्ही.एन. पुरव अँड आरसी मार्ग, चेंबूर या ७ स्थानकांवर कार्यान्वित. प्रवासाचा कालावधी २० मि.

दुसरा टप्पा– संत गाडगे महाराज चौक (सात रस्ता) ते वडाळा, संत गाडगे महाराज चौक, लोअर परळ, मिंट कॉलनी, आंबेडकर नगर, नायगाव, दादर (पू), वडाळा ब्रिज, आचार्य अत्रे नगर, अँन्टॉप हिल, जीटीबी नगर अशी १० स्थानके. हा टप्पामार्च २०१५ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित. प्रवासाचा कालावधी –२५ मि.

**मनमोहक रचना**

प्रत्येक मोनोरेला ४ डबे आहेत. अहमदाबादच्या नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ डिझाइनच्या सहकार्याने आकर्षक रंगसंगती व अंतर्गत रचना. गुलाबी, निळा, पोपटी अशा तीन आकर्षक रंगांमध्ये मोनोरेल रंगविण्यात आली आहे. प्रत्येक डब्यात १८ प्रवासी बसून तर १२४ प्रवासी उभ्याने असे एका डब्यात १४४ प्रवासी व ४ डब्यात मिळून सुमारे ५६८ प्रवासी प्रवास करू शकतील. मोनोरेलमध्ये प्रथम वर्ग,द्वितीय वर्ग महिलांसाठी असे कुठलेही आरक्षण नाही.

मोनोरेलच्या कार्यान्वयनासाठी नेमण्यात आलेले तंत्रज्ञ व कर्मचारी २५० आहेत. त्यामध्ये ३४ स्टेशनमास्तर असून त्यापैकी ४ महिला आहेत. ४३ कॅप्टनमध्ये ३ महिला आहेत. नियंत्रण कक्षात २० कर्मचारी असून त्यात ४ महिला आहेत. मोनोचे सारथ्य करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक व टेलिकम्युनिकेशनचे प्रशिक्षण घेतलेल्या ४३ कॅप्टन्सची नियुक्ती करण्यात आली असून ते सर्व २२ ते २५ वयोगटातील तरुण–तरुणी आहे. त्यात पूजा केणी, सुषमा कऱ्हाड व जुईली भंडारे या तीन मराठी तरुणींचा समावेश आहे.

**सुरक्षा व्यवस्था**

शासनाने नव्यानेच सुरू केलेल्या महाराष्ट्र सुरक्षा बलाचे सुमारे ५०० जवान चेंबूर ते वडाळादरम्यान या सात स्थानकांत तीन पाळयांमध्ये सुमारे ११०० जवान तैनात असून यामध्ये महिला जवानांचाही समावेश आहे.

**स्थानकातील सुरक्षा व सुविधा**

मोनो स्थानकांची सुरक्षा मध्यवर्ती टेहळणी यंत्रणेच्या साहाय्याने केली जाणार आहे. सीसीटिव्ही कॅमेरे, मेटल व हँड डिटेक्टरची सोय करण्यात आली आहे.

**सहार उन्नत मार्ग – (पश्चिम द्रुतगती महामार्ग ते छत्रपति शिवाजी अंतरराष्ट्रीय विमानतळ)**

आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाण्यासाठी थेट मार्ग उपलब्ध नसल्यामुळे या उन्नत मार्गाचे नियोजन करण्यात आले होते. या मार्गामुळे आता विमानतळाकडे जलद आणि सहज पोहोचणे शक्य होणार



## स्मार्ट मुंबई

■ मोनोरेल- चेंबूर-वडाळा-मोनो कॉरिडॉरचा पहिला टप्पा पूर्ण. मोनोरेल सेवा सुरू. ■ १७ उड्डाणपूल, ३६ स्कायवॉक प्रवाशांसाठी खुले. ■ १२ नवे मार्ग, पश्चिम द्रुतगती मार्ग आणि पूर्व द्रुतगती मार्गांचे काम पूर्ण. ■ पूर्व मुक्त मार्गाचा पहिला आणि दुसरा टप्पा वाहतुकीसाठी खुला. तिसरा टप्पा पूर्णत्वाच्या मार्गावर. ■ मीलन रेल्वे उड्डाणपूल वाहतुकीला खुला. या उड्डाणपुलामुळे पूर्व-पश्चिम जोडणी शक्य झाली असून पावसाळ्यातील वाहतूक कोंडीवर कायमचा तोडगा. ■ सहार उन्नत (एलिव्हेटेड) मार्गामुळे आंतरराष्ट्रीय विमानतळ थेट पश्चिम द्रुतगती मार्गाला दोन्ही बाजूंच्या वाहतुकीने जोडले गेले. ■ २५ हजार सार्वजनिक शौचालये. ■ वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स आणि पवई येथे ध्वनिरोधक. ■ वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर मेट्रो कॉरिडॉरमुळे वर्सोवा ते घाटकोपर दरम्यान प्रवासाला लागणारा वेळ ७० मिनिटांवरुन २० मिनिटांवर. मेट्रो रेल्वेची प्रवासी क्षमता १,१७८. ■ सांताक्रुझ-चेंबूर जोडमार्गामुळे पूर्व-पश्चिम उपनगरांची जोडणी. हा मार्ग ५० हजारांहून अधिक वाहनांसाठी उपयुक्त. प्रकल्पग्रस्त कुटुंबांचे पुनर्वसन पूर्ण. ■ विस्तारित मुंबई उरण पायाभूत प्रकल्पामध्ये २७५ किलोमीटरहून अधिक लांबीच्या रस्त्यांचा विकास. यात १४ उड्डाणपूल, ३ खाडी पूल आणि २ रेल्वे उड्डाणपुलांचा समावेश. प्रकल्पातील पनवेल, वाघबीळ, मानपाडा, पाटलीपाडा हे उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुले. ■ कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो रेल कॉरिडॉर प्रकल्पामधून उत्तर-दक्षिण भागांची जोडणी. सध्या उपनगरीय रेल्वेसेवा नसलेल्या क्षेत्रांनाही याचा लाभ. प्रकल्पासाठी निविदा मागविण्यात आल्या आहेत. ■ विरार-अलिबाग कॉरिडॉर (१२६ किमी), टप्पा-१- विरार (नवघर) ते चिरनेर (जेएनपीटी) ७९ किमी. या ८ वाहिका असलेल्या कॉरिडॉरमध्ये बीआरटीएस, मेट्रो, मोटारवाहतूक आणि बिगर-मोटार वाहतुकीसाठी स्वतंत्र वाहिका (लेन). ■ अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारण्यात येईल. ■ भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक उभारण्यात येईल.



मोनो रेल

आहे. हा मार्ग आंतरराष्ट्रीय प्रवास करणाऱ्यांना पश्चिम द्रुतगती महामार्गापासून आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंत थेट पोहोचवणार आहे.

उन्नत मार्गाची लांबी २.२० कि.मी. असून रुंदी २७.६ मीटर एवढी आहे. या मार्गावर जाण्या-येण्यासाठी प्रत्येकी तीन मार्गिका असतील. या शिवाय विमानतळाच्या दिशेने जाण्यासाठी दक्षिण मुंबईकडून आणि उत्तर मुंबईकडून प्रत्येकी दोन मार्गिका उपलब्ध असतील. त्याचप्रमाणे विमानतळाहून पश्चिम द्रुतगती महामार्गाकडे नेण्याऱ्या तीन मार्गिका असतील.

आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या दिशेने धावणारा हा मार्ग बांधून होण्यापूर्वी दरम्यानचा प्रवास पूर्ण करण्यासाठी ४०-४५ मिनिटे लागायची. कारण विमानतळापर्यंत पोहोचण्यासाठी अरुंद रस्त्यांवरून संभाजी नगर, राजाराम वाडी, एन.ए.डी. कॉलनी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, बामणवाडा, सहार पोस्ट ॲण्ड टेलिग्राफ कॉलनी, जी.व्ही.के. कॉलनी, अतिव्यस्त सहार रोड असा प्रवास करणे आवश्यक होते. मात्र, या सिग्नलरहित उन्नत मार्गामुळे हे अंतर ४-५ मिनिटात कापणे सहज शक्य होईल.

हा प्रकल्प उभारताना प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन, विविध सरकारी जमिनी उपलब्ध नसणे, वाहतुकीचे नियमन आणि जमिनीखालील सेवावाहिन्या अशा अनेक

समस्यांना तोंड द्यावे लागले. अनेक सेवा वाहिन्या हलवाव्या लागल्या. अनेक नवीन टाकाव्या लागल्या. या शिवाय प्रकल्पापासून रन-वे अतिशय जवळ असल्यामुळे कामाच्या वेळेवरही अनेक बंधने येणे स्वाभाविक होते.

या प्रकल्पातील १३०० मीटर लांबीचा उन्नत मार्ग वेळेआधीच पूर्ण करणे शक्य झाले. मात्र, उर्वरित प्रकल्प पूर्ण करताना पुनर्वसनाच्या अनुषंगाने विविध समस्या आणि अडचणी निर्माण झाल्या. या अडचणींवर मात करून प्राधिकरणाने ७५० हून अधिक कुटुंबांबरोबरच बुद्धविहार, चर्च आणि मंदिर अशा धार्मिक स्थळांचेही पुनर्वसन केले.

प्राधिकरणाने जमिनीखालील अनेक सेवा हलविल्या आणि बामणवाडा व आंबेडकर नगर येथे नवीन उपलब्ध करून दिल्या.

या उन्नत मार्गामुळे पश्चिम द्रुतगती महामार्गावरील आणि विशेषतः अंधेरी -कुर्ला जंक्शनवरील वाहतुकीचा ताण बऱ्याच अंशी कमी झाला आहे.

**अत्याधुनिक तंत्रज्ञान**

जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत उभारण्यात येत असलेला हा उन्नत मार्ग अत्याधुनिक तंत्रज्ञान पद्धतीने बांधण्यात आला आहे.

या उन्नत मार्गामुळे अंधेरी (पूर्व) परिसरातील जंक्शन आणि रस्त्यांवरील वाहतूक कोंडी सुटण्यास मदत होईल. अंतर, प्रवासाचा वेळ, इंधन, वाहनांवर होणारा खर्च आणि प्रदूषण कमी होण्यास साहाय्य होईल.

**- मीनल जोगळेकर**


टी-२ टर्मिनल, सांताक्रुझ, मुंबई

## मेट्रो सुसाट

- अत्याधुनिक मेट्रो मुंबईकरांच्या सेवेत दाखल
- वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर या मार्गावर मेट्रो रेल्वे सुरू.
- पहिला टप्पा ११.४ किमी.
- वर्सोवा-घाटकोपर अंतर २० मिनिटात.
- ४ डब्यांची मेट्रो ११७८ प्रवासी वाहून नेणार.



मुंबई मेट्रो

# मेट्रो : लई भारी...




घाटकोपर ! नव्यानं सुरू झालेल्या मेट्रो रेल्वेचं स्टेशन. मेट्रोचा प्रवास अनुभवण्यासाठी पोहचलो. तिकिटासाठी स्त्रिया, पुरुष, विद्यार्थी यांची भली मोठी रांग! रांगेत उभा राहिलो! आजूबाजूला पाहिलं. प्रशस्त स्थानक. जागोजागी सूचना फलक, सुरक्षा पथक तैनात. चहा-कॉफी, आईस्क्रीमचे स्टॉल. स्थानकही आकर्षक रंगानं सजवलेलं. लोकांची गर्दी सुरूच ! कुणी एक्स्लेटरवरुन, कुणी लिफ्टचा वापर करुन तर तरुण मुलं पायऱ्यांवरून जात येत होते, लोकांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

मेट्रोमध्ये सारे प्रवासी सारखेच ! कार्पोरेट क्षेत्रात काम करणारे उच्चपदस्थ अधिकारी असो की कंपनीतील काम करणारे कामगार ! सारे एकाच डब्यात ! कमीत कमी वेळेत पोहोचण्यासाठी, आरामशीर प्रवासासाठी मेट्रो उपयुक्त ठरत आहे. त्यामुळेच ही मेट्रोराणी आता मुंबईच भूषण ठरली आहे.

नुकतीच मेट्रो सुरू झाल्यानं सारे प्रवाशी नवखे! मेट्रो कशी असेल याबद्दल उत्सुकता शिगेला पोहोचलेली ! तिकिट नव्हे टोकन मिळाले आणि प्लॅटफॉर्मकडे निघालो. पुन्हा प्लॅटफार्मवर लोकांची रांग दिसली. एका मशीनला टोकन लावून आत गेलो. कुणीतरी बोललं की, हे टोकन सांभाळून ठेवा. हरवलं की, बाहेर पडता येणार नाही! प्लॅटफॉर्मवर आलो, इंडिकेटरवर नजर गेली. गाडी येण्यास ५ मिनिटे होती.

आकाराने मोठा असलेला डबा प्रवाशांनी फुल्ल भरला होता. बाहेर प्रचंड गर्मी आणि घामाने त्रस्त होऊन आत आलेला प्रवासी वातानुकुलीत डबा बघून खूश दिसत होता. गाडी सुरू होताच मोबाइलचे फ्लॅश चमकले. कुणी आपल्या मित्राचे फोटो घेत होता तर कुणी बाहेरचे फोटो घेत होता. काचेतून खाली डोकावून पाहिलं तर वाहनांची गर्दी, माणसांनी फुलून गेलेले रस्ते दिसत होते. मुंबई दर्शन घडत होते. प्रत्येकजण डब्यातील सूचना वाचत होता. उत्सुकतेनं हात लावून बघत होता. कुणी मोबाइलवरून आपल्या मित्रांना, घरच्यांना मेट्रोत बसलो, मस्त आहे म्हणून सांगत होता. काहींना तर विमानातून प्रवास करीत असल्याचे जाणवत होते. त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद स्पष्ट दिसत होता. घाटकोपरहून निघालेली मेट्रो शेवटच्या स्टेशनावर थांबली. दरवाजा उघडला. मुंबईकर पटापट बाहेर पडले. एकूण ११.४० किलोमिटरचा हा प्रवास २१ मिनिटांत पूर्ण झाला होता. उत्सुकतेनं काही प्रवाशांशी संवाद साधला. बांद्र्याच्या कविता नायर यांना हा प्रवास खूपच आरामदायी वाटला. मेट्रो आणखी वेगवेगळ्या भागात सुरू कराव्यात, अशी त्यांची इच्छा दिसली. क्रॉफर्ड मार्केटचे रहिवाशी मेहमूदभाई म्हणाले, 'ऐरोप्लेनमे बैठे हो ऐसा लगा.' कल्याणहून मुलासोबत मेट्रोत बसण्यासाठी आलेल्या देवराव आणि हौसाबाई या आई-वडिलांना गावाकडच्या आगीनगाडीपेक्षा मेट्रो लई भारी वाटली. ठाण्याला नोकरी करणाऱ्या रेश्माला, ठाणे ते सीएसटी अशी मेट्रो सुरू व्हावी असे वाटले. अशा विविध वयोगटातील प्रवाशांच्या प्रतिक्रिया बोलक्या आणि उत्साहवर्धक होत्या. हा प्रवास माझ्यासाठी अविस्मरणीय ठरला.



अशी ही मुंबईकरांसाठी तिसरी लाइफलाइन म्हणजे मुंबईच्या शिरपेचातील मानाचा तुराच होय. स्वच्छ फलाट, विक्रेत्यांची गर्दी नाही. चहा, कॉफी, आईस्क्रिमचे स्टॉल, जागोजागी सुरक्षा व्यवस्था, लोकलसारखा आवाज नाही. रेटारेटी नाही. प्रत्येक स्थानकावर लावलेली रेखाचित्रे लक्षवेधी वाटली. त्यामुळं स्थानकांना एक नवा लुक मिळाला. डब्यात सारे प्रवासी सारखेच ! कार्पोरेट क्षेत्रात काम करणारे उच्चपदस्थ अधिकारी असो की कंपनीतील काम करणारे कामगार !सारे एकाच डब्यात ! कमीत कमी वेळेत पोहोचण्यासाठी, आरामशीर प्रवासासाठी, उपयुक्त ठरत आहे. त्यामुळेच ही मेट्रो आता मुंबईचं भूषण ठरली आहे.

**- संभाजी खराट**

# गुंतवणुकीत अग्रेसर, रोजगारात आघाडी

राज्याने औद्योगिक विकासाची प्रगती सातत्याने राखल्याने औद्योगिक गुंतवणुकीत आणि रोजगार निर्मितीतही महाराष्ट्र देशभरात अग्रेसर आहे. विदेशी थेट गुंतवणूक वाढीसाठी मानके शिथिल करण्यात आली असून माहिती तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, विशेष आर्थिक क्षेत्र, विशाल प्रकल्प, द्राक्ष प्रक्रिया याबाबतच्या अनुकुल धोरणांचा परिणाम राज्यातील आद्योगिक क्षेत्राचा विकास वाढवण्यासाठी झाला आहे. उत्तम दर्जाच्या पायाभूत सुविधा, विपुल नैसर्गिक साधनसंपत्ती, सर्व महत्त्वाच्या प्रदेशांशी दळणवळण सुविधा, कुशल मनुष्यबळ यामुळे नवीन उद्योग उभारण्यासाठी महाराष्ट्र हे उद्योजकांची पहिली पसंती असणारे राज्य आहे.

भविष्यातील गरज, सर्वांगीण प्रगती आणि औद्योगिक विकासात आघाडी कायम राहावी यासाठी शासनाने पहिले औद्योगिक धोरण १९९३ मध्ये जाहीर केले. त्यानंतर १९९५,२००१ व २००६ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या औद्योगिक धोरणांची यशस्वी अंमलबजावणी केली. त्यात काही बदल करून २०१३ मध्ये नवीन औद्योगिक धोरण जाहीर करण्यात आले.

**उद्योजकांची प्रथम पसंती असलेले राज्य अशी महाराष्ट्राची ओळख आहे. नवीन औद्योगिक धोरणाची निर्मिती, विशाल प्रकल्प धोरण, ॲडव्हँटेज विदर्भ, विशेष आर्थिक क्षेत्र, दिल्ली मुंबई इंडस्ट्रीयल कॉरिडॉर प्रकल्प यासारख्या योजनांची यशस्वी अंमलबजावणी करून राज्याने औद्योगिक क्षेत्रातील घोडदौड कायम राखली आहे. देशभरात थेट परकीय गुंतवणुकीमध्ये अव्वल असलेल्या महाराष्ट्राने औद्योगिक उत्पादनाच्या वाढीबरोबरच रोजगार निर्मितीला प्राधान्य दिल्याने राज्याचा समतोल आर्थिक विकास होण्यास मदत झाली आहे.**

या धोरणात लघु व मध्यम उद्योजकांचा प्राधान्याने विचार करण्यात आला आहे. ग्रामीण व मागासभागात रोजगाराची निर्मिती, राज्याचा समतोल विकास हे नव्या औद्योगिक धोरणाचे मूलभूत सूत्र आहे. त्या माध्यमातून ५ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित करणे, नव्याने २० लाख रोजगार निर्मिती करणे, उत्पादन क्षेत्रात १२ ते १३ टक्के वाढ साध्य करणे, राज्यातील एकूण जीडीपी मध्ये उत्पादन क्षेत्राचा सहभाग २८ टक्क्यांपर्यंत वाढविणे हे या धोरणाचे लक्ष्य आहे.

केंद्र शासनाकडे सादर झालेल्या औद्योगिक प्रस्तावांमध्ये देशभरात सर्वाधिक प्रस्ताव असणारे राज्य म्हणून महाराष्ट्राने प्रथम क्रमांक मिळविला आहे. ऑगस्ट



विशाल प्रकल्प धोरणांतर्गत रु. ३.२१ लाख कोटींच्या गुंतवणुकीसहित ४०३ महाप्रकल्प मंजूर. त्यामधून ३.५७ लाख व्यक्तींना रोजगार मिळणे अपेक्षित. ११४ प्रकल्पांमध्ये उत्पादन सुरू.

देशातील सर्वाधिक थेट परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात आकर्षित. ऑगस्ट १९९१ पासून मार्च २०१२ पर्यंत रु. ९७,७९९ कोटींच्या थेट परकीय गुंतवणुकीचे ४,२४६ प्रस्ताव राज्यात मंजूर. राष्ट्रीय गुंतवणुकीचा हा २३ टक्के हिस्सा. यापैकी २००० थेट परकीय गुंतवणूक प्रकल्पात रु. ४९,७७६ कोटींच्या गुंतवणुकीसह उत्पादन सुरू.



असोसिएटेड चेंबर ऑफ कॉमर्स संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात देशामध्ये महाराष्ट्र औद्योगिक गुंतवणुकीमध्ये पहिल्या क्रमांकाचे राज्य ठरले आहे. या सर्वेक्षणानुसार महाराष्ट्राने गुजरातला मागे टाकले आहे. डिसेंबर २०१३ पर्यंत महाराष्ट्रात १४ लाख ७३,४६६ कोटींचे गुंतवणुकीचे प्रस्ताव आले तर, गुजरातमध्ये १३ लाख ९८,३४७ कोटींचे प्रस्ताव आले. महाराष्ट्र हे सेवा, ऊर्जा उद्योगांचे प्रमुख केंद्र बनले असून २०१३ मध्ये ६७ हजार कोटींची गुंतवणूक झाली आहे.

१९९१ ते नोव्हेंबर २०१२ या कालावधीत प्राप्त एकूण औद्योगिक प्रस्तावांमध्ये महाराष्ट्राचे प्रस्ताव सर्वाधिक १७.९ टक्के इतके असून त्या खालोखाल गुजरात ११.९ टक्के, तमिळनाडू ९.१ टक्के ,आंध्रप्रदेश ८.१ टक्के तर उत्तर प्रदेशचे ७.८ टक्के एवढे प्रमाण आहे. रोजगार निर्मितीतही महाराष्ट्राची टक्केवारी सर्वाधिक १९.८ इतकी असून गुजरात ९.६ टक्के, तमिळनाडू १०.८ टक्के, आंध्रप्रदेश ६.६ टक्के तर उत्तर प्रदेश ८.८ टक्के इतके प्रमाण आहे.

**थेट विदेशी गुंतवणुकीत महाराष्ट्र अव्वल**

देशात सर्वाधिक थेट विदेशी गुंतवणुकीत महाराष्ट्र अव्वल आहे. ऑगस्ट १९९१ ते मार्च २०१२ या कालावधीत थेट विदेशी गुंतवणुकीच्या देशभरातील एकूण प्रकल्पांपैकी २०.६ टक्के प्रकल्प महाराष्ट्रातील आहेत. त्यातील गुंतवणूक २२.९ टक्के आहे. यापैकी ४५ टक्के प्रकल्प कार्यान्वित झाले असून १० टक्के प्रकल्पांची अमंलबजावणी सुरू आहे. अमेरिका आणि मॉरिशस हे महाराष्ट्राच्या औद्योगिक क्षेत्रात विदेशी गुंतवणूक करणारे प्रमुख देश आहेत.

**समतोल प्रादेशिक विकास**

मुंबई, पुणे व ठाणे या औद्योगिक पट्ट्यातील उद्योगांचे विकेंद्रीकरण करण्याकरिता आणि औद्योगिकदृष्ट्या विकसनशील व मागासभागात उद्योग आकर्षित होण्यासाठी समतोल प्रादेशिक विकासावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. यासाठी औद्योगिक विशाल प्रकल्प धोरण जाहीर करण्यात आले आहे. या धोरणानुसार आतापर्यंत ४०३ विशाल प्रकल्पांना मान्यता देण्यात आली आहे. त्यातील आश्वासित गुंतवणूक ३ लाख २२ हजार कोटी इतकी असून ३.५७ लाख लोकांना रोजगार अपेक्षित आहे. ११४ प्रकल्पांमध्ये उत्पादन सुरू झाले आहेत. विशाल प्रकल्प धोरणांतर्गत देशी-विदेशी गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर राज्यात आकर्षित झालेली आहे. जनरल मोटर्स, वोक्सवॅगन, डेमलर क्रायसलर, सॅनी हेवी इंडस्ट्रिज, ब्रिज स्टोन, एल. जी. इलेक्ट्रॉनिक्स, मायको बॉश, बोईंग, इम्सोफर मॅन्युफॅक्चरिंग, हुंडाई हेवी इंडस्ट्रिज, पियाजियो व्हेईकल्स,पोस्को, कॉर्निंग इंडिया लि., विप्रो, जे एस डब्ल्यू, न्यू हॉलंड फियाट,अल्ट्राटेक सिमेंट, गुड इयर्स, पर्कीन्स, बेकर्ट, जी इंडीया, भारत डायनॅमिक्स, स्कोडा ऑटो, फोटॉन मोटर्स, मर्सिडिज, लोरीयल इंडिया, सिएट,

- भविष्यकाळात अधिकाधिक एसईझेड (स्पेशल इकॉनॉमिक झोन) क्षेत्र अधिसूचना रद्द करण्याचा अथवा त्यातून अंग काढून घेण्याचा पर्याय निवडतील अशी शक्यता असल्याने एका सुयोग्य निर्गम (एक्झिट) धोरणाची आखणी. या योजनेखाली अधिसूचित केलेल्या एकूण औद्योगिक क्षेत्राच्या किमान ६० टक्के क्षेत्रफळ औद्योगिक विकासासाठी आणि उर्वरित ४० टक्के क्षेत्रफळ पायाभूत कामांच्या विकासासाठी वापरले जाईल .यात निवासी तसेच व्यावसायिक कामे करण्यात येतील.

## प्रेरणादायी यश



## आजारी उद्योगांना नवसंजीवनी

आजारी लघुउद्योगांच्या पुनरुज्जीवनासाठी असलेल्या योजनेचा लाभ पुणे जिल्ह्यातील शिरूर येथील अस्फा बोर्ड लिमिटेड या कंपनीच्या धीरेन मेहता यांनी घेतला आणि त्यातून त्यांनी स्वत:चा उद्योगच सावरला नाही तर अनेकांना काम मिळवून दिले. प्रतिकूल परिस्थितीत या योजनेने श्री. मेहता यांच्या सारख्या उद्योजकांना वेळेवर वित्तीय साहाय्य करून आजारी उद्योगांना नवसंजीवनी देण्याचे काम केले आहे.

श्री. मेहता यांच्या अस्फा बोर्ड कंपनीच्या माध्यमातून पेपर मिल चालविण्यात येते. त्यातून इन्श्युलेशन पेपर तसेच पॉलिश पेपरसाठी लागणाऱ्या बेस पेपरची निर्मिती होते. या कंपनीला दोन वर्षांपूर्वी मोठ्याप्रमाणावर आर्थिक तोटा झाल्याने ते विक्रीकराची रक्कम एकरकमी भरू शकले नाहीत. यामुळे कंपनीवर कारवाईची नोटीस संबंधित विभागाने दिली होती. परंतु श्री. मेहता यांना आजारी लघुउद्योगांना पुनरुज्जीवनासाठी देण्यात येणाऱ्या सवलत योजनेचा लाभ घेण्याचे सुचविण्यात आल्याने त्यांनी उद्योग संचलनालयाकडे याचा पाठपुरावा केला. त्यांना या योजनेचा फायदा मिळाला. त्यामुळे विक्रीकर विभागाकडून श्री. मेहता यांना विक्रीकराची रक्कम एकरकमी भरण्याऐवजी समान हप्त्यात भरण्याची सवलत मिळाली. परिणामी मेहता यांची कंपनी बंद न पडता सुरू राहीली आणि त्या कंपनीत काम करणाऱ्या सुमारे ५० जणांचा रोजगार कायम राहीला. आजारी उद्योगांच्या पुनरुज्जीवनासाठी असलेल्या सवलतींमुळे राज्यातील अनेक छोट्या- मोठ्या उद्योगांना उभे राहण्यासाठी पाठबळ मिळाले आहे.

कॅनपॅक, टेट्रापॅक, बजाज ऑटो, टाटा ऑटो कॉम्प, एस सी ए हायजीन,इन्व्हेटीस लि. अल्फा लावल, एबीइनबेव्ह इंडिया,भूषण स्टील इत्यादी कंपन्यांनी राज्यात गुंतवणूक केली आहे. १ एप्रिल २०१३ ते २७ फेब्रुवारी २०१४ पर्यंत ९७२५ कोटी रुपये गुंतवणुकीच्या २५ नवीन विशाल प्रकल्पांना मान्यता देण्यात आली आहे. त्यातून १३७२१ व्यक्तींना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

**मागास भागासाठी विविध सवलती**

नवीन औद्योगिक धोरणात विदर्भासह मागास भागासाठी विविध सवलती देण्यात आल्या आहेत. विदर्भाचा औद्योगिक विकास व्हावा, विशाल प्रकल्प आकर्षित होऊन स्थानिक लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हावी आणि विदर्भात गुंतवणुकीच्या संधी उद्योजकांपुढे अधिक प्रभावीपणे मांडता याव्यात यासाठी नागपूर येथे फेब्रुवारी २०१३ मध्ये 'ॲडव्हाँटेज विदर्भ' ही औद्योगिक क्षेत्रातील गुंतवणूकदारांची परिषद आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये १४,८३८ कोटी रुपये अपेक्षित गुंतवणूकीचे २८ करार करण्यात आले. या परिषदेत पहिल्याच दिवशी १८ हजार ४६१ कोटी रुपये गुंतवणुक प्रस्तावांचे सामंजस्य करार करण्यात आले. त्यापैकी ५ प्रकल्पांचे उत्पादन सुरू झाले असून त्यातील प्रत्यक्ष गुंतवणूक रुपये ६९२ कोटी इतकी आहे. विदर्भात प्रथमत: सार्वजनिक क्षेत्रातील नामांकित कंपनीने भंडारा जिल्ह्यात ५०० कोटी गुंतवणूकीच्या प्रकल्पाची उभारणी सुरु केली आहे .

**ॲडव्हाँटेज विदर्भ**

ॲडव्हाँटेज विदर्भमध्ये गुंतवणूक करणाऱ्या कंपन्यांमध्ये मध्ये भेल, अंबूजा सिमेंट, माणिकगड सिमेंट, अंबा आर्यन, धारीवाल इन्फ्रास्ट्रक्चर, सूर्यलक्ष्मी कॉटन मील, रेमंड्स यूको डेनिम व भूषण स्टील या उद्योग समूहांचा समावेश आहे. विदर्भामध्ये पायाभूत सुविधांसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाद्वारे ४५० कोटी रुपये अंदाजित खर्चाच्या कामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. अमरावती टेक्सटाइल पार्कमध्ये औद्योगिक सांडपाणी प्रकल्पाव्यतिरिक्त बुटीबोरी येथील पायाभूत सुविधा व नांदगावपेठ येथील टेक्सटाइल पायाभूत सुविधांचा यामध्ये समावेश आहे. वस्त्रोद्योग क्षेत्रातील गुंतवणुकदार विदर्भाकडे टेक्सटाइल हब म्हणून पाहत आहेत. शासनाने नव्या वस्त्रोद्योग धोरणात उद्योजकांना पूरक सवलती दिल्यामुळे उद्योजक विदर्भाकडे आकर्षिले जात आहेत.

**विशेष आर्थिक क्षेत्र**

आर्थिक वाढीस चालना मिळण्यासाठी राज्याने फेब्रुवारी २००६ पासून विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) धोरण स्वीकारले आहे. नोव्हेंबर २०१२ पर्यंत राज्यात विशेष आर्थिक क्षेत्राबाबत २३४ प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्यापैकी १२४ प्रस्तावांना केंद्र शासनाकडून मान्यता देण्यात आली असून त्यापैकी ६४ प्रस्ताव अधिसूचित झाले आहेत. राज्यात मध्ये ३१ डिसेंबर २०१२ रोजी १०८३६ कोटी रुपये गुंतवणुकीच्या १७ विशेष आर्थिक क्षेत्रांची अमंलबजावणी २.४२१ हेक्टर क्षेत्रावर झाली आहे. त्याद्वारे जवळपास ८.५० लाख रोजगार निर्मिती झाली आहे.

**छोटे व मध्यम उद्योग क्षेत्र**

केंद्र शासनाच्या 'सूक्ष्म व लघुउपक्रम समूह विकास योजनेंतर्गत राज्यातील ३० समूह विकास प्रकल्पांना मंजुरी मिळाली आहे. यातून ४५० कोटींची गुंतवणूक व ८०,००० लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे.

**– काशीबाई थोरात**

## 'दिल्ली– मुंबई इंडस्ट्रियल कॅारिडॉर'


'दिल्ली– मुंबई इंडस्ट्रियल कॅारिडॉर'मुळे राज्यात विकासाचे नवे पर्व सुरू होत आहे. हा कॉरिडॅार महाराष्ट्रासह उत्तर प्रदेश, दिल्ली, हरयाणा, राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश या सहा राज्यांतून प्रवास करून मुंबईतील जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टला येऊन मिळणार आहे. या प्रकल्पांत सहा राज्यांचा समावेश असला तरी याबाबतचा करार करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले आहे.

या प्रकल्पांतर्गत महाराष्ट्राचे १७ टक्के क्षेत्र येत असून मुंबई, ठाणे, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अहमदनगर, धुळे, नंदुरबार आणि रायगड हे जिल्हे औद्योगिकदृष्ट्या देशाच्या राजधानीशी जोडले जातील. या प्रकल्पातंर्गत येऊ घातलेली उद्योगक्षेत्रे आंतरराष्ट्रीय दर्जाची आहेत. औरंगाबाद येथील शेंद्रा–बिडकीन औद्योगिक शहर, एक्झिबिशन–कम–कन्व्हेन्शन सेंटर, कर्माड येथे मल्टी–मोडल लॉजिस्टिक्स पार्क, शेंद्रा पाणीपुरवठा योजना हे प्रकल्प या करारान्वये विकसित होणार असून या प्रकल्पातून सुमारे ३ लाख ३० हजार नवीन रोजगारनिर्मिती अपेक्षित आहे. जागतिकस्तरावर एवढ्या भव्य प्रमाणातील हा पहिलाच प्रकल्प आहे. दिल्ली–मुंबई इंडस्ट्रिअल कॉरिडॉरच्या दुसऱ्या टप्प्यात दिघी पोर्ट इंडस्ट्रिअल एरिया, धुळे मेगा इंडस्ट्रिअल पार्क, नाशिक–सिन्नर–इगतपुरी इन्व्हेस्टमेंट रिजन, मल्टीनोडल लॉजिस्टिक्स पार्क, अहमदनगर येथे ग्रीनफिल्ड मेगा सिटी हे प्रकल्प उभे राहतील.

या कॉरिडॉरमुळे परिणामकारक आणि कार्यक्षम तंत्रज्ञान असणारी परिवहन व्यवस्था, अखंडित ऊर्जा पुरवठा या बाबी साध्य होतील.

### महाराष्ट्रातील डीएमआयसी प्रकल्प

नाशिक - मेगा इंडस्ट्रियल पार्क
धुळे - मेगा इंडस्ट्रियल पार्क
शेंद्रा - बिडकीन - मेगा इंडस्ट्रियल पार्क
दिघी - न्यू पोर्ट इंडस्ट्रियल सिटी.



# वस्त्रोद्योग - समृद्धीची नवी संधी

महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक कापूस उत्पादन करणारे राज्य आहे. राज्यात दरवर्षी सुमारे ९२ लाख गाठी कापसाचे उत्पादन होते. उत्पादित होणाऱ्या संपूर्ण कापसावर राज्यातच प्रक्रिया व्हावी या दृष्टीने नवीन वस्त्रोद्योग धोरण आखण्यात आले. या धोरणाच्या माध्यमातून येत्या पाच वर्षात सुमारे ४० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. त्यामुळे सुमारे ११ लाख नवे रोजगार निर्माण होतील. कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या कापसालाही वाढीव भाव मिळेल.

**प्रभावी अंमलबजावणी**

वस्त्रोद्योग धोरणाची प्रभावी अंमलबजावणी सुरू असून अनेक नामवंत उद्योजकांनी राज्यात गुंतवणूक केली आहे.

वस्त्रोद्योग धोरणातील भांडवली तसेच व्याज अनुदान योजनांचा लाभ मिळविण्यासाठी वस्त्रोद्योजकांना आतापर्यंत प्रारंभी केंद्र शासनाच्या Technology Upgradation Fund Scheme (टफ) योजनेतून विशिष्ट (यूआयडी) क्रमांक मिळवणे आवश्यक होते. पण आता ही अट रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे वस्त्रोद्योजकांना अनुदान योजनांचा लाभ राज्य शासनामार्फत थेट दिला जाईल. त्यामुळे राज्यात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करणे अधिक सुलभ होईल.

**सहकारी, खाजगी उद्योजकांना सवलती**

या धोरणात सहकाराबरोबरच खाजगी उद्योजकांनाही गुंतवणुकीसाठी मोठ्या सवलती देण्यात आल्या आहेत. कापूस उत्पादित होणाऱ्या विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र या क्षेत्रात प्रक्रिया उद्योग उभारणीसाठी १० टक्के भांडवली सवलत व ७ टक्क्यांपर्यंत व्याज सवलत असा दुहेरी लाभ दिला जात आहे. उर्वरित महाराष्ट्रात प्रक्रिया उद्योग उभारल्यास व्याज सवलत दिली जात आहे. याशिवाय उद्योग धोरणांतर्गत दिल्या जाणाऱ्या सवलतींचाही वस्त्रोद्योग घटकांना लाभ मिळेल. वस्त्रोद्योजकांना १० टक्के भांडवली अनुदान देणारे महाराष्ट्र हे पहिले आणि एकमेव राज्य असून त्याचा राज्यातील विदर्भ, मराठवाडा व खानदेश येथे गुंतवणूक करणाऱ्या वस्त्रोद्योजकांना लाभ होत आहे.

**टेक्सटाइल पार्क्समार्फत वस्त्रोद्योगाला चालना**

वस्त्रोद्योगाला चालना देण्यासाठी राज्यात १४ टेक्सटाइल पार्क्सना मंजुरी देण्यात आली

**वस्त्रोद्योग धोरण हे महाराष्ट्राच्या द्रष्टेपणाचे उदाहरण ठरले आहे. उत्पादित होणाऱ्या संपूर्ण कापसावर राज्यातच प्रक्रिया व्हावी या दृष्टीने हे धोरण आखण्यात आले. हे धोरण समतोल आणि सर्वंकष असे आहे. या धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी सुरू असून नामवंत उद्योजकांनी राज्यात मोठी गुंतवणूक केली आहे. या धोरणाच्या माध्यमातून येत्या पाच वर्षात मोठी गुंतवणूक अपेक्षित आहे. त्यामुळे असंख्य नवे रोजगार निर्माण होतील. कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या कापसालाही वाढीव भाव मिळेल.**

वस्त्रोद्योग धोरणांतर्गत १३३१ प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली यातून सुमारे १२ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे. त्यामुळे १ लाख बेरोजगारांना रोजगार मिळणार आहे.



- वस्त्रोद्योग क्षेत्रात रु. ४०,००० कोटींची नवीन गुंतवणूक आकर्षित करणे आणि २०१६-१७ पर्यंत ११ लाख नवे रोजगार निर्माण करणे यासाठी वैशिष्ट्यपूर्ण वस्त्रोद्योग धोरण जाहीर.
- विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्र या भागांमध्ये विस्तार प्रकल्प आणि नव्या वस्त्रोद्योग एककांसाठी १० टक्के भांडवल सबसिडी दिली जाणार.
- यंत्रमागाच्या उन्नतीकरणासाठी केंद्राच्या साहाय्यासोबतच राज्याचे आणखी १० हजार रुपयांचे अर्थसाहाय्य.
- विदर्भातील मागास भागांचा औद्योगिक विकास करण्यासाठी ॲडव्हान्टेज विदर्भ २०१३ या चर्चासत्राचे आयोजन.
- कापड उद्योग क्षेत्रात १८०० कोटींच्या गुंतवणुकीसाठी सामंजस्य करार.
- केंद्र शासन पुरस्कृत योजनेंतर्गत राज्यात १४ एकात्मिक वस्त्रोद्योग पार्कांना मंजुरी. २०१२-१३ या आर्थिक वर्षात ८ वस्त्रोद्योग पार्कांसाठी रु. ४० कोटी मंजूर.

आहे. यापैकी ११ टेक्सटाइल पार्क्सना एकूण ४५ कोटी रुपयांचे अर्थसाहाय्य वितरित करण्यात आले आहे. केंद्र शासनामार्फत टेक्सटाइल पार्क्सना प्रकल्प किमतीच्या ४० टक्के किंवा ४० कोटी रुपयांपर्यंत तर राज्य शासनामार्फत प्रकल्प किंमतीच्या ९ टक्के किंवा ९ कोटी रुपयांपर्यंत अनुदान दिले जात आहे.

**कापसापासून कापडापर्यंत**



जिनिंग, प्रेसिंग, विव्हिंग, निटिंग, डाईंग, यंत्रमाग, हातमाग, टेक्निकल टेक्स्टाइल, रेडीमेड गार्मेंट आदी सर्व प्रकारच्या प्रक्रिया उद्योगांना चालना देऊन 'कापसापासून कापडापर्यंत' सर्व प्रक्रिया राज्यातच करून उद्योग आणि रोजगार वाढवणारे हे महत्त्वाकांक्षी धोरण आहे.

वस्त्रोद्योग धोरणाच्या माध्यमातून जास्तीत जास्त गुंतवणूक कापूस उत्पादक क्षेत्रात आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. याचाच एक भाग म्हणून अहमदाबाद येथे वस्त्रोद्योजकांची परिषद घेऊन महाराष्ट्राच्या वस्त्रोद्योग धोरणाचे सादरीकरण करण्यात आले. या धोरणाने प्रभावीत होऊन गुजरातेतील अनेक उद्योजकांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यात स्वारस्य दाखविले आहे. मुंबईतील हॉटेल ताज येथेही अशी परिषद घेण्यात आली होती.

> अनुसूचित जाती, जमाती, अल्पसंख्याक यंत्रधारकांना आधुनिकीकरणासाठी १० टक्के भांडवल सबसिडी.

राज्यात वस्त्रोद्योग क्षेत्रात साधारण ४० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आणण्याचे तसेच त्या माध्यमातून सुमारे १२ ते १५ लाख लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्याचे राज्य शासनाचे उद्दिष्ट आहे. या धोरणातील भांडवली अनुदान व व्याज अनुदान योजनांचा लाभ कापूस उत्पादक विदर्भ, मराठवाडा व खानदेश या भागाला मोठ्या प्रमाणात होत आहे. राज्यातील उर्वरित भागातील वस्त्रोद्योजकांना व्याज अनुदान मिळत आहे.

**– इर्शाद ल. बागवान**



## एक एक धागा विणताना...

यंत्रमाग व्यवसायात अनेक अडचणी आणि आव्हाने उभी असताना, इचलकरंजीसारख्या यंत्रमाग नगरीत यंत्रमाग व्यवसायाचा कोणताही वारसा नसताना खामकर टेक्सटाईल्सने केवळ चार वर्षात निर्भेळ यश मिळवले आहे. या टेक्सटाईल्सच्या मालक सुनीता उदय खामकर यांनी मुलांच्या शिक्षणासाठी आर्थिक उत्पन्न वाढावे, यासाठी चार वर्षांपूर्वी एखादा उद्योग उभारण्याचा विचार केला. त्यांचे पती उदय खामकर व्यवसायाने इलेक्ट्रॉनिक इंजिनिअर. त्यांनी पत्नीला भक्कम पाठिंबा दिला आणि जिल्हा उद्योग केंद्राच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या विचारांना दिशा दिली.

बँकेचे आर्थिक सहकार्य घेत ४ हजार चौरस फूट जागा त्यांनी घेतली. त्यामध्ये ३६ लूमचे बांधकाम केले. पहिल्या वर्षी २४ लूम आणि दुसऱ्या वर्षी उर्वरित ८ लूम त्यांनी घेतले. आज खामकर यांच्याकडे ११ कामगार आहेत. पहिले वर्ष या व्यवसायातील धडे गिरवण्यातच गेले. सर्व गोष्टी नवीन होत्या. अगदी प्राथमिक गोष्टीही शिकावयाच्या होत्या. पण, नंतरची गेली ३ वर्षे मात्र त्यांचा व्यवसायात चांगलाच जम बसला आहे. इचलकरंजीसारख्या प्रत्येक घरी यंत्रमाग कारखाने असणाऱ्या ठिकाणी खामकर यांच्या व्यवसायाची उलाढाल जवळपास १ कोटीपेक्षा जास्त होत आहे. याबद्दल सुनीता खामकर म्हणाल्या, ''आम्ही तयार सूत विकत घेतो. त्यातून आमच्या कारखान्यात महिन्याला १८ ते १९ हजार मीटर कापडाची निर्मिती होते. त्याचा वापर मुख्यत: कॉटन साडी बनविण्याकरिता होतो. या यशाचे गमक म्हणजे आम्ही कामगारांना घरातील सदस्यच मानतो. त्यामुळे सुरुवातीला लागलेले कामगार आजही टिकून आहेत.''

भविष्यात आणखी रॅपिअर, एअर जेट लूम असे परदेशी बनावटीचे लूम आणण्याचा मानस खामकर यांनी व्यक्त केला.

**- संप्रदा द. बीडकर**

# उत्कृष्ट रस्ते: बदलता महाराष्ट्र

राज्याच्या विकासाची मजबूत पायाभरणी पायाभूत सुविधांमुळे शक्य होते. विकासाला गती देण्यासाठी रस्ते, महामार्ग, पूल, दळणवळणाची सुविधा या पायाभूत सुविधांच्या उभारणीत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत गेल्या अनेक वर्षात भरीव कार्य करण्यात आले आहे.

३९ हजार ८०० खेडी बारमाही रस्त्यांनी जोडण्यात आली आहेत. ग्रामीण वस्त्या व पाडे यांना शहरांशी जोडण्याची मोहीम घेण्यात आली. नक्षलग्रस्त भागात रस्ते आणि पूल मोठ्या प्रमाणात बांधण्यात आले आहेत.

खाजगीकरणाच्या माध्यमातून रस्ते व पुलांची बांधकामे करण्याबाबत सर्वसाधारण धोरण शासनाने ठरवले आहे. शहरीकरण, नागरीकरण, कृषी आणि औद्योगिकीकरणामुळे ज्या रस्त्यांवर वाहतुकीची वर्दळ जास्त आहे, अशा ठिकाणांच्या रस्त्यांचा विकास खाजगीकरणातून करण्यात येतो.

रस्त्यांच्या एकूण लांबीपैकी दोन टक्क्यांपेक्षाही कमी लांबीच्या रस्त्यांवर सध्या पथकर शुल्क वसुली सुरू आहे. राज्यातील ९८ टोल स्थानकांवर स्वच्छतागृहे असून उर्वरित ठिकाणी स्वच्छतागृहे बांधण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही सुरू आहे. टोल वसुलीच्या कालावधीत रस्त्याच्या देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी संबंधित उद्योजकाची असून त्या कालावधीत त्यांनी रस्त्याची देखभाल व दुरुस्ती केली नाही तर टोलवसुलीस स्थगिती दिली जाते. अशा प्रकरणी दहा नाक्यांवर टोल वसुलीस स्थगिती देण्यात आली होती. कालावधी संपुष्टात आल्यामुळे राज्यातील ६७ टोल नाक्यांवर टोल वसुली बंद करण्यात आली आहे.

**रस्त्यांच्या चौपदरीकरणाचे काम वेगात**

रस्त्यांच्या चौपदरीकरणाचे काम वेगात सुरू आहे. सध्या १३९ विविध रस्त्यांच्या प्रकल्पांची कामे सुरू आहेत. त्याचप्रमाणे १६६३ लहान व मोठ्या पुलांचे बांधकाम देखील पूर्ण करण्यात आले आहे.

नाबार्ड कर्ज साहाय्य योजनेंतर्गत रस्ते

**राज्यामध्ये रस्ते विकासाला मोठ्या प्रमाणात प्राधान्य देण्यात आले. त्यामुळे शहरी आणि ग्रामीण भागात रस्त्यांचे जाळे निर्माण झाले. दळणवळणाच्या सोयी वाढल्याने विकास प्रक्रियेला गती आली आहे. समृद्धी आणि प्रगतीच्या नव्या संधी उपलब्ध होत आहेत. उत्तम रस्त्यांमुळे महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलला आहे.**

राज्यातल्या २ लाख ३७ हजार ५०० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची बांधणी, देखभाल आणि दुरुस्ती करण्यात आली. चौपदरीकरणातून २३ जिल्ह्यांना जोडण्याचे काम गेल्या १० वर्षात झाले.



सुधारणेची कामे हाती घेण्यात आली आहेत. त्यामधून १०७७६ कि.मी. रस्ते लांबीची सुधारणा करण्यात आली. १०७६ पूल व ३४४० मोऱ्यांची कामे पूर्ण करण्यात आली. नक्षलग्रस्त भागामध्ये २९ कामे मंजूर असून यामधून ४६८.८६ कि.मी.रस्ते लांबीची सुधारणा व ६ मोठ्या पुलांची कामे केली जातील. त्यापैकी १३ कामे पूर्ण झाली असून १३ कामे प्रगतिपथावर आहेत.

**शासकीय कार्यालयांचे बांधकाम**

तालुक्याच्या ठिकाणी सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत, जेणेकरून तालुक्याच्या ठिकाणी येणाऱ्या ग्रामीण भागातील जनतेला त्यांच्या कामासाठी वेगवेगळ्या कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही. त्यांना अर्थिक भुर्दंड सोसावा लागणार नाही यासाठी शासनाने कालबद्ध कार्यक्रम आखला आहे. ८६ तालुक्याच्या ठिकाणी प्रस्तावित इमारतींची कामे पूर्ण झाली असून ७७ ठिकाणी कामे प्रगतिपथावर आहेत. त्यामध्ये ग्रामीण रुग्णालये, नागरी इस्पितळे, कर्मचाऱ्यांची निवासस्थाने न्यायालयीन इमारती, न्यायाधीश व कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने, अर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुले/मुलींची वसतिगृहे, मुलां/मुलींकरिता बालगृहे / सुधारगृहे, व कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने, आदिवासी क्षेत्रातील मुलांमुलींकरिता आश्रमशाळा तसेच वसतीगृहे, तंत्रशाळा, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व तंत्रनिकेतन या कामांचा समावेश आहे. विभागामार्फत खाजगीकरणाच्या माध्यमातून नवी दिल्ली येथे नवीन महाराष्ट्र सदन उभारण्यात आले. अंधेरी येथे परिवहन विभाग कार्यालय आणि मुंबई येथे हाय माऊंट विश्रामगृहाचे काम प्रगतिपथावर आहे.

> ३९ हजार ८०० खेडी बारमाही रस्त्यांनी जोडण्यात आली. ग्रामीण वस्त्या व पाडे यांना शहरांशी जोडण्याची मोहीम घेण्यात आली. नक्षलग्रस्त भागात रस्ते आणि पूल मोठ्या प्रमाणात बांधण्यात आले.



**उड्डाणपूल**

पायाभूत सुविधा उभारण्यासाठी भरीव कामगिरी करण्यात आली आहे. महामार्गांचे चौपदरीकरण, उड्डाणपूल, खेड्यांना जोडणारे रस्ते यामुळे महाराष्ट्रात विकासाची गंगा गावोगावी पोहोचवण्याचे काम रस्त्यांनी आणि त्यावरील उड्डाणपुलांनी केले आहे. महानगरांमध्ये करण्यात आलेल्या उड्डाणपुलांमुळे वाहतुकीची कोंडी नाहीशी झाली आहे.

**– अजय जाधव**



## नाशिकचा उड्डाणपूल

देशात महत्त्वाचा मानला जाणारा, भारतातील तिसऱ्या क्रमांकाचा पूल अशी नाशिक येथे नव्याने तयार करण्यात आलेल्या उड्डाणपुलाची ओळख झाली आहे. राष्ट्रीय महामार्ग क्र. ३ वरील सहापदरीकरण प्रकल्पातंर्गत नाशिक शहरातून गेलेला ६.१ किलोमिटर लांबीचा एलिवेटेड कॉरिडॉर या उड्डाणपुलामुळे जिल्ह्याच्या विकासाला गती मिळाली आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्र.३ च्या पिंपळगांव-नाशिक-गोंदे या ६० किमी मार्गावर ६ पदरी रस्त्याचे बांधकाम पूर्ण झाले आहे. या मार्गाची प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे हा एलिवेटेड कॉरिडॉर या डिझाइनचा राज्यातील सर्वाधिक लांबीचा उड्डाणपूल आहे. या पुलासाठी १७२ पिलरवर प्रत्येकी १२ सेग्मेंट अशा एकूण २०६४ सेग्मेंट आहेत. भारतात तिसऱ्या क्रमांकाच्या लांबीचा हा कॉरिडॉर आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अशा प्रकारचा पूल यापूर्वी बँकॉकमध्ये बनवण्यात आला आहे.

या उड्डाणपुलामुळे नाशिक शहरातून १२ पदरी रस्ता वाहतुकीसाठी तयार झाला आहे. मुंबई नाका ते आडगाव नाकादरम्यानचा हा उड्डाण पूल ४ पदरी आहे. त्याच्या खाली पुलाला लागून ग्रेड रोड दोन्ही बाजूंनी ४ पदरी आहे. त्याच्या बाजूला सर्व्हिस रोड चार पदरी आहे.

या उड्डाणपुलामुळे नागपूर, भोपाळ, आग्रा, औरंगाबाद, पुणे, गुजरातकडून मुंबईच्या दिशेने जाणारी आणि मुंबई या भागाकडे जाणारी वाहतूक नशिक शहरातून न जाता शहराबाहेरून वळवली गेली. त्यामुळे शहरांतर्गत पडणाऱ्या वाहतुकीवरील ताण कमी झाला आहे. अपघाताचे प्रमाण घटले आहे. नाशिक शहरातून न जाता थेट मुंबईकडे जाणाऱ्या वाहनांच्या प्रवासाच्या वेळेत अर्धा तास बचत झाली आहे. वेगवान वाहतुकीसाठी हा उड्डाणपूल फायदेशीर ठरला असून शहराच्या सौंदर्यातही त्यामुळे भर पडली आहे.

या उड्डाणपुलाव्यतिरिक्त दोन मुख्य पूल व ११ छोटे पुलही महामार्गावर आहेत. याव्यतिरिक्त ३४ बस थांबे व ४ ठिकाणी अवजड वाहनांसाठी स्वंतत्र छोटी लेन आहे. स्ट्रेटेड डिझाइन (पुलाखालील आडव्या दांड्या) मुळे वजन पेलण्याची क्षमता वाढते. या पुलाचे आयुष्य १०० वर्ष आहे.

# सर्वांसाठी निवारा

घर खरेदी व्यवहारात सर्वसामान्य नागरिकाची फसवणूक होण्याची शक्यता असते. बांधकाम व्यावसायिकांकडून ग्राहकाची फसवणूक टाळण्यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन व विकास) अधिनियम, २०१२ मंजूर करण्यात आला आहे. या अधिनियमांतर्गत गृहनिर्माण नियामक प्राधिकरण व अपिलीय न्यायाधिकरणाची, स्थापना करण्यात येणार आहे. असा कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. या नवीन अधिनियमामुळे गृहनिर्माण क्षेत्रात अधिक पारदर्शकता येऊन ग्राहकांचे हित जपले जाईल. कारण घर खरेदी करारातील अटी व शर्तीचे पालन होईल याबाबतची खात्री गृहनिर्माण नियामक प्राधिकरणाद्वारे केली जाणार आहे. त्यामुळे एखाद्या प्रकरणात नियमांचे उल्लंघन झाल्यास नियामक प्राधिकरणाला संबंधितांना कायद्यातील तरतुदीनुसार दंड अथवा शिक्षा करण्याचे अधिकार आहेत.

**विकास नियंत्रण नियमावलीत बदल**

शासनाने नुकताच मुंबई विकास नियंत्रण नियमावली ३३ (५) या कलमात बदल केला आहे. या बदलामुळे विकासकाकडून प्रिमियम ऐवजी तयार घरे घेण्यात येणार आहेत. मुंबईतील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींना २.५ ऐवजी तीन चटईक्षेत्र निर्देशांक देण्याच्या निर्णयामुळे म्हाडाच्या ५६ वसाहतीतील जवळपास ३७०० इमारतींच्या पुनर्वसनाचा मार्ग सुकर होणार आहे.

**झोपडपट्टीमुक्त मुंबई**

मुंबई शहर झोपडपट्टीमुक्त व्हावे यादृष्टीने शासनाने निर्णय घेतले आहेत. या निर्णयानुसार १ जानेवारी २००० रोजी अस्तित्वात असलेली झोपडी मोफत घरास पात्र ठरणार आहे. यामुळे मुंबईतील सुमारे तीन लाख झोपड्या संरक्षित होणार असून १५ लाख लोकांना हक्काचे घर प्राप्त होणार आहे.

**धारावी झोपडपट्टीचा विकास**

मुंबईतील धारावी झोपडपट्टीचा विकास करण्याच्या योजनेस शासनाने प्रारंभ केला आहे. यानुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या निकषानुसार पात्र झोपडीवासीयांचे धारावीमध्ये पुनर्वसन करण्यात येणार आहे. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या प्रकल्पांतर्गत एकूण ५ सेक्टर असून येथील झोपडपट्ट्या, चाळी, जुन्या इमारती, व्यापारी व उद्योगधंद्यातील गाळे यांचा

**झपाट्याने नागरीकरण होत असलेले महाराष्ट्र हे अग्रगण्य राज्य आहे. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे उदरनिर्वाहासाठी ग्रामीण भागातील लोक शहरात स्थलांतर करू लागले. त्यामुळे या जनतेला घरे पुरवणे हे शासनापुढील आव्हान होते. वाढती लोकसंख्या व घरांची निर्मिती यांचा ताळमेळ राखणे हे आव्हानच आहे. मात्र शासनाने सर्व बाबींचा सखोल विचार करून लोकहिताचे व गृहनिर्माण क्षेत्राच्या विकासासाठी पूरक असे निर्णय घेतले आहेत.**

शहरी गरिबांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणारी योजना मुंबई, पुणे, पिंपरी चिंचवड, नाशिक, नागपूर आणि नांदेड या शहरांमध्ये राबवण्यास सुरुवात झाली आहे. या योजनेमुळे सामान्य माणसांच्या घराचे स्वप्न पूर्णत्वास जात आहे.



एकत्रित पुनर्विकास करण्यात येणार आहे.

या प्रकल्पातील सेक्टर क्रमांक ५ चा पुनर्विकास महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणांतर्गत करण्यात येत आहे. सेक्टर ५ मध्ये म्हाडाच्या मालकीच्या भूखंडावर पहिल्या टप्प्यातील स्टिल्ट + १८ मजल्याच्या एका इमारतीचे बांधकाम वेगाने सुरू आहे. या इमारतीमध्ये पुनर्वसनाच्या ३५६ सदनिका तयार होणार आहेत.

**मानीव अभिहस्तांतरणाची विशेष मोहीम**

विकासकाने एखाद्या इमारतीचे बांधकाम पूर्ण केल्यानंतर चार महिन्याच्या आत सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नावे इमारतीखालील जमिनीचे अभिहस्तांतरण करणे आवश्यक आहे. शासनाने २००८ मध्ये सुधारणा करून मानीव अभिहस्तांतरणाची तरतूद नव्याने अंतर्भूत केली. या तरतुदीनुसार विकासकाने जमिनीचे हस्तांतरण विहित कालमर्यादेत संस्थेकडे न केल्यास संस्थेला मानीव अभिहस्तांतरणासाठी सक्षम प्राधिकारी यांच्याकडे अर्ज करता येईल.

**समूह विकास**

मुंबईच्या पुनर्विकासाचे स्वप्न वास्तवात आणण्यासाठी समूह विकासाची संकल्पना उपयुक्त ठरणार आहे. नवी मुंबई शहरातील गावठाण व गावठाणाभोवती बांधलेल्या बांधकामांचा समूह पद्धतीने नागरी शहर पुनर्निर्माण योजनेच्या माध्यमातून विकास करण्यात येणार आहे. त्यामुळे रस्ते, नागरी पायाभूत सुविधा, खुल्या जागा, शाळा व इतर सामाजिक सुविधा उपलब्ध होतील. प्रकल्पग्रस्तांच्या राहणीमानात सुधारणा होईल. या योजनेचा फायदा सुमारे वीस हजार कुटुंबांना मिळेल. सिडको अथवा नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत नागरी पुनर्निर्माण योजनेमध्ये गावठाण व सभोवतालच्या क्षेत्राचे सीमांकन निश्चित करून नागरी पुनर्निर्माण आराखडा तयार करण्यात येणार आहे.

**ठाण्यातील गृहनिर्माण**

ठाणे येथील अनधिकृत बांधकामे, तीस वर्षापेक्षा जास्त वयाची अधिकृत बांधकामे आणि तीस वर्षापेक्षा कमी वयाच्या सर्व धोकादायक इमारती व झोपडपट्ट्या नागरी पुनर्निर्माण समूह योजनेत समाविष्ट केल्या जातील. नागरी पुनर्निर्माण योजनेचा लाभ सुमारे ५.५० लक्ष लोकांना होईल. समूह विकास योजनेंतर्गत मुंबईतील भेंडीबाजार प्रकल्पासही नुकतीच मान्यता देण्यात आली आहे.

मुंबईतील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकर प्राप्त (सेस) इमारतींच्या दुरुस्तीसाठी इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाला शासनाकडून दरवर्षी १०० कोटी रुपये अनुदान मिळते. आता या रक्कमेत वाढ करण्यात आली असून ती २०० कोटी रुपये करण्यात आली आहे.

**– शांताराम शेरवाडे**



❒ बंद पडलेल्या गिरण्यांच्या जमिनीवर घरे बांधून गिरणी कामगारांना ६९२५ सदनिकांचे वाटप. या सदनिकांची किंमत केवळ रु. ७.५० लाख. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनातील २२ हुतात्म्यांच्या कायदेशीर वारसांना मोफत घरे.
❒ २००० सालापर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण.
❒ ग्राहकांच्या तक्रारींचा निवाडा करण्याच्या हेतूने महाराष्ट्र हाऊसिंग (रेग्युलेशन अँड डेव्हलपमेंट), अधिनियम २०१२ पारित. यामुळे गृहनिर्माण क्षेत्रातील बांधकाम, विक्री, हस्तांतरण अशासारखे व्यवहार कायदेशीर आणि पारदर्शक.
❒ हाऊसिंग रेग्युलेटरी ॲथॉरिटी आणि ॲपिलेट ॲथॉरिटीमुळे गृहनिर्माण क्षेत्रातील ग्राहकांच्या तक्रारींचा निपटारा गतीने शक्य.

सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांना विकासकांकडून जमिनीसंदर्भातील कायदेशीर हक्क प्रदान करण्यासाठी अभिमत हस्तांतरणासाठी विशेष अभियान. यामुळे सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांना वाढीव चटईक्षेत्र, इमारतीचा पुनर्विकास इत्यादींसाठी भविष्यकाळात फायदे. याचा लाभ लाखो सहकारी संस्थांना.



## हक्काचे घर

मुंबईतील ज्या भागात गिरण्या मोठया संख्येने होत्या त्या भागाला गिरणगाव म्हटले जायचे. १९८१-८२ मध्ये गिरणी कामगारांनी संप केला. कालांतराने हा उद्योग अडचणीत आला. मुंबईतील गिरण्या बंद पडल्या. बंद पडलेल्या गिरण्यातील कामगारांना दिलासा देऊन त्यांना हक्काचे घर देण्याचा शासनाने निर्णय घेतला.

म्हाडाकडे गिरणीकामगारांचे १,४८,८६७ अर्ज प्राप्त झाले आहेत. ६९२५ घरकुलांसाठी कामगारांच्या प्राप्त झालेल्या ५०२२२ अर्जामधून गिरणीनिहाय सोडत काढण्यात आली. या सोडतीद्वारे आतापर्यंत ४,६१५ कामगारांना घराचे वितरण करण्यात आले आहे.

दुसऱ्या टप्प्यांतर्गत वरळी येथील सेंच्युरी मिल व इतर पाच गिरण्यांच्या जमिनीवर गिरणी कामगारांसाठी सदनिका व संक्रमण शिबिर बांधण्याच्या प्रकल्पाचे भूमिपूजन नुकतेच करण्यात आले. या गृहबांधणी प्रकल्पांतर्गत सेंच्युरी मिल- वरळी,रुबी मिल- दादर, प्रकाश कॉटन मिल- लोअर परळ, ज्युबिली मिल- शिवडी, भारत मिल- लोअर परळ, वेस्टर्न इंडिया मिल- काळाचौकी या पाच गिरण्यांचा समावेश आहे. या गिरण्यांच्या जमिनीवर एकूण ३८४५ सदनिका बांधण्यात येणार असून त्यातील २६१० गिरणी कामगारांसाठी तर १२३५ सदनिका संक्रमण शिबिरासाठी बांधण्यात येणार आहेत.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीत प्राणाची आहुती देणाऱ्या सुमारे २२ गिरणी कामगारांच्या एका वारसदारासाठी घर देण्यात येणार आहे.

# बंदरांचा विकास

महाराष्ट्रातील बंदरे जागतिक व्यापाराची महत्त्वाची केंद्रे आहेत. देशातील सर्वाधिक ५१ बंदरे महाराष्ट्रात आहेत. केंद्र सरकारने देशातील महत्त्वाच्या बंदरांच्या विकासाचा कार्यक्रम हाती घेतला आहे. त्यासाठी खासगी उद्योगांचे सहकार्य घेण्यात येत आहे. राज्य शासनाने गेल्या वर्षी ग्रीनफील्ड पोर्ट पॉलिसी मंजूर केली. त्यामुळे राज्यातील बंदर विकासाची प्रक्रिया वेगवान झाली आहे. बंदर क्षेत्रात गुंतवणूक आणि उद्योग आकर्षित व्हावेत व त्याद्वारे राज्याच्या औद्योगिक प्रगतीस चालना मिळावी, ह्या दृष्टीने २०१० मध्ये नवीन बंदर विकास धोरण जाहीर करण्यात आले.

नव्या धोरणानुसार बंदरांना प्रथमच उद्योगाचा दर्जा देण्यात आला आहे. खासगी उद्योगाच्या सहकार्याने बंदर विकास केला जाईल. त्यासाठी सरकारने नवे मॉडेल स्वीकारले आहे. यात बांधणी, मालकी, वापरणे, सहयोग आणि हस्तांतर यांचा समावेश आहे. या तत्त्वानुसार बंदर विकास वेगाने व्हावा म्हणून विकासकांना पुढील ५० वर्षे विविध सवलती देण्यात आल्या आहेत. बंदर विकासकांना गौणखनिजावरील रॉयल्टीमधून सूट, मुद्रांक शुल्कातून सूट, वीज शुल्कातून सूट देण्यात आली आहेत. या धोरणानुसार रेवस-आवरे, दिघी, आंग्रे विजयदुर्ग, रेडी या सहा बंदरांचा विकास करण्यात येत आहे.

**तरंगती जेट्टी**

रायगड जिल्ह्यातील मांडवा हे महत्त्वाचे प्रवासी बंदर आहे. गेटवे ऑफ इंडिया ते मांडवा अशी प्रवासी जलवाहतूक होते.

**महाराष्ट्राला लाभलेल्या ७२० किलोमीटरच्या लांबीच्या समुद्रकिनाऱ्याने पर्यटन व्यवसायाला चालना दिली आहे. या समुद्र किनाऱ्यामुळे देशातील सर्वाधिक बंदरे असण्याचा मान राज्याला मिळाला आहे. जागतिक व्यापाराचे महत्त्वाचे केंद्र म्हणून या बंदरांची ओळख आहे. शासनाने बंदरांना प्रथमच उद्योगाचा दर्जा देत बंदर विकासासाठी नवीन धोरण तयार केले आहे. राज्यांतर्गत जलमार्गामधून माल आणि प्रवासी वाहतूक वाढावी यासाठी महाराष्ट्र मेरिटाइम बोर्डाने विविध पावले उचलली. यामध्ये जेट्टींचे बांधकाम, जलक्रीडा केंद्रे आदींचा समावेश आहे. जलक्रीडा पर्यटन प्रकल्पांमुळे रोजगार-स्वयंरोजगाराला चालना मिळाली आहे.**



बंदर क्षेत्रात गुंतवणूक आणि उद्योग आकर्षित व्हावेत व त्याद्वारे राज्याच्या औद्योगिक प्रगतीस चालना मिळावी, यासाठी २०१० मध्ये नवीन बंदर विकास धोरण जाहीर करण्यात आले. या धोरणानुसार बंदरांना प्रथमच उद्योगाचा दर्जा देण्यात आला आहे.

❑ रत्नागिरी जिल्ह्यातील जयगड खाडीत प्रवासी रो-रो फेरी सेवा सुरू. जयगड (तालुका रत्नागिरी) आणि तवसाळ (तालुका गुहागर) जोडले गेल्याने ही सेवा स्थानिक आणि पर्यटकांसाठी फायद्याची. ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील किनारा पर्यटनाला चालना देण्यासाठी १३० उद्योजकांच्या वॉटर स्पोर्टस प्रकल्पांना परवानगी. ❑ मांडवा येथील नवीन प्रवासी जेट्टी आणि टर्मिनल इमारत मार्च २०१२ मध्ये जनतेसाठी खुली. ❑ दरवर्षी १०-१२ लाख प्रवाशांना लाभ. रत्नागिरी जिल्ह्यातील आंग्रे बंदर कार्यान्वित. रायगड जिल्ह्यातील दिघी बंदराचा एक टप्पा कार्यान्वित. यामुळे माल हाताळणीत दरवर्षी ५० लाख टनांची वाढ. ❑ दुय्यम बंदरातील माल हाताळणीत १४.८ कोटी टनांपासून २० कोटी टनांपर्यंत वाढ. ❑ प्रवासी जेट्टींची १२२ कामे पूर्ण. याचा लाभ किनाऱ्यावरील जनतेला.

दरवर्षी सुमारे १० लाख प्रवासी ह्या जलमार्गावरून प्रवास करतात. प्रवाशांच्या सोयीसाठी गेटवे ऑफ इंडिया येथील जलप्रवासी वाहतुकीच्या समस्येवर मात करण्यासाठी नजीक असलेल्या रेडीओ क्लब येथे पर्यटकांकरिता तरंगती जेट्टी व प्रवासी सुविधा उभारण्यात येत आहे.

**मालवण बंदर**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण बंदरात शिवकालीन सिंधुदुर्ग किल्ला, समुद्रकिनारे आणि इतर पर्यटन स्थळे पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांकरिता प्रसाधनगृह, प्रतिक्षालय, वाहनतळ, उपहारगृह या मूलभूत सुविधा पुरवण्यासाठी मास्टर प्लॅन तयार करण्यात आला आहे. सिंधुदुर्ग किल्ला पाहण्यासाठी जाणाऱ्या पर्यटकांना किल्ल्याजवळ बोटीतून चढ-उतार करताना होणाऱ्या अडचणी दूर करण्याकरिता २५० मीटर लांब प्रवासी जेट्टी बांधण्यात येत आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील जयगड खाडीमध्ये आणि तवसाळ (ता. गुहागर) या दोन गावांदरम्यान जलप्रवासी वाहतूक सुरु करण्यात आली असून त्याद्वारे रत्नागिरी आणि गुहागर हे दोन तालुके जोडले गेले आहेत. त्यामुळे रस्तामार्ग प्रवासाचे सुमारे ६० किलो मीटर अंतर कमी झाले आहे. त्याचा फायदा स्थानिक जनतेबरोबरच कोकणात येणाऱ्या पर्यटकांनाही होत आहे. किनारी पर्यटनाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र मेरीटाइम बोर्डने ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये पर्यटकांच्या संरक्षणासाठी आवश्यक उपाययोजना केल्या आहेत.

**समुद्रधूपप्रतिबंधक उपाययोजना**

समुद्रधूपप्रतिबंधक उपाययोजना म्हणून राज्याच्या किनारपट्टीनजीक वास्तव्य करणाऱ्या जनतेच्या जीवित व मालमत्तेचे समुद्राच्या लाटांच्या माऱ्यांपासून संरक्षण करण्यासाठी समुद्रधूपप्रतिबंधक उपाययोजनांकरिता किनारा संरक्षण व व्यवस्थापन प्रकल्प २०१० ते २०१९ या कालावधीत तीन टप्प्यांत राबविण्यात येणार आहे.

केंद्र शासनाने धूपप्रतिबंधक उपाययोजनांकरिता २०११-१२ ते २०१४-१५ या कालावधीतकरिता रु. २०५ कोटी इतका निधी मंजूर केला असून, त्यातून सुमारे ४० किमी. लांबी संरक्षित करण्यासाठी ११० कामे हाती घेण्यात येणार आहेत. सद्य:स्थितीत, किनारपट्टीवरील मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या सहा जिल्ह्यांमध्ये २६ कामे पूर्ण झाली आहेत. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, महाराष्ट्र मेरिटाइम बोर्डने एकूण २३५०८ मासेमारी नौकांची ऑनलाइन नोंदणी केली असून हे काम ९५ पूर्ण झाले आहे.

**किनारपट्टीवर अत्याधुनिक रस्त्यांचे जाळे**

बंदरांच्या विकासासाठी अंतर्गत पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी विकासकांवरच सोपविली असल्याने बंदरांच्या विकासाबरोबर या संपूर्ण किनारपट्टीवर अत्याधुनिक रस्त्यांचे जाळे उभे राहणे शक्य झाले आहे. बंदर विकासावर भर देण्यात आल्याने लहान बंदरातून २००९ -१० मध्ये झालेल्या १२.५ दशलक्ष टन इतक्या मालहाताळणीत वाढ होऊन ती २०१३ -१४ मध्ये २५ दशलक्ष टन इतकी झाली आहे. जलमार्गाने प्रवास करणाऱ्यांची संख्या २००९ -१० मध्ये १६.९ दशलक्ष इतकी होती ती २०१३ -१४ मध्ये १७.८ दशलक्ष इतकी झाली आहे.

**- काशिबाई थोरात**



## फेरीबोटीचा प्रवास

रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील डॉ. चंद्रकांत मोकल यांनी सुवर्णदुर्ग शिपिंग सर्व्हिसेसमार्फत जिल्ह्यात फेरीबोट सेवा सुरू केली आहे. जिल्ह्यातील जयगड, दाभोळ व बाणकोट (वेश्वी) या ठिकाणी ही वाहतूक सेवा सुरू करण्यासाठी महाराष्ट्र मेरीटाइम बोर्ड, यांच्याकडून परवानगी देण्यात आली आहे. दाभोळ खाडीत धोपावे ते दाभोळ, बाणकोट खाडीमध्ये वेश्वी ते कोडमांडला, आणि जयगड खाडीत जयगड ते तवसाळ अशा फेरीबोट सेवा सध्या सुरू आहेत.

ही सेवा सुरू झाल्यापासून सुमारे ५० ते ६० किलोमीटरचे अंतर कमी झाले असून सुमारे ३ ते ४ तासांचा वेळ कमी झाला आहे. यामुळे प्रवाशांचा वेळ व पैसा वाचला आहे. रस्त्यावरील वाहतुकीचा ताण कमी झाला आहे. फेरीबोटींची माल व प्रवासी वाहतुकीची क्षमता मोठ्या प्रमाणात आहे. या फेरीबोटीद्वारे प्रवासी व दुचाकी, तीन चाकी, कार, ट्रक, बसेस इत्यादीची वाहतूक केली जाते. दिवसाला साधारणत: ७०० ते ८०० प्रवासी व पर्यटन हंगामात १४०० ते १५०० प्रवासी तसेच अंदाजे ११ ते १२ गाड्यांची वाहतूक होते. वेश्वी ते कोलमांडला या फेरीबोटमध्ये गेल्या पाच वर्षामध्ये ९,५४,१४९ इतक्या प्रवाश्यांचा चढउतार झाला. दाभोळ ते धोपावे या फेरीबोटीमध्ये गेल्या पाच वर्षात १५,१२,२०६ इतक्या प्रवाशांचा चढउतार झाला. जयगड ते तवसाळ फेरिबोटीद्वारे गेल्या दोन वर्षात ५,३३,३३८ प्रवाशांचा चढउतार झाला. अशा प्रकारे फेरीबोटीला उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

**- डॉ. गणेश मुळे**

मराठा-मुस्लीम समाज अरक्षण

# सामाजिक न्यायाचा नवा अध्याय

**२००१ च्या जनगणनेनुसार राज्यातील एकूण लोकसंख्येतील मुस्लिमांचे प्रमाण १०.६ टक्के आहे. तसेच मराठा समाजाचे प्रमाण ३२ टक्के आहे. सर्वसाधारणपणे लोकसंख्येच्या प्रमाणाच्या निम्मे आरक्षण दिले जाते. त्यानुसार मुस्लिमांसाठी ५ टक्के आणि मराठा समाजासाठी १६ टक्के आरक्षण देण्यात आले आहे.**



**राज्यातील मराठा समाजाला १६ टक्के तर मुस्लीम समाजाला ५ टक्के आरक्षण देण्याचा महत्त्वाचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला. हे आरक्षण शैक्षणिक संस्थांसाठी आणि शासकीय नोकऱ्यांसाठी लागू असेल व सध्याच्या ५२ टक्के आरक्षणाच्या व्यतिरिक्त असेल. या आरक्षणास उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअरचे) तत्त्व लागू होईल. या निर्णयाची अंमलबजावणी तत्काळ करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी दिली.**

## मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण

मराठा समाजाला आरक्षण देताना Educationally & Socially Backward Category (ESBC) म्हणजेच शैक्षणिक व सामाजिक मागासवर्ग असा प्रवर्ग तयार करून त्यात मराठा समाजाचा समावेश करण्यात आला आहे. राज्य मागासवर्ग आयोगाने दिलेला २२ वा अहवाल अंशत: स्वीकारण्याचा व अंशत: नाकारण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला. आयोगाच्या शिफारशींमध्ये योग्य ते फेरबदल करून मराठा समाजाला शैक्षणिक व सामाजिक मागासलेपणाच्या आधारे सध्याच्या ३२ टक्के आरक्षण असलेल्या इतर मागासवर्गात समाविष्ट न करता मागासवर्गाचा एक वेगळा प्रवर्ग म्हणून १६ टक्के आरक्षण निश्चित करण्यात आले. या आरक्षणामध्ये राजकीय आरक्षणाचा समावेश नाही. हे आरक्षण शासकीय नोकऱ्यांमधील सरळसेवा भरतीसाठी लागू राहील.

मराठा समाजाला आरक्षण मिळण्याची मागणी सातत्याने होत होती. या संदर्भात राज्य मागासवर्ग आयोगाचा २२ वा अहवाल आणि न्यायमूर्ती आर.एम.बापट यांच्या अध्यक्षतेखालील आयोगाच्या अहवालाचा अभ्यास करून मराठा आरक्षणाबाबत अहवाल देण्यासाठी उद्योगमंत्री नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाची समिती नेमण्यात आली होती. या समितीत महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, सामाजिक न्यायमंत्री शिवाजीराव मोघे, आदिवासी विकासमंत्री मधुकरराव पिचड, (तत्कालिन सामाजिक न्याय राज्यमंत्री) गृहनिर्माण राज्यमंत्री सचिन अहिर, अल्पसंख्याक विकास विभागाच्या राज्यमंत्री फौजिया खान, सामान्य प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ.पी.एस.मिना, सामाजिक न्याय विभागाचे सचिव आर.डी.शिंदे यांचा समावेश होता. पुणे येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे महासंचालक यांनी समितीचे सदस्य सचिव म्हणून काम पाहिले.

या समितीने राज्याच्या सर्व विभागामध्ये दौरा करून याबाबतची साधार आकडेवारी (Quantifiable Data) गोळा केला. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्यातील चार लाख पाच हजार कुटुंबांचे सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक सर्वेक्षण केले. विविध संघटनांशी चर्चा करून अहवाल सादर केला.

या समितीने सादर केलेल्या साधार माहितीच्या व राज्य शासनाच्या इतर विभागाकडील माहितीच्या आधारे मागासवर्ग आयोगाचा २२ वा अहवाल अंशत: नाकारण्यात आला आणि भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद १५ (४) शैक्षणिक आरक्षण व १६ (४) नोकऱ्यांमधील आरक्षणानुसार हे आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला.

# मुस्लीम समाजाला ५ टक्के आरक्षण

राज्यातील मुस्लीम समाजाला शैक्षणिक संस्थात आणि शासकीय, निमशासकीय सरळसेवा भरतीमध्ये ५ टक्के आरक्षण देण्याचा निर्णयही मंत्रिमंडळाने घेतला. हे आरक्षण क्रिमीलेअर घटकांना लागू होणार नाही. भारतीय राज्य घटनेच्या कलम १५ (४) आणि १६(४) अन्वये मागासवर्गीयांसाठी असलेल्या एकूण ५२ टक्के आरक्षणाव्यतिरिक्त, सामाजिक व शैक्षणिक मागास मुस्लिम समाजासाठी हे आरक्षण लागू होईल.

राज्यातील मुस्लीम समाजातील सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक सद्यस्थितीचा अभ्यास व पाहणी करून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शासनास उपाययोजना सुचविण्याकरिता डॉ. मेहम्मदूर रहेमान यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगट स्थापन करण्यात आला होता. या अभ्यासगटाने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन मुस्लीम समाजातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांना आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. हे आरक्षण सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या मुस्लीम समाजातील घटकांसाठी विशेष मागास प्रवर्ग-अ हा प्रवर्ग निर्माण करून त्यामध्ये देण्यात येईल. या आरक्षणाचा फायदा मुस्लीम समाजातील विविध ५० मागास घटकांना मिळेल.



अनुसुचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग व इतर मागासप्रवर्गातील मुस्लीम समुदायातील ज्या घटकांना यापूर्वी आरक्षणाचा लाभ देण्यात आला आहे त्यांना पूर्वीप्रमाणे आरक्षण सुरु राहील व त्यांना विमाप्र-अ या ५ टक्के आरक्षणाचा फायदा मिळणार नाही. शालेय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, कृषी विद्यापीठातील व पशुवैद्यकीय शिक्षण संस्थामधील शिक्षणाच्या प्रवेशासाठी आणि शासकीय नोकऱ्यामध्ये सरळसेवा भरतीसाठी हे आरक्षण लागू राहील.

## यांना मिळेल आरक्षणाचा लाभ

| | |
|---|---|
| १ | धोबी मुस्लीम / मुस्लीम धोबी / धोबी मुसलमान |
| २ | गराडी मुस्लीम |
| ३ | नाई मुस्लीम, नावीद/नावीक |
| ४ | शेख/शेक |
| ५ | मुघल/मुगल |
| ६ | सय्यद (Syed, Sayed& Sayyed) |
| ७ | पठाण |
| ८ | खान |
| ९ | काद्री |
| १० | पीरजादे |
| ११ | मौलवी / मौलाना |
| १२ | खाकरुब / फरास |
| १३ | मिर्झा |
| १४ | बेग |
| १५ | अहमदी |
| १६ | नक्षबंदी / नकशबंदी |
| १७ | मच्छिमार मुस्लीम |
| १८ | तांडेल मुस्लीम |
| १९ | पटवा मुस्लीम |
| २० | कागजी मुस्लीम / कागदी मुस्लीम |
| २१ | काझी |
| २२ | टाकणकर |
| २३ | चिश्ती |
| २४ | मुस्लीम शाह |
| २५ | मुस्लीम पटेल |
| २६ | फारुकी |
| २७ | सिद्दीकी / सिद्दीक |
| २८ | मालवी |
| २९ | मीर |
| ३० | हकीम |
| ३१ | मुल्ला / मुल्लाजी, भोरी, मुल्लाजी |
| ३२ | जमादार |
| ३३ | मुकादम |
| ३४ | नकवी |
| ३५ | रिजवी |
| ३६ | रिझवी |
| ३७ | हुसैन / हुसैनी |
| ३८ | कामली / कासमी |
| ३९ | मेंहदी |
| ४० | हैदरी |
| ४१ | आलवी / अलवी |
| ४२ | उस्मानी |
| ४३ | नूरी |
| ४४ | रहमानी |
| ४५ | मोहम्मदी |
| ४६ | चाऊस |
| ४७ | फकीह |
| ४८ | सुफी / वारसी / अशरफी |
| ४९ | शूत्तारी / सतारी मुस्लीम |
| ५० | रव्वाजा (अजमेरी, बगदादी, मदनी, मक्की/तुर्की) |

# वनांचा समृद्ध वारसा

वन विभागातर्फे वृक्ष लागवडीचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात आला. गेल्या दोन वर्षांत ४५ कोटींच्या आसपास वृक्ष लागवड करण्यात आली. या रोपांपैकी ७० टक्के रोपांची चांगल्या प्रकारे वाढ होत आहे.

अभयारण्याच्या क्षेत्रात ६४८ चौ.कि.मी. संरक्षित क्षेत्राची वाढ, वन रक्षकांची पदभरती, व्याघ्र प्रकल्पातील १७ गावांचे पुर्नवसन , वाघांच्या संरक्षणासाठी विशेष दलाची निर्मिती यामुळे वाघांच्या संख्येत १७० (२०१०) वरुन २०० (२०१३) पर्यंत वाढ झाली. १० नवीन वन्यजीव अभयारण्याचे क्षेत्र अधिसूचित करण्यात आले. यामुळे राज्यात संरक्षित क्षेत्राची संख्या ५० झाली आहे. १८० वन रक्षकाची पदे निर्माण करण्यात आली असून विशेष व्याघ्र संरक्षण दल पेंच आणि ताडोबा येथे स्थापित करण्यात आले आहेत.

**दोन पर्याय देणारे धोरण**

अभयारण्ये , राष्ट्रीय उद्याने, अन्य जंगले यामधील गावांचे पुनर्वसन करताना दोन पर्याय देणारे धोरण अवलंबिण्यात आले. यास संबंधित लोकांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला. मेळघाट व्याघ्र प्रकल्प, नवेगांव राष्ट्रीय उद्यान, टिपेश्वर वन्यजीव अभयारण्य, ताडोबा व्याघ्र प्रकल्प, कोयनायचंडोली अभयारण्य येथील १७ गावांचे पुनर्वसन गेल्या तीन वर्षात करण्यांत आले. वन्य प्राण्यांमुळे शेती पिकांचे नुकसान झाल्यास नुकसानीची पूर्ण किंमत शेतकऱ्यांना अदा करण्यात येणार आहे.

**संयुक्त वन व्यवस्थापन समित्या**

१२,५०० गावांचे व्यवस्थापन करण्यासाठी ग्रामसभांना अधिकार देण्यांत आले. जंगलावरील ताण कमी करण्यासाठी संरक्षित क्षेत्राच्या जवळ असलेल्या गावांमधील २६,८२१ आदिवासींना स्वयंपाकाचा गॅस, ११९ लाभार्थ्यांना

**वने आणि वन्यजीव संरक्षण व संवर्धन यासाठी वन विभागाने गेल्या चार वर्षात अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. वनाच्छादित क्षेत्रात वाढ करण्याचे लक्ष्य केंद्रस्थानी ठेवण्यात आले. २०१२-१३ या वर्षात सुमारे ३१ कोटी रोपांची लागवड करण्यात आली. पर्यावरणपूरक पर्यटन व्यवसायात स्थानिक ग्रामस्थांना थेट सहभागी केल्याने वाघ संरक्षणात ते सक्रिय भाग घेत आहेत. यातूनच त्यांना शाश्वत स्वरूपाचे जीवनमान उपलब्ध होत आहे. वनातील आदिवासींचे पुनर्वसन, वनरक्षकांची भरती, वनक्षेत्रातील गुन्ह्यांची माहिती देण्यासाठी खबऱ्यांचे जाळे, संयुक्त वन व्यवस्थापन समित्या आदी उपाययोजना वनविभागाने केल्या आहेत.**



वनसंरक्षण आणि वन्यप्राणी संवर्धनाच्या प्रभावी उपाययोजनांमुळे वाघांच्या संख्येत १७० वरून २०० च्या आसपास वाढ. या कामगिरीसाठी महाराष्ट्र राज्यास सँक्च्युरी एशिया यांच्याकडून 'उत्कृष्ट वाघांचे राज्य' म्हणून गौरविण्यात आले.

- वन संरक्षण आणि संवर्धनाला सर्वोच्च प्राथमिकता. त्या अनुषंगाने १०० कोटी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे.
- शासनाने वाघाच्या संरक्षणावर लक्ष केंद्रित केले असून गेल्या ३ वर्षात मेळघाट व्याघ्र प्रकल्प, नवेगाव राष्ट्रीय उद्यान आणि टिपेश्वर वन्यप्राणी अभयारण्य येथील १२ गावांचे पुनर्वसन.
- ६४८ किलोमीटर्स क्षेत्रावरील १० नव्या वन्यप्राणी अभयारण्यांसाठी अधिसूचना जारी. यामुळे राज्यातील संरक्षित क्षेत्रांची संख्या ५०.
- वन विकास महामंडळामार्फत ताडोबा व्याघ्र संरक्षित क्षेत्र, मेळघाट व्याघ्र संरक्षित क्षेत्र, नागझिरा आणि बोर वन्यप्राणी अभयारण्यामध्ये पर्यटन सुविधांची निर्मिती.
- वन्य पशूंच्या हल्ल्यामधील मृतांसाठी रु. २ लाखांपासून रु. ५ लाखांपर्यंत आर्थिक मदत, कायम अपंगत्वासाठी रु.२ लाखांपासून रु. ४ लाखांपर्यंत आर्थिक मदत, गंभीर जखमींसाठी रु. ५०,००० वरून रु. १ लाखपर्यंत आर्थिक मदतीत वाढ.
- तात्पुरत्या रोजंदारीवरील ६५४६ मजूर, वनमजूर म्हणून कायम. २०११ साली ११७२ वनरक्षक आणि २०१२ साली ८५१ वनरक्षकांची नियुक्ती.
- वन अधिकार अधिनियम २००६ च्याअंतर्गत मार्च २०१३ पर्यंत एकूण ६६१ पायाभूत सुविधा मंजूर. यामध्ये शाळा, रस्ते, रुग्णालये, दूरध्वनी जोडण्या, समाजगृह, अंगणवाड्या, स्वस्त धान्ये दुकाने, तलाव, लघुसिंचन, अपांरपरिक ऊर्जास्रोत आदींचा समावेश.

बायोगॅसचा पुरवठा, ४५८ लाभार्थ्यांना दुभती जनावरे, १८४८ लाभार्थींना वृक्ष संरक्षणाचे काम देण्यांत आले. अनुसूचित जातीच्या ९,२१६ लाभार्थ्यांना स्वयंपाकाचा गॅस आणि ४३ लाभार्थ्यांना बायोगॅसचा पुरवठा करण्यात आला तर ६२ लाभार्थ्यांना दुभती जनावरे आणि ५७ लाभार्थ्यांना वृक्ष संरक्षणाचे काम देण्यांत आले. २०१३-१४ या वर्षात ३६,२०० कुटुंबाना स्वयंपाकाच्या गॅसची जोडणी, १४४८ कुटुंबाना बायोगॅसचे वितरण, ७२४० अनुत्पादक जनावरांचे जागी दुभती जनावरे पुरविण्यांत आली. ५१ इको टुरिझमच्या स्थानांचा विकास करण्यात आला.

### तेंदू पत्ता विक्री

स्थानिक गावकऱ्यांच्या समितीस तेंदू पत्ता विक्रीचे परवाने देण्यांत आले. २०१३ या वर्षात ई - टेंडरींग या प्रक्रियेद्वारे तेंदू पानांची विक्री करण्यांत आली आणि त्याला ठेकेदारांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला. तेंदू पानांना चांगली किंमत मिळाली. या प्रक्रियेत पारदर्शता ठेवण्यांत आली. खरेदीदार आणि विक्रेते या दोघांवरील खर्च कमी झाला. गडचिरोली जिल्हयातील ७६ टक्के वनक्षेत्र जंगलाने व्यापले आहे. या जिल्हयातील आदिवासींच्या उपजीविकेसाठी तेंदू पत्ता संकलन, जलसंधारण कामे, कूपतोड यामधून त्यांना रोजगार उपलब्ध होतो. अगरबत्ती उत्पादन प्रकल्प, हिरडा- बेहडा औषधी बी संकलन प्रक्रिया विक्री , मोहफुले खरेदी विक्री, डिंक- मध खरेदी प्रक्रिया प्रकल्प, बांबूपासून कलाकुसर व फर्निचर प्रकल्प तसेच जैवविविधता केंद्र निर्मिती देखभाल यामुळे आदिवासी तरुणांना रोजगार उपलब्ध झाला आहे.

### वनांचे संरक्षण

वनांचे संरक्षण प्रभावीपणे व्हावे याकरिता १०० चार चाकी वाहने वन परिक्षेत्र अधिकारी यांना पुरवण्यात आली आहेत. क्षेत्रिय कर्मचाऱ्यांना शस्त्रे आणि आग विझवणारी साधने पुरवण्यात आली आहेत.

### जैवविविधता

महाराष्ट्र जैव विविधता महामंडळाची स्थापना नागपूर येथे मुख्यालयासह करण्यात आली आहे. जैव विविधतेबाबत समित्यांची स्थापना करणे, हेरिटेज स्थळे अधिसूचित करणे, जनजागृती करणे ही कामे या महामंडळाच्या कार्यकक्षेत येतात.

> वनउपज आणि वनपर्यटन यामध्ये एकूण १२,६६१ संयुक्त वन व्यवस्थापन समितींना समाविष्ट करण्यात आल्याने उत्पादनात वाढ आणि स्थानिकांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा.

### माहिती तंत्रज्ञान व क्षमता बांधणी



## पुन्हा सारसांचे संमेलन...

एकेकाळी 'सारसनगरी'म्हणून गोंदिया जिल्हयाची ओळख होती. परंतु विविध नैसर्गिक संकटांमुळे सारसांची संख्या कमी झाली. १९७० साली नवेगावबांध येथे सारसांची संख्या ३२ होती. २००४-०५ मध्ये सारसांची संख्या आणखी कमी झाली. पक्ष्यांची शिकार, वातावरणात होणारे बदल यामुळे सारसांच्या संख्येत घट होत आहे. ही बाब लक्षात घेऊन शासनामार्फत लोकसहभागातून, अशासकीय संस्था व पक्षीप्रेमींच्या प्रयत्नांतून सारसांची शिकार थांबवण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. सारस संवर्धनाकरीता जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. समितीद्वारे जुन्या मालगुजारी तलाव परिसरांची निवड करण्यात आली असून सारस पक्ष्यांच्या आश्रयासाठी आवश्यक त्या बाबींचा त्यात अंतर्भाव करण्यात आला आहे. सारसांचे वास्तव्य असणाऱ्या १२ स्थळांची निवड करुन जनजागृती कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरु झाली आहे. धानाचा शेत परिसर म्हणजे सारसाच्या वास्तव्याचे ठिकाण. तेव्हा शेतकऱ्यांच्या साहाय्याने सारस संवर्धन करण्यात येत आहे. या प्रयत्नांमुळे २०१३-१४ मध्ये सारसांची संख्या ४० ते ५० एवढी झाली. १९७० साली पक्षीप्रेमींनी अनुभवलेले सारसांचे संमेलन तब्बल ४४ वर्षानंतर २७ फेब्रुवारी २०१४ रोजी महाराष्ट्र व मध्यप्रदेशच्या सीमेवरील धान शेतात पक्षीप्रेमींनी पुन्हा एकदा अनुभवले. या सारस संमेलनात एकूण २४ सारस एकत्र आले होते. शासनाच्या सारस वाचवा मोहिमेला लोक सहभागामुळे अशाप्रकारे सकारात्मक यश मिळत आहे.

**- पल्लवी धारव**

राज्यातील विविध ठिकाणच्या वन व्यवस्थापनाच्या कामाचे संनियंत्रण करण्यासाठी नागपूर येथील कार्यालयाशी जोडणारी व्हिडीओ कॉन्फरन्सिंग सुविधा मुंबईत आणि मुख्य वनसंरक्षक कार्यालय येथे निर्माण करण्यात आली आहे. ४१५ वन परिक्षेत्र अधिकारी लॅन आणि व्हॅनद्वारे जोडण्यांत आले आहेत. वन विभागाच्या संकेतस्थळामध्ये सुधारणा करण्यात आल्या असून हे संकेतस्थळ गतिमान करण्यात आले आहे. यामुळे क्षेत्रीय कामावर प्रभावीपणे संनियंत्रण करता येणे शक्य झाले आहे. महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लीकेशन सेंटर, नागपूर आणि नॅशनल रिमोट सेन्सिंग, हैद्राबाद यांच्या संयुक्त विद्यमाने धुळे आणि नाशिक वनवृत्तात प्रायोगिक तत्त्वावर कार्यक्रम विकसित करण्यात आले.



**मुक्ताई भवानी संवर्धन राखीव क्षेत्र**

धुळे वनवृत्तातील जळगाव वन विभागांतर्गत वडोदा या वनपरिक्षेत्रात १२२.७४ चौ. कि.मी. क्षेत्र 'मुक्ताई भवानी संवर्धन राखीव क्षेत्र' म्हणून अधिसूचित करण्यात आली आहे. या क्षेत्रात प्रामुख्याने वाघ, बिबट, काळवीट, मोर इ. विविध प्रकारचे प्राणी व पक्षी आढळून येतात. हे क्षेत्र जैव विविधतेचे रक्षण करण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहे. कर्नाळा अभयारण्य क्षेत्राच्या बाहेर महामार्गाचे रुंदीकरण झाल्यास या महामार्गावर वाहनांच्या वर्दळीचा अभयारण्य क्षेत्रावर होणाऱ्या परिणामाच्या दृष्टीकोनातून उपाययोजना करण्यात येणार आहेत.

**बोर अभयारण्य**

वर्धा जिल्हयातील बोर अभयारण्य पर्यटकांना आकर्षित करीत आहे. या अभयारण्यात १८५ प्रकारच्या पक्षांची नोंद करण्यात आली आहे. नागपूर व वर्धा जिल्ह्यातील ६१ चौरस किलोमीटरची जागा या अभयारण्यात समाविष्ट करण्यात आली आहे. केंद्राने या अभयारण्याला वाघाचे आश्रयस्थान म्हणून घोषित केले आहे.

व्याघ्र प्रकल्पाच्या कोअर क्षेत्राचे जास्तीत जास्त २० टक्के क्षेत्र पर्यटन क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले. निसर्ग पर्यटनाची जास्तीत जास्त कामे बफर क्षेत्रात घेण्यात येणार आहे. बफर झोनमधील रहिवासी असलेल्या स्थानिक गावकऱ्यांनी त्यांच्या राहत्या घरात पर्यटन निवास व्यवस्था केल्यावर त्यांच्याकडून फी आकारण्यात येणार नाही. स्थानिक जनतेला चिरस्थायी उपजीविकेचा विकास यामुळे करता येणार आहे.

**– सुबोधिनी घरत**



## माळढोकचे संरक्षण आणि संवर्धन

माळढोकसारख्या अत्यंत दुर्मीळ पक्ष्याची घटत असलेली संख्या विचारात घेऊन या प्रजातीचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी माळढोक अभयारण्य क्षेत्रात प्रजोत्पादन क्षेत्र विकसित करण्यात येणार आहे. माळढोक पक्षाचे प्रमुख आश्रयस्थान व प्रजनन स्थळ असलेल्या क्षेत्रालगतचे मौ. मार्डी, नरोटेवाडी, अकोलेकाठी व नान्नज या गावातील एकूण ४७३.६५ हेक्टर क्षेत्र माळढोक अभयारण्यामध्ये समाविष्ट करण्यात येणार आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यान हे एक चतुर्थांश भारतीय पक्ष्यांचे घर असून फुलपाखरांच्या १५० व कीटकांच्या ८ हजार प्रजाती इथे आढळतात.



## पर्यावरणपूरक पर्यटन व्यवसाय

नवीन इको टुरिझम धोरणानुसार वन विकास महामंडळ यांच्यातर्फे ताडोबा व्याघ्र प्रकल्प, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, नागझिरा आणि बोर वन्यजीव अभयारण्य येथे राहण्याची व निवासाची व्यवस्था करण्यात आली आहे. स्थानिक संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांमार्फत भोजन आणि इतर सुविधा पुरविण्यात येत आहेत.

# कामगारांना सन्मान आणि न्याय

बांधकाम कामगारांना वेगवेगळ्या कामाच्या ठिकाणी ऊन, वारा, पाऊस, थंडी, डास, इत्यादी समस्यांचा सामना करावा लागतो. त्यांच्या कामात मदत व्हावी यासाठी प्रत्येक बांधकाम कामगारास ३ हजार रुपये देण्यात येत आहेत. हा निधी लाभार्थी कामगाराच्या बँक खात्यामध्ये थेट जमा करण्यात येतो. या रकमेतून बांधकाम कामगाराला जेवणाचा डबा (टिफीन), मच्छरदाणी, ब्लँकेट व दोन चादरी, चटई हे साहित्य खरेदी करता यईल. ३१ मार्च २०१४ पर्यंत नोंदीत असलेल्या बांधकाम कामगारांना ही मदत मिळणार आहे.

**कामगारांची नोंदणी**

राज्यातील जे बांधकाम रु. १० लाख बांधकाम खर्चापेक्षा (जमिनीची किंमत वगळून) जास्त रक्कमेचे आहे, त्या बांधकाम खर्चाच्या रक्कमेवर १ टक्का दराने उपकर वसूल केला जातो. स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय कार्यालये व शासकीय उपक्रम यांच्यामार्फत संबंधित बांधकाम व्यवसायिकाकडून उपकर वसूल करून तो बांधकाम कामगार कल्याण मंडळाकडे जमा केला जातो. आजपावेतो मंडळाकडे सुमारे रु. १९८९ कोटी जमा झाले आहेत. मंडळात आतापर्यंत रु. ६३.२२ कोटी एवढा खर्च झाला आहे. मंडळाकडे आतापर्यंत १ लाख ७८ हजार ५१६ बांधकाम कामगारांनी नोंदणी केली आहे. प्राप्त उपकरामधून बांधकाम कामगारांची सुरक्षितता, विमा सुरक्षा, अपघातप्रसंगी मदत तसेच त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी विविध योजना राबवण्यात येतात.

**घरेलू कामगारांना सन्मानधन**

घरेलू कामगार कल्याण मंडळात नोंदणीकृत असलेल्या घरेलू कामगारांना १० हजार रुपये सन्मानधन देण्यात येत आहे. घरेलू कामगार कल्याण मंडळात नोंदणी केलेले आणि १ ऑगस्ट २०१३ रोजी ५५ वर्षे पूर्ण करणारे घरेलू कामगार या सन्मानधनासाठी पात्र आहेत. राज्यात सुमारे ३ लाख २१ हजार ५६८ घरेलू कामगार नोंदणीकृत आहेत.

कामगार आयुक्तालयाच्या स्थानिक जिल्हा कार्यालयामार्फत सन्मानधनाचे वितरण सुरू आहे. संबंधित घरेलू कामगाराच्या बँक खात्यावर किंवा धनादेशाद्वारे रक्कम जमा

**राज्यातील संघटीत तसेच असंघटीत कामगारांच्या हितासाठी शासनाने विविध मंडळांची स्थापना केली आहे. हे मंडळ आणि कामगार आयुक्त कार्यालय, कामगार विभाग यांच्यामार्फत विविध योजना, उपक्रमांची अंमलबजावणी केली जात आहे. बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, माथाडी कामगार मंडळ, सुरक्षा रक्षक मंडळ, घरेलू कामगार मंडळ आणि राज्य कामगार मंडळाची स्थापना करून या कामगारांसाठी तसेच त्यांच्या कुटुंबीयांसाठी कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे.**

राज्यातील संघटित व असंघटित कामगारांची संख्या ५ कोटींपेक्षा अधिक आहे. या बांधकाम कामगार, माथाडी कामगार, सुरक्षा रक्षक व घरगुती कामगार मंडळाची स्थापना करून त्यांच्यासाठी कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी सुरू आहे.



सन्मानधन योजनेमध्ये ५५ वर्षे पूर्ण झालेल्या घरगुती कामगारांना रु.१०,००० चे आर्थिक साहाय्य.

- मंडळाशी नोंदणीकृत असलेल्या बांधकाम कामगारांच्या मुलांना लॅपटॉप आणि संगणक वितरित करणार.
- परकीय भाषा शिकू इच्छिणाऱ्या कामगारांच्या मुलांना इंग्रजी, फ्रेंच, रशियन, जपानी, चिनी आणि जर्मन इत्यादी भाषा शिकवणार.
- इंग्रजी प्रशिक्षण वर्ग प्राथमिक स्तरावर उपलब्ध झाल्याने कामगारांच्या जवळपास ३००० मुलांना इंग्रजीवर प्रभुत्व मिळवणे शक्य होईल.
- या योजनेंतर्गत ९,५०० लाभार्थ्यांना रु. ९.५ कोटी वितरित.
- याशिवाय १,१२,००० लाभार्थ्यांना जनश्री विमा योजनेचे संरक्षण.
- विशेष साहाय्य विभागामार्फत वंचित घटकांना दरमहा थेट वेतन दिले जाते. ग्रामीण भागात हे वेतन 'पेन्शन' म्हणून ओळखले जाते.
- संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना आदी योजनांद्वारे दुर्बल घटकांना पेन्शन तथा थेट अनुदान. केंद्र व राज्य शासनामार्फत या योजनांमधून प्रती लाभार्थी ६०० रुपये निवृत्तीवेतन. राज्यात या योजनांचे सुमारे ३० लाख इतके लाभार्थी.



- बालकामगार प्रथेच्या निर्मूलनासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली टास्क फोर्सची निर्मिती. त्याअंतर्गत दुकाने, कारखान्यांवर धाडी टाकून बालकामगारांना मुक्त करून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यात येत आहे.
- यंत्रमाग कामगार, वाहन चालक, वाहक, रिक्षा चालक, ऊसतोड मजूर, शेत मजूर, हॉटेलमध्ये काम करणारे कामगार, वर्तमानपत्र विक्रेते, घरोघरी जाऊन वर्तमानपत्रे वाटप करणाऱ्या व्यक्ती, बिडी कामगार, चांदी, सोने गाळणारे कामगार, काचा, फडकी व भंगार गोळा करणाऱ्या व्यक्ती इ. घटकांसाठी मंडळे स्थापन करण्याचा शासनाचा मानस .
- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणाऱ्या कामगारांची नोंदणी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात करण्याचा निर्णय. यामुळे बांधकाम कामगार मंडळामार्फत राबविल्या जाणाऱ्या सर्व योजनांचा लाभ मिळण्यासाठी रोहयोवरील कामगार पात्र.

केली जात आहे.

या मंडळामार्फत घरेलू कामगारांची सुरक्षितता, विमा सुरक्षा, वैद्यकीय मदत, मुलांच्या शिक्षणासाठी विविध योजना राबविण्यात येतात.

**बांधकाम कामगारांना विम्याचे संरक्षण**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात नोंद झालेल्या कामगारांना विम्याचे मोफत संरक्षण देण्यात येते.

कुटुंब आरोग्य विमा योजनेंतर्गत बांधकाम कामगार आणि त्याच्या कुटुंबाला (पत्नी, २ मुले, आई, वडील) मेडिक्लेमचा लाभ मिळणार आहे. दरवर्षी प्रति कुटुंब २ लाख रुपयांपर्यंतचा मेडिक्लेम मिळेल. यात दुर्धर आजारांवरील उपचाराचा समावेश आहे.

वैयक्तिक अपघात विमा योजनेंतर्गत

इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळातर्फे आरोग्य विमा, मुलांना शिष्यवृत्ती, जनश्री विमा योजना. वैद्यकीय उपचारांकरिता साहाय्य. प्रसूतीसाठी आणि मंडळाशी नोंदणीकृत असलेल्या बांधकाम कामगारांच्या कौशल्यवृद्धीसाठी आर्थिक साहाय्य. आतापर्यंत ८२००० लाभार्थींना या योजनेचा लाभ.



## उच्च शिक्षणाचे स्वप्न साकार

आपल्या पाल्याने उच्चविद्याविभूषित व्हावे असे प्रत्येक पालकाचे स्वप्न असते. तुटपुंज्या आर्थिक उत्पन्नामुळे अनेक पालकांना आपल्या पाल्यांना उच्च शिक्षण देणे शक्य होत नाही. परंतु जिद्द, चिकाटी, प्रयत्न यांच्या जोडीला शासकीय मदत असेल तर हे नक्की शक्य आहे. याचे उत्तम उदाहरण पंडित नारायण मोहिते आहेत. श्री. मोहिते हे ३६ वर्षांच्या सेवेनंतर डिसेंबर २०१३ मध्ये अमरावतीमधील एका खाजगी कंपनीतून लघुलेखक म्हणून सेवानिवृत्त झाले. त्यांच्या घरातील सदस्यांची संख्या चार. मात्र कमावणारे ते एकटेच. आज त्यांच्या मुलाने अमेरिकेत उच्च शिक्षण पूर्ण केले आहे. पुण्याच्या अभियांत्रिकी महाविद्यालयातून बीई (प्रॉडक्शन) झाल्यानंतर तो अमेरिकेत गेला. मुलीचेही बीएस्सी (कॉम्प्युटर) पूर्ण झाले. हे केवळ महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या सहकार्यामुळे शक्य झाल्याचे श्री. मोहिते यांनी सांगितले. मंडळामार्फत कामगारांकडून अत्यल्प वार्षिक वर्गणी घेऊन त्यामध्ये मालक व शासनाकडून काही रक्कम टाकून कामगारांसाठी विविध योजना राबविल्या जातात. यामध्ये कामगारांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती, पदव्युत्तर परदेशी शिक्षण शिष्यवृत्ती, स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण अर्थसाहाय्य योजना, अपघाताने विकलांग झाल्यास अर्थसाहाय्य अशा योजनांचा समावेश होतो. पंडित मोहिते यांचा मुलगा मयूर याने पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत कामगार कल्याण मंडळाच्या शिष्यवृत्तीचा लाभ घेतला. उच्च शिक्षणासाठी २०११ मध्ये तो अमेरिकेतील सेंट क्लाउड युनिव्हर्सिटीमध्ये शिक्षण घेण्यासाठी रवाना झाला. त्यावेळी पदव्युत्तर परदेशी शिक्षण शिष्यवृत्ती या योजनेंतर्गत मंडळातर्फे त्याला अर्थसाहाय्य करण्यात आले.

**– सचिन ढवण**

बांधकाम कामगारांचा अपघात विमा उतरविण्यात आला आहे. बांधकाम कामगाराचा अपघाती मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबाला १ लाख रुपयांची भरपाई मिळेल. अपघातात जखमी झाल्यास त्याला ५० हजार ते १ लाख रुपयांपर्यंत भरपाई दिली जाईल. १८ ते ६० वर्षापर्यंतचे बांधकाम कामगार या योजनेसाठी पात्र आहेत.

या दोन्ही विमा योजनांचा लाभ घेण्यासाठी बांधकाम कामगाराला प्रिमिअम (हप्ता) भरण्याची गरज नाही. मंडळामार्फत प्रिमिअम कंपनीस अदा केला जाईल.

**कामगारांच्या मुलांना भाषांचे प्रशिक्षण**

कामगार कल्याण मंडळाद्वारे कामगारांच्या मुलांसाठी इंग्रजी तसेच इतर विदेशी भाषेच्या शिक्षणाचे क्लासेस सुरू करण्यात आले आहेत. राज्य कामगार मंडळाकडे नोंद झालेल्या लाभार्थ्यांव्यतिरिक्त या योजनेचा लाभ इतर मंडळातील लाभार्थ्यांच्या पाल्यांनासुद्धा मिळेल. लहान व मोठ्या मुलांसाठी इंग्रजीचे वर्ग वेगवेगळे चालवले जातात. जर्मन, फ्रेंच, रशियन व जापनीज या विदेशी भाषेचे सुरु करण्यात येणार आहे. एमएसएसआयटी प्रशिक्षणाचा कार्यक्रमसुद्धा राबवीत आहे.

**इतर महत्त्वपूर्ण कामगिरी**

- राज्यातील अनेक कंपन्यांच्या व्यवस्थापनासोबत झालेल्या बैठकांमध्ये संप संपुष्टात आणून काम पुर्ववत सुरू ठेवणे, निलंबित कामगारांना पुन्हा कामावर घेणे, कामगारांचे वेतन करार, मृत कामगारांच्या वारसास नुकसान भरपाई, किमान वेतन दराप्रमाणे वेतन, कामगार कायद्यांची अंमलबजावणी इत्यादी महत्त्वपूर्ण निर्णय झाले आहेत.
- बदलत्या काळास अनुसरून कामगार विभागाने सर्व कारभार ऑनलाइन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार www.mahakamgar.gov.in हे संकेतस्थळ निर्माण करण्यात आले आहे.
- माथाडी कामगारांकडून ५० किलोपेक्षा जास्त वजनाची चढ-उतार किंवा हाताळणी करून घेण्यास मज्जाव करणारा निर्णय घेण्यात आला आहे.
- विविध दुकाने, आस्थापना, कारखाने, कंपन्या आदी कोणत्याही ठिकाणी कार्यरत असलेल्या सर्व प्रकारच्या कामगारांचे वेतन बँकेमार्फत किंवा धनादेशाद्वारे देण्याबाबत नियम करण्यात आला आहे.

## आम आदमी वीमा योजना

ग्रामीण भागातील १८ ते ५९ वयोगटातील भूमिहीन शेतमजूर तसेच अल्पभूधारकांसाठी आम आदमी विमा योजना राबविली जात आहे. या योजनेतून भूमिहीन कुटुंबांना तसेच अल्पभूधारकांना विम्याद्वारे संरक्षण तसेच कुटुंबातील नववी ते बारावी इयत्तेत शिकणाऱ्या दोन मुलांना प्रति महिना १०० रुपये शिष्यवृत्ती दिली जाते. लाभार्थ्यास कोणत्याही प्रकारचा विमा हप्ता भरण्याची गरज पडत नाही. भूमिहीन कुटुंब तसेच २.५ एकर बागायती किंवा ५ एकर जिरायती जमीन धारण करीत असलेल्या व्यक्ती या योजनेसाठी पात्र आहेत.

लाभार्थ्याचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याच्या वारसाला ३० हजार रुपये, अपघाती मृत्यू झाल्यास वारसाला ७५ हजार रुपये, अपघातामुळे कायमचे अपंगत्व आल्यास ७५ हजार रुपये, अपघातामुळे दोन्ही डोळे किंवा दोन्ही पाय गमावल्यास ७५ हजार रुपये तसेच अपघातामुळे एक डोळा किंवा एक पाय गमावल्यास ३७ हजार ५०० रुपये आम आदमी विमा योजनेतून दिले जातात.

राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेंतर्गत दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील १८ ते ५९ वयोगटातील कमावत्या व्यक्तीचा अपघाती किंवा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबीयास या योजनेतून एक रकमी २० हजार रुपयांचे अर्थसाहाय्य दिले जाते.



**निराधारांना मदतीचा हात**

या विभागामार्फत निराधार, वृद्ध, अपंग, विधवा, अनाथ मुले, क्षयरोग, कर्करोग, एड्स, कुष्ठरोग यासारख्या आजारामुळे स्वत:चा चरितार्थ चालवू न शकणारे लोक, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या विधवा, घटस्फोट झालेल्या परंतु पोटगी न मिळालेल्या महिला, तलाकग्रस्त महिला, अत्याचारित व वेश्या व्यवसायातून मुक्त केलेल्या महिला यांना पेन्शन देण्यात येते. तुरुंगात शिक्षा भोगत असलेल्या कुटुंब प्रमुखाची पत्नी, ३५ वर्षे व त्यावरील अविवाहित महिला, तृतीयपंथीय यांचाही समावेश या योजनेत करण्यात आला आहे.

तलाकग्रस्त मुस्लीम महिलेच्या वास्तव्याच्या परिसरातील मस्जिदमधील काझीने त्या महिलेच्या घटस्फोटासंदर्भात तहसीलदारासमोर दाखल केलेले शपथपत्र योजनेच्या लाभासाठी गृहीत धरले जाते. किंवा त्या गाव-शहरातील मुस्लीम समाजासाठी धार्मिक कार्य करणाऱ्या नोंदणीकृत संस्थेने ठराव करून दिल्यास त्या आधारेही संबंधित तलाकग्रस्त मुस्लीम महिलेस पेन्शन योजनेचा लाभ दिला जातो.

**सहाशे रुपयांची पेन्शन**

संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना आदी योजनांच्या माध्यमातून या सर्व दुर्बल घटकांना पेन्शन तथा थेट अनुदान दिले जाते. केंद्र व राज्य शासनामार्फत या योजनांमधून प्रती लाभार्थी ६०० रुपये पेन्शन दिली जाते. राज्यात या योजनांचे सुमारे ३० लाख इतके लाभार्थी आहेत. या योजनांचा लाभ थेट लाभार्थ्यापर्यंत त्यांच्या गावात जाऊन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या नव्या पद्धतीत पारदर्शकता राहावी व खऱ्या लाभार्थ्याला रोख स्वरूपात अनुदानाचा लाभ मिळावा यासाठी बायोमेट्रिक पद्धतीचा अवलंब करण्यात येत आहे.

मुंबई शहर, मुंबई उपनगर, रत्नागिरी, पुणे, जळगाव, नंदूरबार, औरंगाबाद, जालना, नांदेड, अमरावती, वर्धा व गोंदिया या १२ जिल्ह्यांमध्ये केंद्र शासनाच्या डायरेक्ट बेनेफिट ट्रान्सफर कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे.

**- इर्शाद ल. बागवान**

# महा-आयटी -राष्ट्र

प्रशासन अधिक पारदर्शक आणि गतिमान करण्यासाठी महाराष्ट्रात माहिती तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर केला जात आहे. माहिती तंत्रज्ञानाशी निगडित ई-गव्हर्नन्सच्या विविध संकल्पना राबवण्यात राज्य देशात आघाडीवर आहे. त्यामुळे राज्याला विविध पुरस्कारही सातत्याने प्राप्त होत आहेत. ई-गव्हर्नन्सचा प्रभावीपणे वापर होत असल्यामुळे नागरिकांना विविध सेवा आणि दाखले आता सहज आणि सुलभपणे उपलब्ध होत आहेत.

कागदविरहित कार्यालयाची संकल्पना राबविण्या करिता ई-ऑफीस प्रकल्पाची सुरुवात राज्य शासनाने केली आहे. या प्रकल्पाची मंत्रालय, जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग, मुंबई महानगरपालिका, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान या कार्यालयात यशस्वीपणे सुरुवात करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत कोकण विभागातील सर्व जिल्हे, बीड, जालना, नंदुरबार या जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. आतापर्यंत १४,२०० धारिकांची ई-ऑफीस प्रणालीच्या माध्यमातून निर्मिती झाली आहे. ६३०० पेक्षा जास्त शासकीय अधिकारी आणि कर्मचारी या प्रणालीचा वापर करीत आहेत. राज्याच्या ई-ऑफीस प्रकल्पाची दखल विविध स्तरावर घेण्यात आली असून, त्यासाठी राज्याला ५ पारितोषिके मिळाली आहेत.

### ई- निविदा

शासनाची खरेदी प्रक्रिया सक्षम आणि पारदर्शी करण्याकरिता ई-निविदा सुरु

**माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा झपाट्याने विकास होत आहे. त्यामुळे जग अधिक जवळ येत आहे. राज्य शासनही माहिती तंत्रज्ञानाचा वापर प्रशासनात अधिक प्रभावीपणे करत असल्यामुळे प्रशासनात गतिमानता आणि पारदर्शकता येण्यास मदत झाली आहे. माहिती तंत्रज्ञान सुप्रशासनाचा प्रमुख आधार झाला आहे.**

**प्रशासनात गतिमानता आणि पारदर्शकता आणण्यासाठी शासनाने ई प्रशासन धोरण तयार केले. अशा प्रकारचे धोरण बनविणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य आहे. या धोरणाची कालबद्ध अंमलबजावणी करण्यात येत आहे. आतापर्यंत ८०% अंमलबजावणी झाली आहे. निर्धारित कालावधीत धोरणाची १००% अंमलबजावणी करण्यात येणार आहे.**

प्रशासनात कागदाचा कमीतकमी वापर व्हावा म्हणून ई-ऑफिस प्रणालीला उत्तम यश. संपूर्ण देशात या प्रणालीची सर्वात मोठ्या प्रमाणावर अंमलबजावणी. मंत्रालय, सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी कार्यालय, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, मुंबई महानगरपालिका यामधून या प्रणालीचा वापर. ३० हजारापेक्षा जास्त ई-फाईल्स तयार.



करण्यात आली आहे. १० लाख रुपयेपेक्षा जास्त रकमेच्या निविदाकरिता ई-निविदा पद्धतीचा अवलंब करणे आता सक्तीचे करून देण्यात येतील.

**आधार नोंदणी अग्रेसर**

आधार प्रकल्पामध्ये आतापर्यंत

- आधार नोंदणी कार्यक्रम राबविण्यात महाराष्ट्र संपूर्ण देशात प्रथम क्रमांकावर. राज्यातील ७.०७ कोटींपेक्षा जास्त नागरिकांनी आधार क्रमांक घेतला आहे.
- सिधुदुर्ग आणि परभणी जिल्हे वगळता इतर जिल्ह्यांची आधार संलग्न थेट लाभ हस्तांतरण (सिलेंडर अनुदान) योजनेसाठी निवड. सध्या वर्धा जिल्ह्यात ८५% आणि अमरावती जिल्ह्यात ४५% अनुदान वाटप पूर्ण. दोन्ही जिल्ह्यांमध्ये १२ कोटींपेक्षा जास्त अनुदान वाटप.



- शासकीय क्लाऊड यंत्रणा चालविणारे देशातील पहिले 'स्टेट डाटा सेंटर' मुंबईत स्थापन. यामुळे ई-प्रशासन प्रकल्प राबविण्यासाठी येणारा खर्च आणि वेळेत बचत.
- प्रमुख १६ नागरी सेवा या इलेक्ट्रॉनिक पद्धतीनेच.
- सर्व विभागांची संकेतस्थळे मराठीतून असण्यावर भर.
- ई-प्रशासन मोहिमेस आणि प्रकल्पांना प्रतिष्ठित असे ४३ पुरस्कार. दिल्ली येथे झालेल्या 'स्कॉच' समीट मध्ये सर्वाधिक पुरस्कार मिळणारे राज्य म्हणून महाराष्ट्राचा गौरव.

करण्यात आले आहे. ५० पेक्षा जास्त विभाग या प्रणालीचा वापर करीत आहेत.

**नागरी सेवा**

नागरिकांना त्यांच्या दारातच शासकीय सेवा उपलब्ध करुन देण्याकरिता ३५०० महा-ई-सेवा केंद्रे स्थापन केली आहेत. यामध्ये ग्रामपंचायतीच्या संग्राम केंद्रांचा समावेश आहे. जवळपास १८ कोटीपेक्षा जास्त ई-व्यवहार या केंद्रांच्या माध्यमातून करण्यात आले आहेत. महा-ई-सेवा केंद्र, सेतू केंद्र, संग्राम केंद्र यांच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या १६ महत्त्वाच्या सेवा व नमुन्यांचे प्रमाणिकीकरण करण्यात येत आहे.

ई जिल्हा ही संकल्पना सध्या ५ जिल्ह्यांमध्ये राबवण्यात येत आहे. या अंतर्गत उत्पन्नाचा दाखला, हंगामी निवासी प्रमाणपत्र, वय-राष्ट्रीयत्व, ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र, जन्म-मृत्यू प्रमाणपत्र देण्यात येतात. लवकरच सर्व जिल्ह्यात ई- जिल्हा प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे त्यामधून महत्त्वाच्या ३५ सेवा उपलब्ध

> राज्यात ३० हजारांहून अधिक नागरिक सेवा केंद्रे सुरू करण्यात आली आहेत.

राज्यातील ८.४ कोटी नागरिकांची नोंदणी करण्यात आली असून ७.८ कोटी आधार क्रमांकाची निर्मिती झाली आहे. ही संख्या देशात सर्वात जास्त आहे.

आधार प्रकल्पाची अंमलबजावणी आणि त्यामध्ये नावीन्यपूर्ण कल्पनांचा वापर करण्याच्या कामासाठी राज्याला पंतप्रधानांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले आहे. राज्याला यासाठी वेगवेगळ्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील १० पारितोषिके प्राप्त झालेली आहेत.

आधार क्रमांकाच्या निर्मितीमध्ये नवनवीन कल्पनांचा वापर करता येणे शक्य व्हावे यासाठी मंत्रालयात यूआयडी इनोव्हेशन केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. यूआयडी आधारित पडताळणी करण्याकरिता पायाभूत सुविधा निर्माण करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. सार्वजनिक वितरण प्रणाली, राष्ट्रीय ग्रामविकास रोजगार हमी योजना, सामाजिक विकासाच्या योजना यासाठी माहितीचे सिडींग करण्यास सुरुवात



## ग्रामपंचायतीतच बँक

श्रीमती पुष्पाताई ढोले... वय वर्षे ४२. आधी गृहिणी आणि आता यवतमाळ जिल्ह्याच्या परसोडी ग्रामपंचायतीची सरपंच असलेल्या या महिलेचे १० फेब्रुवारी २०१४ पर्यंत कुठल्याच बँकेत खातं नव्हतं... त्यांच्या गावातील लोकांनाही बँकिंग व्यवहारासाठी २० कि.मी अंतरावरील बँक शाखेत जावं लागे... पण ग्रामविकास विभागाने अखंडित इंटरनेट सेवा उपलब्ध असलेल्या ग्रामपंचायतींमध्ये बँकिंग व्यवहार उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आणि पुष्पाताई ढोले यांच्या ग्रामपंचायतीतच बँक आली... याचा लाभ घेऊन बँकेत खातं उघडण्याचा पहिला मान त्यांना मिळाला.

पुष्पाताई ढोलेंबरोबर त्यादिवशी ७५० नागरिकांचे ऑनलाइन खाते उघडण्यात आले. अशी सेवा उपलब्ध झाल्याने पैशांची ने-आण करण्याची जोखीम कमी झाल्याचा आनंद अनेकांनी बोलूनही दाखवला...

राज्यात २८ हजार गावांपैकी केवळ ५५०० गावात बँक शाखा आहेत. राज्यात आतापर्यंत १४९७ ग्रामपंचायतींमध्ये बँकिंग सेवा उपलब्ध झाली असून १२४३६ नागरिकांनी आपले बँक खाते ग्रामपंचायतीमार्फत सुरू केले आहे. ही सेवा उपलब्ध करून दिल्यापासून आतापर्यंत राज्यात ५४५७ बँक व्यवहार ग्रामपंचायतीमार्फत झाले आहेत. जवळपास २० हजार लोकांनी या सुविधेचा लाभ घेतला आहे. येत्या तीन महिन्यात ११ हजार ग्रामपंचायतींमध्ये अशा प्रकारचे बँकिंग व्यवहार उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

**- डॉ. सुरेखा मुळे**

करण्यात आलेली आहे.

लाभार्थ्यांना त्यांचे लाभ आधार क्रमांकाशी संलग्न करुन देण्याकरिता १२ जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे. या जिल्ह्यात कामाची प्रगती उत्तम आहे. गॅसचे अनुदान आधार क्रमांकाशी संलग्न करुन थेट लाभार्थ्यांना देण्याकरिता राज्यातील ३३ जिल्ह्याची निवड करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांच्या खात्यात थेट जमा होत आहे.

आधार क्रमांकाच्या आधारावर वित्तीय लाभ अदा करण्याकडे विशेष लक्ष देण्यात येत आहे. त्यासाठी व्यवसाय प्रतिनिधी नियुक्त करण्यात आलेले आहेत.

**क्लाऊड सेंटर**

शासनाने द्विस्तरीय डाटा सेंटरची स्थापना केली आहे. असे केंद्र उभारणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य आहे. त्याचबरोबर स्वत:चे क्लाऊड असलेले देशातील एकमेव डाटा सेंटरदेखील आहे. यामुळे वेळ आणि खर्चात लक्षणीय घट झाली आहे. या केंद्राकडून आतापर्यंत १५० ॲप्लीकेशन्स उपलब्ध आहेत.

गतिमान प्रशासनात माहिती तंत्रज्ञानाच्या नियोजनबद्ध वापरामुळे प्रशासन गतिमान आणि पारदर्शक होण्यास मदत होत आहे.

**– विष्णू काकडे**




**२०१३ साली महाराष्ट्राला ई –गव्हर्नन्समध्ये उत्कृष्ट कामे केल्याबद्दल ३३ व्या स्कॅाच (SKOCH) शिखर परिषदेत १८ पारितोषिक मिळवून महाराष्ट्राने विक्रम केला. गेल्या वर्षी राष्ट्रीय –आंतरराष्ट्रीय पातळीवर १०३ पारितोषिके मिळाली.**

## क्षमता निर्मितीसाठी प्रशिक्षण

शासनाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याकडे माहिती तंत्रज्ञान संचालनालयाकडून विशेष लक्ष देण्यात येते. आतापर्यंत २५ हजार अधिकारी, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिकाऱ्यांना संधी मिळावी म्हणून त्यांना प्रशिक्षणाला पाठविण्यात येते. शासकीय कर्मचारी व अधिकाऱ्यांना माहिती तंत्रज्ञानाची ओळख व्हावी आणि त्यांच्यात त्याविषयी आवड निर्माण व्हावी म्हणून माहिती तंत्रज्ञान संचालनालयामार्फत दर महिन्याच्या पहिल्या शनिवारी टेकसॅटरडेचे आयोजन करण्यात येते. या कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्रभर करण्यात येते.

टेकसॅटरडे या उपक्रमाची केंद्र शासनाने दखल घेतली आहे. ई-प्रशासन प्रमाणपत्र विषयक ऑनलाइन प्रशिक्षण देणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. या प्रशिक्षणाचा लाभ ३ हजार शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घेतला आहे. या उपक्रमाला राष्ट्रीय स्तरावरील दोन पारितोषिके मिळालेली आहेत.



माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने विविध विभागातील ई-प्रशासन प्रकल्प राबवण्यासाठी माहिती तंत्रज्ञान व्हर्चुअल संवर्गाची निर्मीती करण्यात आली आहे. या संवर्गातील पहिल्या तुकडीत ६ अधिकारीय कर्मचाऱ्यांची निवड करण्यात आलेली आहे. विक्रीकर विभाग आणि राज्य उत्पादन शुल्क या महसूल मिळविणाऱ्या दोन महत्त्वाच्या विभागाने माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे विविध उपक्रम राबवून पारदर्शक आणि महसूल वाढीसाठी उपयुक्त कामगिरी केली आहे. ई-पेमेंट महसूलप्रणालीची अंमलबजावणी करण्यात राज्य उत्पादन शुल्क विभाग अग्रेसर आहे.

# पारदर्शक, अत्याधुनिक आणि गतिमान

महसूल प्रशासन पारदर्शक, अत्याधुनिक आणि गतिमान होण्यासाठी महसूल विभागामार्फत नावीन्यपूर्ण उपक्रम घेण्यात आले आहेत. हा विभाग ऑनलाइन करण्यावर भर देण्यात आला. सध्या अनेक दाखले ऑनलाइन दिले जात आहेत. लोकप्रतिनीधी आणि जनतेमधील दुवा म्हणून महसूल विभागाकडे बघितले जाते.

**विविध योजना**

भरती प्रक्रियेतील परिक्षार्थी, तसेच उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शाळा सोडल्याचा दाखला ग्राह्य धरून आधिवास प्रमाणपत्राची अट शिथिल केली. खंडकरी शेतकऱ्यांना जमीन वाटप सुरू केले. बेदखल कुळांना मालकी हक्क प्राप्त करून दिले. प्रलंबित मोजणी प्रकरणात शून्य प्रलंबितता आणण्यासाठी कालबद्ध पद्धतीने काम केले. शेतकऱ्यांची प्रलंबित मोजणी प्रकरणे त्वरित निकाली काढण्यासाठी खाजगी सर्व्हेअरची नियुक्ती केली. वाळू लिलावात पारदर्शकता आणन्यासाठी ई टेंडरिंग पध्दती अवलंबिली.


मोजणी प्रकरणांचे नियोजन करण्याकरिता आज्ञावली (ई मोजणी) तयार करण्यात आली आहे. नझूल जमिनिचा भाडेपट्टा ठरवून हस्तांतरणाच्या परवानगीची पद्धत सोपी करणारे नागपूर व अमरावती विभागातील नझूल धोरण जाहीर केले. जनतेस उत्तम सेवा आणि सुविधा मिळाव्या यासाठी मुद्रांक शुल्क कार्यालयांचे अद्ययावतीकरण करण्याचे काम सुरू केले. संपूर्ण विदर्भातील भूमिधारी शेतकऱ्यांचे भूमिस्वामी शेतकऱ्यांत रूपांतर करण्याची विषेश मोहीम राबविण्यात येत आहे.

**सुवर्ण जयंती राजस्व अभियान**

प्रशासकीय यंत्रणेत गतिमानता, सुसूत्रता आणता येईल अशा प्रकारचे अनेक अभिनव कल्पना व प्रयोग प्रशासकीय अधिकारी आपल्या जिल्ह्यात करीत असतात. असे सर्व अभिनव प्रयत्न एका ठिकाणी आणून राज्यभर राबवल्यास जनतेला मोठा लाभ होईल या संकल्पनेतून निवडक योजनांचे एकत्रीकरण करुन सर्व जिल्ह्यांत सुवर्ण जयंती राजस्व अभियान १ मे २०११ पासून लागू करण्यात आले.

**महसूल विभाग हा शासनाचा महत्त्वाचा विभाग आहे. शेतकरी व सामान्य नागरिकांचा महसूल विभागाशी नियमित संपर्क येतो. नागरिकांच्या विविध प्रकरणांची हाताळणी गतिमान पद्धतीने व्हावी, यासाठी महसूल प्रशासन अधिक गतिमान झाले आहे. इतर विभागांशी संनियंत्रण व समन्वय करताना अनेक प्रशासकीय अडचणी येतात. त्यावर मात करण्यासाठी महसूल विभाग नव्या योजना आणि उपक्रम सातत्याने राबवीत असते.**

वास्तव्य, उत्पन्न, जात, ज्येष्ठ नागरिक यांसारखे विविध दाखले त्वरित देण्यासाठी शिबिरे. २०११-१२ आणि २०१२-१३ मध्ये १ कोटी १७ लाख ११ हजार ९१९ दाखले वितरीत.



# अतिक्रमित व बंद शेतरस्ते मोकळे झाले



पेठ गंगापूर शीव रस्ता (अतिक्रमणापूर्वी)



पेठ गंगापूर शीव रस्ता (अतिक्रमण काढल्यानंतर)

**शेतातील वहिवाटींच्या रस्त्यांवरील अतिक्रमणे काढून टाकण्यासाठी विशेष मोहीम. लोक सहभागातून २०११-१२ मध्ये २५ हजार ३२५ किमी तसेच २०१२-१३ मध्ये १८ हजार ३६० किमी रस्ते अतिक्रमणमुक्त.**

सुवर्ण जयंती मोहिमेंतर्गत राबविण्यात येणाऱ्या मोहिमेचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांना जाण्यायेण्यासाठी सुयोग्य रस्ता उपलब्ध करून देणे हा आहे. बऱ्याच शेतकऱ्यांना इच्छा असूनही ऊस, केळी, फळबाग, भाजीपाला, यासारखी नगदी पिके शेतरस्ता उपलब्ध नाही यामुळे घेता येत नाहीत. बैलगाडी किंवा इतर वाहने अतिक्रमित रस्त्यावरून जावू शकत नसल्याने पावसाळ्यात पेरणी वेळेवर होऊ शकत नाही. आंतर मशागतीसाठी आवश्यक अवजारांची ने-आण करणे कठीण होते.

अतिक्रमित पाणंदीमध्ये कमरेइतक्या चिखलामधून बैलगाडी शेतापर्यंत नेणे कठीण काम ठरते. शेतरस्त्याची अनुपलब्धता खताची वेळेवर वाहतूक, पिकांना योग्य अवस्थेत (Critical Stage) खताचा डोस, औषध फवारणी तसेच शेतकऱ्यांना रात्री अपरात्री शेतीवर लक्ष ठेवणे या बाबींवर अनिष्ट परिणाम होत होता. फळे, भाज्या यांसारखी नाशवंत कृषी उत्पादने सुयोग्य स्थितीत असताना तात्काळ बाजारपेठेपर्यंत पोहोचवणे शेतरस्त्याअभावी जिकरीचे होते. नाशवंत कृषी माल जागीच सडून जाऊन शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान होत होते. शेतरस्त्याअभावी काढणी कापणी यंत्रे शेतापर्यंत घेऊन जाणे शक्य होत नव्हते. शेतकऱ्यांना अनावश्यक तोटा सहन करावा लागत होता.

शेतरस्त्यावरील अतिक्रमणामुळे प्रशासनात आणि न्यायालयात अनेक वाद आणि दावे दाखल होत होते. यात शेतकऱ्यांचा वेळ व पैसा वाया जातो. वैयक्तिक द्वेष वाढत जातो. अनेक शेतकऱ्यांना शेतजमिनी विकाव्या लागतात किंवा शेतजमिनीची विक्री करण्यास भाग पाडले जाते. शेती व्यवसायास पूरक असणारे कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय आणि इतर व्यवसाय करण्यापासून शेतकरी दूर राहत होते. याचा परिणाम शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती खालावण्यात होत होता.

सिंचन सुविधा वाढवण्यासाठी अनेक ठिकाणी तलाव, कालवे निर्माण झाले. यामुळे पारंपरिक रस्ते बुडीत क्षेत्रात गेल्यामुळे अनेक ठिकाणी रस्त्याचे प्रश्न उद्भवले. यासाठी पर्यायी सोय म्हणून अतिक्रमित शेतरस्ते मुक्त करण्याची आवश्यकता भासू लागली. काही गावांच्या पुनर्वसनामुळे गावठाण बदलले. यामुळे पूर्वीच्या गावठाणातून शेतावर जाण्यासाठी असलेले रस्ते आणि नवीन गावठाणातून शेताकडे जाणारे रस्ते याची समस्या निर्माण झाली.

हे सर्व प्रश्न आणि समस्या या माहिमेमुळे संपुष्टात आले.

दरवर्षी या अभियानाला जनतेने चांगला प्रतिसाद दिला. या अभियानांतर्गत १ एप्रिल २०१३ ते ३१ मार्च २०१४ या कालावधित विविध दाखले देण्याकरिता १६२२५ शिबिरे आयोजित करुन ५३,०८,६७६ दाखले वितरित करुन महसूल विभागाने विक्रम केला आहे.

अतिक्रमित व बंद झालेल्या शेतातून जाणाऱ्या रस्त्यांना लोकसहभागातून तयार करण्यात आले ,१५,०५३.१ कि.मी. चे रस्ते अतिक्रमण मुक्त झाले. फेरफार अदालत आयोजित करुन ७,७९,७६४ फेरफार मंजूर करण्यात आले. ३९,७७१ गावात चावडी वाचनाचा कार्यक्रम घेण्यात आला.

**ई महाभूमी**

ई- महाभूमी योजने अंतर्गत २९२ तालुक्यात ई-मोजणी कार्यप्रणाली कार्यान्वित करण्यात आली. ई-फेरफार प्रणाली लागू करून अंमलबजावणी होत असलेल्या तालुक्यांची संख्या आता ३६ झाली आहे. २२ तालुक्यात ई-चावडी प्रणाली पूर्णत: कार्यान्वित करण्यात आली आहे. ई-अभिलेख या उपक्रमांतर्गत आतापर्यंत ११ तालुक्यातील अभिलेख कक्षांचे आधुनिकीकरण झाले आहे. १२ तालुक्यांच्या नकाशांच्या डिजीटायझेशनचे काम पूर्ण झाले आहे. ई-पुनर्मोजणी अंतर्गत ५ तालुक्यांची कार्यवाही पूर्ण झाली आहे.१९ तालुक्यात ई -भूलेख प्रणाली लागू करून अंमलबजावणी सुरू आहे.

**- अर्चना शंभरकर**




- जमिनीविषयक प्रलंबित तंटे आणि प्रकरणांचा गेल्या तीन वर्षांत निपटारा.
- जमीन मोजणीतील दिरंगाई आणि अनिश्चितता दूर करण्यासाठी ई–मोजणी. गेल्या वर्षभरात ६७ हजार ८७६ प्रकरणे मार्गी.
- फेरफार अदालतीच्या माध्यमातून ८.७ लाख प्रकरणे निकाली.
- बृहन्मुंबईसाठी भाडेपट्टा नूतनीकरण धोरण. यामुळे भाडेपट्टी धारकांना भाडेपट्ट्यांचे नूतनीकरण करणे किंवा अशा मालमत्तेचे रूपांतरण वहिवाट म्हणून करणे शक्य.
- खंडकरी शेतकऱ्यांना २६ हजार एकर जमीन देण्यासंबंधी सर्वोच्च न्यायालयापर्यंत राज्याचा लढा. सरकारच्या बाजूने निकाल. ही जमीन खंडकरी शेतकऱ्यांना देण्याची कार्यवाही सुरू.
- बॉम्बे कूळ कायदा १९४८ मधील तरतुदीत बदल. त्यामुळे रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ११ हजार ५२० कुळांना फायदा.
- नागपूर आणि अमरावती भागातल्या शासकीय जमिनीच्या भाडेपट्टा नूतनीकरणाच्या खोळंबलेल्या निर्णयाच्या संदर्भात धोरण तयार. त्यामुळे ४५ हजार नझुल प्लॉटसच्या भाडेपट्ट्यांचे नूतनीकरण शक्य.
- आदिवासींच्या जमिनीच्या व्यवहारात त्यांना संरक्षण मिळावे यासाठी १९७४ च्या महाराष्ट्र जमीन महसूल (अनुसूचित जमातीस जमिनीची पुन:स्थापना करणे) कायद्यास २०३४ सालापर्यंत मुदतवाढ.
- विदर्भाच्या शेतकऱ्यांसाठी भूमिधारी ते भूमिस्वामी मोहीम. १ लाखापेक्षा जास्त शेतकऱ्यांना लाभ.




## लोकसहभागाची किमया

लोकसहभागातून तलावातील साचलेला गाळ काढण्याची मोहीम लातूर जिल्हयात यशस्वीपणे राबवण्यात आली. शासनाच्या तिजोरीवर एक पैशाचाही भार न पडू देता लोकांनी ७२ कोटी रुपये खर्चून २०५ तलावातून ९०.२३ लक्ष घनमीटर गाळाचा उपसा केला.

२००९ मध्ये कमी पावसामुळे जिल्ह्यात उद्‌भवलेली दुष्काळसदृश परिस्थिती हे संकट न समजून त्याचे संधीत रूपांतर करताना लातूर जिल्हा प्रशासनाने गाळ काढण्याची मोहीम परिणामकारकरीत्या राबवून १९ हजार एकर माळरान क्षेत्रावर गाळ पसरवला. ते क्षेत्र उत्पादनक्षम केले. जिल्ह्यातील तलावांची साठवण क्षमता जवळ जवळ ९०.२३ दशलक्ष घनमीटरने वाढविली. मात्र यादरम्यान प्रशासनासमोर शेतरस्त्यांची गंभीर समस्या आली. लोकसहभागातून तलावातील गाळाचा उपसा करण्याचा उपक्रम यशस्वीपणे राबवलेल्या प्रशासनाने रस्ते मुक्तीचे आव्हान स्वीकारून रस्त्यांवरील अतिक्रमणे हटवण्याचा ठाम निश्चय केला.

शेतरस्त्यावरील अतिक्रमण हटवण्याच्या प्रचलित शासन पद्धतीत भौतिकदृष्ट्या अतिक्रमण काढणे शक्य होत नव्हते. तशी यंत्रणाही उपलब्ध नव्हती. पंचनामा कागदोपत्री स्वरूपात होऊन तहसीलदार, उपविभागिय अधिकारी आणि जिल्हाधिकारी स्तरावर तक्रार अर्ज निकाली निघाला म्हणून नस्तीबद्ध व्हायचा. प्रत्यक्षात अतिक्रमण व शेतकऱ्यांचा त्रास कायम असायचे.

जोपर्यंत जमिनीच्या कायम खुणा निश्चित होत नाहीत तोपर्यंत शेतरस्त्याचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली निघणार नाही हे जिल्हाधिकाऱ्यांच्या लक्षात आले. यासाठीचा खर्च शेतकऱ्यांनीच केल्यास प्रश्न सुटेल ही बाब त्यांनी शेतकऱ्यांच्या लक्षात आणून दिली. त्यानंतर लोक सहभागातूनच सर्वसंमतीने उपाययोजना करावयाची हे निश्चित करण्यात आले. यासाठी अतिक्रमण करणाऱ्यांना प्रारंभी समजवण्यात आले. वेळ पडल्यास कायद्याचा वापर करण्यात येईल, असे सूचित केले गेले. त्यानंतर प्रशासनाने शेतरस्त्यावरील अतिक्रमणे हटवण्यासाठी व्यापक स्वरूपात कालबध्द कार्यक्रमाचे नियोजन केले.

मोहिमेने लोकचळवळीचे स्वरूप धारण केल्यामुळे दर दिवशी २० ते २५ फूट रुंदीचे ६ ते ८ रस्ते तयार होऊ लागले. पाहता पाहता १९४८ कि.मी. लांबीचे ११३६ रस्ते अतिक्रमण मुक्त झाल्याने शेतकऱ्यांवरील ताण कमी झाला.

मोहिमेची फलश्रुती दृष्टिपथात आल्यानंतर वृत्तपत्रांनी या मोहीमेस रस्त्याची पूर्वीची परिस्थिती व अतिक्रमण मुक्त झाल्याची स्थिती याचे तुलनात्मक सचित्र वृत्त दिले. याचा सकारात्मक परिणाम झाला. नकाशावरील रस्ता असेल तर मोकळा सोडावाच लागेल याचे सामाजिक दडपण निर्माण झाले. गावातील वजनदार व्यक्तींविरोधातही तक्रार करण्याचे धारिष्ट्य सामान्य शेतकऱ्यांत रुजू लागले. त्यामुळे रस्ते अतिक्रमण मुक्त होण्यास मदत झाली.

# न्यायप्रक्रिया : जलद आणि पारदर्शक

न्यायालयाची पायरी चढताना प्रत्येकाला लवकरात लवकर न्याय मिळावा अशीच अपेक्षा असते. प्रत्येकाला जलद न्याय मिळावा या उद्देशाने शासनाने केंद्र पुरस्कृत योजनांची समाप्ती झाल्यानंतर विभागाच्या आर्थिक तरतूदी मधून १०० जलदगती न्यायालये चालू ठेवली आहेत.

महिलांवरील अत्याचारांची प्रकरणे निकालात काढण्यासाठी १३ विशेष न्यायालये स्थापन केली आहेत. महिलांवरील अत्याचारासंदर्भात प्रकरणे चालवण्यासाठी निश्चित केलेल्या २५ जलदगती न्यायालयांमध्ये या प्रकरणांव्यतिरिक्त अन्य प्रकरणे चालवू नयेत अशी उच्च न्यायालयाला विनंती केली आहे. महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे चालवण्यासाठी १४ विशेष न्यायालयांची स्थापना करण्याची प्रक्रिया सुरू आहे. राज्यात २४ कौटुंबिक न्यायालये चालू आहेत. लाचलूचपत प्रतिबंधक कायद्यांतर्गत केंद्रीय गुन्हे अन्वेषण (सीबीआय) यांनी दाखल केलेली प्रकरणे निकाली काढण्यासाठी ९ विशेष न्यायालये स्थापन केली आहेत. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत प्रत्येक महसूल विभागात एकूण ६ विशेष न्यायालये स्थापन करण्यास मान्यता दिली आहे.

राज्यामध्ये २०० सकाळी व २०० सायंकालीन न्यायालये सुरू आहेत. त्या शिवाय काही भागांमध्ये १० ग्राम न्यायालये देखील सुरू आहेत. न्यायालयीन प्रकरणांचा गतीने निपटारा करण्यासाठी मुंबई दिवाणी अभिकारिता कायद्यामध्ये सुधारणा केली. त्यामुळे जिल्हा न्यायालय व दिवाणी न्यायालयांची आर्थिक अपील अधिकर्त्यांमध्ये वाढ झाली. मुंबई शहर दिवाणी न्यायालय (सुधारणा) अधिनियम सुधारणा केल्यामुळे अनेक प्रलंबित प्रकरणे उच्च न्यायालयामधून मुंबई शहर दिवाणी न्यायालयात हस्तांतरित झाली. मुंबई नगर दिवाणी न्यायालयाची आर्थिक अभिकर्ता रु.५० हजार वरून रु.१ कोटी इतकी वाढवण्यात आली आहे.

**न्यायप्रक्रिया जलद आणि पारदर्शक करण्यावर शासनाने भर दिला आहे. प्रलंबित खटले निकालात काढण्यासाठी विशेष उपक्रम हाती घेतले आहेत. संगणकीकरणामुळे न्यायप्रक्रियेला गती मिळाली असून त्याचे चांगले परिणाम दिसून येत आहेत. महिलांवरील अत्याचारांची प्रकरणे निकालात काढण्यासाठी विशेष न्यायालये स्थापन केली आहेत. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत प्रत्येक महसूल विभागात एकूण ६ विशेष न्यायालये स्थापन करण्यास मान्यता दिली आहे. राज्यामध्ये २०० सकाळची व २०० सायंकालीन न्यायालये सुरू आहेत. त्या शिवाय काही भागामध्ये १० ग्राम न्यायालयेदेखील सुरू आहेत.**



जलद न्यायासाठी शासनाचे अनेक उपक्रम. विविध न्यायालयांतील प्रलंबित प्रकरणाची संख्या ४१ लाखावरून २९ लाख इतकी कमी.

**महालोकअदालत**

महालोकअदालत यांचे आयोजन करून आतापर्यंत अनेक प्रकरणे सामोपचाराने मिटवली आहेत. विधी साक्षरता शिबिरांचे उच्च न्यायालयाच्या अभिलेख्यांचे इलेट्रॉनिक स्वरूपात जतन करण्यासाठी त्यांचे सुक्ष्मचित्रीकरण (स्कॅनिंग) करून डिजीटलायजेशन करण्याचे काम सुरू आहे.

- महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे गतीने निकाली काढण्यासाठी १३ विशेष न्यायालये.
- उच्च न्यायालयांना २५ जलदगती न्यायालये सुरू करण्याची विनंती. ९ विशेष न्यायालये केवळ सीबीआय अंतर्गत येणारी भ्रष्टाचाराशी संबंधित प्रकरणे हाताळतात. ६ विशेष न्यायालये अनुसूचित जाती आणि जमाती अत्याचार प्रतिबंधक प्रकरणे हाताळतात.
- लोकअदालत आणि महा लोकअदालतद्वारे १७ लाखांपेक्षा जास्त प्रकरणे निकाली.
- न्यायालयासमोर बाजू मांडता यावी यासाठी लोकांना कायदेशीर मदत.
- उच्च न्यायालय तसेच दुय्यम न्यायालयांमधील संगणकीकरण पूर्ण करण्यासाठी साहाय्य.
- निबंधक कार्यालयांचे संगणकीकरण. धर्मादाय आयुक्त कार्यालयांचे संगणकीकरण सुरू.
- ठाणे जिल्ह्यातील उत्तन येथे जागतिक दर्जाची न्यायिक प्रशिक्षण अकादमी.



राज्यात २०० सकाळ आणि २०० सायंकालीन न्यायालये सुरू.

आयोजन केल्याने हजारो गरीब पक्षकारांना अनेक कायद्यांचे तसेच त्यांच्या मूलभूत हक्काविषयी माहिती व ज्ञान पुरवण्यात आले.

**दुय्यम न्यायालयांसाठी पायाभूत सुविधा**

दुय्यम न्यायालयांना पयाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी गेल्या ३ वर्षामध्ये अनेक उपाययोजना राबववण्यात आल्या. सर्व तालुक्यांमध्ये न्यायालये स्थापन झाली आहेत. अनेक ठिकाणी न्यायालयीन इमारती तसेच न्यायाधीशांकरिता निवासस्थाने बांधण्यात आली. २०० पेक्षा न्यायालयीन इमारतींचे व निवासस्थानांचे बांधकाम प्रगतिपथावर आहे. दुय्यम न्यायालय व उच्च न्यायालय यांच्या संगणीकरणाला प्राधान्य देण्यात आले आहे. उच्च न्यायालयामध्ये केंद्रीय ई फायलिंग पद्धतीचे (Centralized Filing System) काम प्रगतिपथावर आहे. अलीकडेच उच्च न्यायालय तसेच दुय्यम न्यायालयातील जुने संगणक बदलण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. उच्च न्यायालयामध्ये कागद विरहीत (Paper less Court) न्यायालय कार्यरत केले आहे. उच्च न्यायालयाकरिता पायाभूत सुविधा पुरवण्यासाठी जास्तीत जास्त निधी मंजूर करण्यात आला आहे.

**ई-कोर्ट**

ई-कोर्ट प्रकल्पांगर्तत दुय्यम न्यायालयातील न्यायाधीशांना नवीन लॅपटॉप देण्यात येणार आहे. दुय्यम न्यायालय तसेच त्यांच्या संलग्न कार्यालयामध्ये ई-कोर्ट प्रकल्पांतर्गत सुविधा पुरवण्यात येतील. सरकारी वकिलांच्या कामात सुधारणा करण्यासाठी ग्रंथालये अद्ययावत करण्यात येतील. सर्व जिल्हा सरकारी वकील कार्यालये व्हिडीयो कॉन्फरन्सिंगद्वारे जोडण्यात येतील. मुंबई उच्च न्यायालयातील ग्रंथालयाचे आधुनिकीकरण करण्यात येईल. दुय्यम आणि उच्च न्यायालयातील न्यायाधीशांना सर्व प्रकारच्या सोयीसुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत.

निबंधक भागिदारी संस्था, मुंबई तसेच त्या कार्यालयाच्या आधिपत्याखालील सर्व कार्यालयांचे संगणकीकरण केले आहे. भागिदारी संस्थांची ऑनलाइनद्वारे नोंदणी करण्याची सुविधा सुरू केली आहे.

**– विकास माळी**



## न्याय सगळ्यांसाठी

२०११ मध्ये महालोक न्यायालयाच्या शुभारंभाची मुहूर्तमेढ मुंबई उच्च न्यायलयाचे मुख्य न्यायमूर्ती श्री. मोहीत शाह यांच्यावतीने नागपूर जिल्हा न्यायालयाच्या आवारात रोवण्यात आली. ६ फेब्रुवारी २०११ ला प्रथम महालोकअदालत जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने जिल्हा न्यायालयाच्या आवारामध्ये आयोजित केले. त्यात २० हजारांच्यावर प्रकरणांचा एकाच दिवशी निपटारा करण्यात आला. तेव्हापासून ते १२ एप्रिल २०१४पर्यंत सहा महालोकअदालत व राष्ट्रीय लोकअदालत आयोजित करण्यात आले. ४ मार्च २०१२ला झालेल्या तिसऱ्या महालोकअदालतीमध्ये महाविक्रमी ८४,६२६ प्रकरणांचा एकाच दिवशी परस्पर सहमतीने निपटारा करण्यात यश मिळाले. महालोकन्यायालयच्या व राष्ट्रीय लोकन्यायालयात निपटारा झालेल्या प्रकरणांची आकडेवारी बरेच काही सांगून जाते. डिसेंबर २०१० रोजी नागपूर जिल्हयात एकूण ३,०७,०६५ प्रलंबित प्रकरणे होती. सहाव्या महालोकअदालतीनंतर एप्रिल २०१४ रोजी फक्त १,९१,२५० एवढी प्रकरणे प्रलंबित आहेत. प्रलंबित प्रकरणांची संख्या लोकन्यायालय व मध्यस्थीमुळे कमी करण्यात नागपूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाला यश मिळाले आहे. या यशासोबत समेटाची टक्केवारीसुद्धा वाढती ठेवण्यात यश मिळाले आहे.

मागील वर्षापासून दरवर्षी जानेवारीमध्ये फिरते लोकन्यायालय व विधी सेवा केंद्र, नागपूर जिल्हयामध्ये घेण्यात येत आहे. नागपूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अथक प्रयत्नातून नागपूर येथे स्थायी लोकअदालत स्थापन झाले आहे. नागपूर जिल्हयातील दुर्गम भागात फिरत्या विधी सेवा केंद्राच्या ५१ कायदेविषयक शिबिरामुळे १४,१५२ नागरिकांना फायदा झाला आहे.

**– किशोर जयस्वाल**

# सुरक्षेसाठी सज्ज...

राज्याच्या विकासासाठी सर्वसामान्यांना पायाभूत सोयीसुविधा, अन्न-वस्त्र-निवाऱ्याची शाश्वती हे घटक जसे महत्त्वाचे ठरतात, तसेच निर्भय वातावरणात जगण्यासाठी, निकोप औद्योगिक वाढीसाठी उत्तम कायदा-सुव्यवस्था आवश्यक असते. राज्याच्या विकासामध्ये कायदा-सुव्यवस्थेचा सिंहाचा वाटा असून त्यामुळेच महाराष्ट्र आज विविध क्षेत्रात यशस्वीपणे घौडदौड करीत आहे. महाराष्ट्र हे आज सर्वात सुरक्षित राज्य बनले असून कायदा-सुव्यवस्थेच्या जोडीलाच सामाजिक, आर्थिक सुरक्षेलाही योग्य ते महत्त्व दिले आहे.

**सक्षम गुप्तवार्ता विभाग**

दहशतवादी कारवाया किंवा इतर घटना-घडामोडींची आगाऊ माहिती मिळवण्यासाठी गुप्तवार्ता अधिकाऱ्यांच्या नेमणूका करून गुप्तवार्ता विभाग अधिक सक्षम करण्यात आला आहे. गुप्तवार्ता अधिकाऱ्यांचे स्वतंत्र केडर तयार केले आहे. अधिकाऱ्यांना प्रशिक्षणाकरिता देशस्तरावर पहिलीच गुप्तवार्ता प्रबोधिनी पुणे येथे स्थापन करण्यात आली आहे. प्रबोधिनीमध्ये इतर राज्यांनाही गुप्तवार्ताविषयक प्रशिक्षण दिले जाते.

**विकास आणि प्रगतीचा वेग सांभाळताना सरकारने राज्यातील कायदा-सुव्यवस्थेला सर्वोच्च प्राधान्य दिले. दहशतवाद, नक्षलवाद अशा विविध गुन्ह्यांच्या प्रतिबंधाबरोबरच कायदा-सुव्यवस्थेसाठी भरीव उपाययोजना केल्या. त्यातूनच राज्यात भयमुक्त वातावरण निर्माण करण्यात सरकारला यश आले. आधुनिकीकरण- सक्षमीकरणाबरोबरच लोकाभिमुख उपक्रमांद्वारे पोलीस दलाला सामाजिक चेहरा मिळवून देण्यातही सरकार यशस्वी ठरले.**

पुढील पाच वर्षात ६१,४९४ नवीन पोलिसांची भरती. यावर्षी १२ हजार पोलिसांची भरती प्रक्रिया सुरू.





सध्या पोलीस दलात २० हजारपेक्षा अधिक महिला पोलीस तैनात आहेत. देशात सर्वाधिक.

## देशात सर्वाधिक महिला पोलीस

पाच टप्प्यात ५५ हजारांपेक्षा अधिक पोलिसांची भरती करून नवा विक्रम प्रस्थापित करतानाच देशात सर्वाधिक महिला पोलिसांची भरती करण्याचा अभिनव विक्रमदेखील महाराष्ट्राच्या नावे नोंदवला गेला. गेल्या ५ वर्षात मोठ्या प्रमाणात महिला पोलिसांच्या भरतीमुळे पोलीस दलात २० हजारपेक्षा अधिक महिला पोलीस तैनात आहेत. कायदा व सुव्यवस्थेचा भार वाहणाऱ्या पोलिसांमध्ये महिलांचे प्रमाण देशभरात केवळ ५.३३ टक्के असताना महाराष्ट्रात महिला पोलिसांचे सर्वाधिक १४.८९ टक्के इतके प्रमाण आहे.

## पोलीस भरतीला प्राधान्य



पुढच्या पाच वर्षात ६१,४९४ नवीन पोलिसांची भरती करण्यास नुकतीच सरकारने मंजुरी दिली असून यावर्षी १२ हजारपेक्षा अधिक पोलिसांची भरती करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. पोलीस दलात नव्याने पदे निर्माण झाल्यानंतर महिला कक्ष आणि हरवलेल्या मुलांच्या शोध कक्षासाठी ४५८५ पदे तर नव्याने निर्माण होणाऱ्या १२२ पोलीस ठाण्यांसाठी ११०६१ पदे, ३८४ पोलीस नियंत्रण कक्षासाठी ३८२८ पदे उपलब्ध होणार आहेत. नवीन पदनिर्मितीमुळे देशात कुठेही नाही इतके मोठे संख्याबळ महाराष्ट्र पोलीसदलाला मिळणार आहे. त्याशिवाय यंदा राज्यात नवीन १२२ पोलीस ठाण्यांच्या निर्मितीमुळे कायदा-सुव्यवस्था अधिक सुरळीत ठेवण्यास मोठी मदत होणार आहे.

## महिलांची सुरक्षितता

- ४५ पोलीस मुख्यालयांमध्ये आणि सर्व पोलीस ठाण्यांमध्ये महिला सुरक्षा समित्या. संकटात असणाऱ्या महिलांना कायदेशीर साहाय्य.
- महिलांबाबतची प्रकरणे हाताळण्यासाठी पोलीस मुख्यालयांमध्ये सामाजिक सुरक्षा कक्ष.
- पोलीस ठाण्यांमध्ये ९० समुपदेशन केंद्रे. आपत्तीत असलेल्या महिलांना आणि खासकरून कौटुंबिक भांडणे सोडविण्यासाठी या केंद्रांचे साहाय्य.
- महिला आणि बालकांच्या अनैतिक व्यापाराला प्रतिबंध घालण्यासाठी एस.टी. स्थानकांवर ३३० मदत केंद्रे.
- महिला तक्रारींचे निवारण करण्यासाठी विनाशुल्क हेल्पलाइन (मुंबई, नवी मुंबई, ठाण्यासाठी १०३ आणि १०९० तर उर्वरित महाराष्ट्रासाठी १०९१ क्रमांक) सुरू.
- महिलांविरुद्धचे गुन्हे त्वरित निकालात काढण्यासाठी अहमदनगर, अकोला, अमरावती, औरंगाबाद, बुलढाणा, बीड, जळगाव, नागपूर, यवतमाळ, ठाणे, पुणे आणि कोल्हापूर येथे खास न्यायालये आहेत. अनैतिक व्यापाराच्या अनुषंगाने खटले चालविण्यासाठी मुंबई येथे खास न्यायालय.
- रेल्वेतील महिलांच्या सुरक्षेसाठी महिलांच्या डब्यात रात्रीच्या वेळी होमगार्ड तैनात.
- महिलांशी संबंधित संवेदनशील गुन्ह्यांच्या तपासासाठी स्वतंत्र महिला अत्याचार प्रतिबंधक कक्षाची मुंबईत निर्मिती – महत्त्वाचे गुन्हे या कक्षाकडे तपासासाठी वर्ग.



**फोर्सवन**

दहशतवादी कारवायांना प्रतिबंध करण्यासाठी यापूर्वीच फोर्सवन या विशेष कमांडो पथकाची आणि जलद प्रतिसाद पथकांची (क्यूआरटी) निर्मिती करण्यात आली आहे. या पथकातील कमांडोंना अत्याधुनिक प्रशिक्षण देण्यासाठी गोरेगाव येथे कायमस्वरूपी नागरी दहशतवादविरोधी प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण**

राज्यात आर्थिक गुन्हे शाखा सक्षम होत असून आर्थिक फसवणूक करणाऱ्यांच्या विरोधात कठोर कारवाई केली जात आहे. ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण करणारा कायदा सर्वप्रथम महाराष्ट्राने केला. यासाठी ३५ विविध प्रकरणांमध्ये प्राधिकृत अधिकारी नेमण्यात आले आहेत.

**सागरी सुरक्षेवर विशेष लक्ष**

सागरी गस्तीसाठी केंद्र-राज्य शासनाच्या मिळून ७२ बोटी, सीलेग्ज कार्यान्वित असून नौदल, तटरक्षक दल, कस्टम, मुंबई पोलिसांच्या सहकार्याने सागरकवच अभियान नियमित राबविले जात आहे. त्याशिवाय टोल फ्री हेल्पलाइन-१०९३ कार्यन्वित करण्यात आली आहे. ४४ सागरी पोलीस ठाण्यांची आणि ९२ पेक्षा अधिक चेकपोस्टची निर्मिती करण्यात आली असून ९० टक्के ठाणी कार्यान्वित झाली आहेत. या सागरी पोलीस ठाण्यांसाठी ११४१ विविध पदांना सरकारने मान्यता दिली आहे.

**नक्षल कारवाया रोखण्यासाठी उपाययोजना**

गडचिरोली आणि गोंदिया जिल्ह्यातील नक्षल कारवाया रोखण्यासाठी सरकारने विविध प्रतिबंधात्मक आणि विकासाच्या उपाययोजना केल्या आहेत. नक्षलवाद कमी करायचा तर या भागाचा आधी विकास झाला पाहिजे ही भूमिका घेऊन या भागात रस्ते, आरोग्य, शिक्षण, पर्यटन, कृषी विकास, सिंचनाच्या सोयी, पोलीस दलाचे सक्षमीकरण अशा विविध घटकांवर काम करण्यात येत आहे. सामाजिक सुरक्षा अभियानासारखे उपक्रम या भागात विशेष लोकप्रिय आणि उपयुक्त ठरले आहेत. नक्षलवाद्यांनी मूळ प्रवाहात यावे यासाठी २००५ साली सुरू केलेल्या नक्षल आत्मसमर्पण योजनेला चांगला प्रतिसाद मिळत असून या योजनेला ऑगस्ट २०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

नक्षल किंवा दहशतवाद विरोधी कारवाईत राज्यात शहीद झालेल्या केंद्रीय राखीव पोलीस दलातील तसेच निमलष्करी दलातील जवानांना महाराष्ट्र पोलीस दलातील शहिदांना मिळणाऱ्या लाभाप्रमाणेच २५ लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान देण्यात येत आहे. यापूर्वी या शहीद जवानांच्या परिवाराला १५ लाख रुपये केंद्र शासनाकडून दिले जात. आता १० लाख रुपये राज्य सरकारमार्फत दिले जातील. नक्षलग्रस्त भागात कार्यरत पोलिसांच्या
सी-६० पथकातील जवानांना दरमहा मिळणाऱ्या कमांडो भत्त्यामध्ये चार हजार रुपयांची वाढ करण्यात आली आहे. नक्षल भागातील पोलीसांचे मनोबल उंचावण्यासाठी जोखीम पत्करून अत्युत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस शिपाई ते सहायक पोलीस निरीक्षक यांना लगतच्या वरिष्ठ पदावर पदोन्नती देण्यात येत आहे.

नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्तीच्या काळात पोलिसांना कायदा-सुव्यवस्थेसाठी नेहमीच साहाय्य करणाऱ्या गृहरक्षक दल आणि नागरी संरक्षण दलातील स्वयंसेवकांच्या भत्त्यात दुपटीने वाढ केली आहे.

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे सक्षमीकरण**

शासकीय कार्यालयांमधील भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अधिक सक्षम करण्यात आले आहे. एप्रिल २०१४ अखेर विविध विभागांतील ३५० प्रकरणात ४५७ लाचखोरांना जेरबंद करण्यात आले

**लोकाभिमुख निर्णय**

- गेल्या ५ वर्षात महात्मा गांधी तंटामुक्त गाव योजनेमध्ये १,३४,५६६ ग्रामपंचायतींचा सहभाग. १६,००४ ग्राम पंचायतींना रोख पारितोषिके, १,२२३ ग्राम पंचायतींना खास पारितोषिके. गेल्या ५ वर्षात अंदाजे ११,००,००० तक्रारी मिटवण्यात यश.
- मुंबई आणि पुणे महानगरात सीसीटीव्ही यंत्रणा कार्यन्वित करण्याची प्रक्रिया सुरू.
- ज्येष्ठ नागरिकांच्या अडचणी जाणून त्यांना सहकार्य करण्यासाठी राबविलेल्या ज्येष्ठ नागरिक भेट योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**– किशोर गांगुर्डे**
गृहमंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी

## प्रेरणादायी यश



## आत्मसमर्पणाचे यश

गडचिरोली जिल्ह्यात ४२० नक्षलवाद्यांसह गोंदिया, चंद्रपूर व यवतमाळ या नक्षलग्रस्त जिल्ह्यामध्ये आत्तापर्यंत ४३६ नक्षलवाद्यांनी पोलिसांपुढे आत्मसमर्पण केले आहे.

गृह विभागाने २९ ऑगस्ट २००५ पासून नक्षलवाद्यांसाठी आत्मसमर्पण योजना सुरू केली. या योजनेंतर्गत अल्पशिक्षित १५ आत्मसमर्पित नक्षलवाद्यांना शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि खाजगी वाहन प्रशिक्षण संस्थेमधून वाहनचालकाचे प्रशिक्षण देऊन वाहन चालवण्याचे परवाने देण्यात आले आहेत. सहा आत्मसमर्पित महिला नक्षलवाद्यांना शिवणकामाचे प्रशिक्षण देण्यात आले. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून एका आत्मसर्पित नक्षलवाद्याला इलेक्ट्रिक फिटिंगचे आणि ५ जणांना खाजगी यंत्रणेच्या माध्यमातून नळ फिटींग (प्लम्बिंग) चे प्रशिक्षण देण्यात आले. त्यामळे त्यांना स्वयंरोजगार प्राप्त झाला आहे. आत्मसमर्पित अनेक नक्षलवाद्यांनी गवंडी कामे शिकून मिस्त्री, तसेच त्यांचे साहाय्यक म्हणून काम मिळवले आहे. काहीजण बटई पद्धतीने शेतीची कामे करीत आहेत. विविध प्रशिक्षणाच्या आधारावर २० जणांना वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये रोजगार मिळाला. काहीजण पोलीस विभागात विशेष पोलीस अधिकारी म्हणून, तर काही रोजंदारीची कामे करीत आहेत. याशिवाय सायकल दुरुस्ती केंद्र, पान टपरी, चहा टपरी व भाजी विक्री केंद्र सुरू करून आत्मसमर्पित नक्षलवाद्यांनी रोजगार मिळविला आहे.

आत्मसमर्पण करणाऱ्या नक्षलवाद्यांना ३ कोटी १५ लाख रूपयांची आर्थिक मदत करण्यात आली.

**- विवेक खडसे**

# महामानवांच्या चिरंतन स्मृती





- छत्रपती शिवाजी महाराजांचे जागतिक दर्जाचे एक राष्ट्रीय स्मारक अरबी समुद्रात राजभवनजवळ उभारण्याचा निर्णय. स्मारकाची संकल्पचित्रे जगभरातील विख्यात वास्तुविशारदांकडून आमंत्रित. २०१४-१५ आर्थिक वर्षात प्रस्तावित स्मारकासाठी १०० कोटी रुपयांची तरतूद.
- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक इंदू मिलच्या जागेवर उभारण्याचा निर्णय. यासाठी प्रकल्पाचे नियोजन व अंमलबजावणी करण्याकरिता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची नेमणूक. सल्लागार नियुक्त करण्याची कार्यवाही सुरू
- कोल्हापूर येथील शाहू मिलच्या आवारात राजर्षी शाहू महाराज यांचे भव्य स्मारक. कोल्हापूर महानगरपालिकेकडून स्मारकासाठी स्पर्धात्मक संकल्पचित्रे आमंत्रित. त्यातून सर्वोत्तम संकल्पचित्राची निवड. स्मारकासाठी आवश्यक निधीही उपलब्ध करून देण्यात येत आहे. २०१४-१५ च्या अर्थसंकल्पात ३.५ कोटी रुपयांची तरतूद.



# महासंवाद


**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय विविध माध्यमांद्वारे राज्यातील नागरिकांशी थेट संवाद साधत असते. या माध्यमांमध्ये आकाशवाणी, दूरदर्शन आणि मुद्रित माध्यमांसोबत वेब मीडियाचाही समावेश आहे. आकाशवाणीवरून 'दिलखुलास' आणि दूरदर्शनवरून 'जय महाराष्ट्र' हे कार्यक्रम सादर केले जातात. या दोन्ही कार्यक्रमांना विक्रमी यश मिळाले आहे. मुद्रित माध्यमांमध्ये लोकराज्य (मराठी), लोकराज्य (ऊर्दू), महाराष्ट्र अहेड (इंग्रजी) ही तीन नियतकालिके महाराष्ट्राच्या कान्याकोपऱ्यात पोहचत आहेत. महान्यूज हे वेब पोर्टल अतिशय लोकप्रिय झाले आहे. .**




दिलखुलास संवाद कार्यक्रमाचे २००० भाग पूर्ण होताना आज मला आठवतेय १६ नोव्हेंबर २००६ ही तारीख. आठ वर्षापूर्वीचा तो दिवस, त्या दिवशी राज्यातील सर्व आकाशवाणी केंद्रांवरून पहिल्यांदा दिलखुलास संवाद घराघरात पोहोचला. त्यापूर्वी सुमारे दोन महिने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील माझ्या वरिष्ठांनी व सहकार्यांनी घेतलेले अथक परिश्रम आठवताहेत. राज्यातील जनता आणि शासन यांच्यात सातत्यपूर्ण आणि प्रभावी संवाद माध्यम निर्माण करण्याची तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांची सूचना लक्षात घेऊन तत्कालीन महासंचालक मनीषा पाटणकर-म्हैसकर यांनी संचालनालयातल्या अधिकाऱ्यांना ब्रेन स्टॉर्मिंगसाठी बोलावलं होतं. आठ वर्षांपूर्वी आत्तासारखा सोशल मीडियाचा बोलबाला नव्हता. जनतेला माहिती देण्याची संचालनालयाची परंपरागत पद्धत होती. जोडीला दूरदर्शन, आकाशवाणी ही शासकीय दृकश्राव्य माध्यमे, सुमारे ७-८ शे वर्तमानपत्रे, ५-६ मराठी वृत्तवाहिन्या, ५-६ रेडिओ एफ-एम वाहिन्या हे पर्याय होते.




राज्यातील जनतेपर्यंत शासकीय योजना, विकासकामे इ. पोहचवण्याचे खात्रीशीर, प्रभावी माध्यम म्हणून आकशवाणीचं नाव पुढं आलं. त्यामुळे संचालनालयाचे नवीन संवाद माध्यम आकाशवाणीवरील कार्यक्रमाच्या रूपाने उभारावे, हा विचार नक्की झाला. तत्कालीन मुख्यमंत्री, सचिव यांच्यापुढे तो विचार मांडल्यावर त्यांनीही त्याला मान्यता दिली. कार्यक्रमाचे नाव ठरले 'दिलखुलास संवाद' या नावापासूनच कार्यक्रमाचे लोकांशी हृदयाचे नाते जोडले गेले. या हृदयीचे त्या हृदयी दिलखुलासपणे सांगणे, अर्थात शासन आणि जनता यांच्यात दिलखुलास संवाद घडवून आणणे, हा कार्यक्रमाचा उद्देश सहजपणे कळून आला.



सुरुवातीला आठवड्यातून दोन दिवस प्रसारित होणारा कार्यक्रम दोन महिन्यात आठवड्यातून तीन दिवस, मग चार दिवस आणि वर्षभरानंतर सोमवार ते शुक्रवार असा सहा दिवस सुरू झाला. कार्यक्रमाच्या पसंतीबाबत श्रोत्यांच्या पत्रांचा पाऊस पडू लागला. त्यामुळे महिन्याच्या

शेवटच्या शनिवारी दिलखुलास पत्रसंवाद या कार्यक्रमातून ह्या पत्रांची दखल घेतली जाऊ लागली.

राज्य मंत्रिमंडळातले जवळपास सर्व मंत्री, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, यांच्यासोबतच सामाजिक कार्यकर्ते, पुरस्कारप्राप्त मान्यवर कलाकार, खेळाडू, इ. व्यक्तीही या कार्यक्रमातून राज्यातील जनतेशी दिलखुलास संवाद साधत होत्या.

शासनाच्या या प्रभावी आणि सातत्यापूर्ण संवाद माध्यमाची इतर माध्यमांनीही दखल घेतली. वृत्तपत्रविद्या शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनाही या कार्यक्रमाच्या लोकप्रियतेनं भुरळ घातली. दोन विद्यार्थ्यांनी दिलखुलास संवाद या विषयावर पी.एच.डी. केली, तर इतर अनेकांनी लघुप्रबंध सादर केले. दिलखुलास संवाद  हा कार्यक्रम आकाशवाणीच्या टॉप टेन कार्यक्रमांमध्ये कायम होताच. अलीकडेच आकाशवाणीच्या जाहिरात प्रसारण सेवा, मुंबई केंद्राला मिळालेल्या आर. के. तालीब पुरस्कारातही दिलखुलासचा मोठा वाटा असल्याचे आकाशवाणी , मुंबई  केंद्राने गौरवपूर्वक नमूद केले आहे.

संवादाचा हा सेतू आणखी रुंदावत दिलखुलास आपल्या गावी हा नवीन धागा त्याला जोडला गेला. दिलखुलासच्या श्रोत्यांच्या थेट गावी  दिलखुलासचा चमू पोहचला.

संवादाचं रोपटं आता महावृक्ष झाला असून आपला २००० वा भाग साजरा करीत आहे. हा एक नवा विक्रमच ! श्रोत्यांच्या अभूतपूर्व प्रतिसादामुळेच हा संवादसेतू गेली ८ वर्षे सातत्याने आणि प्रभावीपणे दृढ झाला आहे.

दिलखुलास कार्यक्रमाने विकास पत्रकारितेतील एक शिखर गाठलं असलं तरी या टप्प्यावर पुढच्या वाटचालीची दिशा आखणं हेही तितकंच महत्त्वाचं आहे. त्यामुळे आता या कार्यक्रमात काही महत्त्वपूर्ण बदल करून हा संवाद अधिकाधिक प्रभावी, परिणामकारक व प्रभावी होण्यासाठी यापुढेही आमचा भर राहील. यासाठी श्रोत्यांकडून तसेच इतरांकडून करण्यात येणाऱ्या चांगल्या सूचनांचं स्वागतच आहे.

महासंवादाची ही महामालिका यापुढेही अधिक उत्साहाने महाराष्ट्राच्या सेवेत संवाद सेतू उभारीत राहील.

**– मीनल जोगळेकर**

---

# सह्याद्री वाहिनीवर– लोकप्रियतेच्या शिखरावर

जय महाराष्ट्र

१६ ऑगस्ट २००७ रोजीचा हा प्रसंग ‘मुख्यमंत्री महोदय, आपण मुंबईचं शांघाय करणार, म्हणजे नक्की काय आणि कसं करणार?’ खारघर, नवी मुंबईच्या प्रकाश राणे या नागरिकाचा राज्याच्या तत्कालीन मुख्यमंत्र्यांना दूरचित्रवाणी वाहिनीवरील कार्यक्रमात थेट प्रश्न. ‘मुंबईचा शांघाय करणं, म्हणजे मुंबईला आंतरराष्ट्रीय दर्जाचं शहर बनवणं. मात्र हे करताना शहराचा मानवी चेहरा जपला जाईल. जलद, उत्कृष्ट प्रवासी वाहतूक सुविधा, सर्वांना परवडेल असा निवारा इ. सर्व सुविधांसह येत्या ३–४ वर्षात मुंबईचा चेहरा–मोहरा बदलून हे शहर आंतरराष्ट्रीय दर्जाचं बनवण्याचा आमचा संकल्प आहे.’

तत्कालीन मुख्यमंत्र्यांचं तेवढंच स्पष्ट आणि आश्वासक उत्तर. आज मोनो रेल, मेट्रो, पूर्व द्रुतगती मार्ग, सहार उन्नत मार्ग, सांताक्रुझ–चेंबूर लिंक रोड, अद्ययावत टी२ टर्मिनस इ. जलद–अत्याधुनिक पायाभूत सोयी–सुविधांसह सुसज्ज मुंबईचं आमूलाग्र पालटलेलं आंतरराष्ट्रीय दर्जाचं रूप बघितल्यावर त्या प्रश्न विचारणाऱ्या नागरिकाची आणि त्याला विकासाचं आश्वासक चित्र दाखवणाऱ्या तत्कालीन मुख्यमंत्र्यांची आवर्जून आठवण येते.

‘तो’ कार्यक्रम म्हणजे माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरून दर मंगळवारी आणि शुक्रवारी प्रसारित होणारा ‘जय महाराष्ट्र’ हा कार्यक्रम. वर उल्लेख केलेला सवाल–जबाब, कार्यक्रमाच्या शुभारंभाच्या भागातला, म्हणजेच तत्कालीन मुख्यमंत्री स्व. विलासराव देशमुख यांच्या मुलाखतीतला. ७ वर्षांपूर्वी या



कार्यक्रमाची सुरुवात राज्याच्या तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी जनतेशी थेट संवाद साधून केली. पण हा संवाद नुसताच एकतर्फी नव्हता, तर नागरिकांनाही दूरध्वनीवरून कार्यक्रमात सहभागी मंत्री, सचिव, वरिष्ठ अधिकारी मंडळींना थेट प्रश्न विचारण्याची संधी देण्यात आली होती.

आठवड्यातून दोन दिवस, शासन-प्रशासनातल्या वरिष्ठांशी थेट संवाद साधण्याची संधी देणारा, हा कोणत्याही राज्यातलाच काय पण देशपातळीवरचाही बहुदा पहिलाच कार्यक्रम होता. राज्यातल्या जागरूक नागरिकांनीही कार्यक्रमाला अभूतपूर्व प्रतिसाद दिला. दिवसेंदिवस कार्यक्रमाची लोकप्रियता वाढतच गेली आणि गेली ७ वर्षे अखंडपणे सुरू असलेल्या या कार्यक्रमाचे लवकरच ७०० भाग पूर्ण होणार आहेत. मात्र ही वाटचाल दिसते तेवढी सोपी नव्हती, तर कल्पकता, जिद्द, चिकाटी, टीम स्पिरिट आणि क्वचित प्रसंगी निराशा अशा चढ-उतारांनी भरलेली होती. ७ शतकांच्या या वाटचालीच्या प्रवासाची आठवणही तितकीच आनंददायी ठरेल.

तत्कालीन महासंचालक मनीषा पाटणकर-म्हैसकर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या आकाशवाणीवरून प्रसारित होणाऱ्या 'दिलखुलास संवाद' कार्यक्रमानं तोवर चांगली लोकप्रियता मिळवून जनमनात आपलं खास स्थान निर्माण केलं होतं. आता दृक-श्राव्य स्वरुपात नवीन संवाद माध्यम निर्माण करण्यासाठी आकाशवाणी प्रमाणेच राज्याच्या गावखेड्यापर्यंत पोहोचलेल्या दूरदर्शनची यावेळी मॅडमनी निवड केली होती. शासन आणि जनता यांच्यात प्रभावी सातत्यपूर्ण आणि परिणामकारकपणे संवाद होण्यासाठी दूरदर्शनवरून कार्यक्रम सुरू करण्याची कल्पना त्यांनी मांडली. कार्यक्रमाचं नाव, स्वरूप, सहभागी वक्ते, मुलाखतकार,

# महान्यूज : अचूक माहिती, थेट संपर्क

देशातील पहिले शासकीय ई पोर्टल असा लौकिक मिळविलेल्या महान्यूज या वेब पोर्टलची यशस्वी वाटचाल गेल्या सहा वर्षापासून अखंडपणे सुरू आहे. रोज वेगवेगळ्या घडामोडी, माहिती अपडेट करणाऱ्या या ई पोर्टलला हजारो वाचक नियमित भेट देतात.

२००६ साली महासंचालक म्हणून मनीषा पाटणकर म्हैसकर यांनी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाची सुत्रे सांभाळली आणि या विभागाला एक वेगळी झळाली मिळाली. शासन विविध स्तरावर खूप काम करते. पण ते काम लोकांपर्यंत पोचविण्यासाठी पूर्वी महासंचालनालयाला इतर माध्यमांवर अवलंबून रहावे लागत होते. मात्र तत्कालीन महासंचालक मनीषा पाटणकर म्हैसकर यांनी आपलं स्वत:च माध्यमे असावीत, अशी कल्पना मांडली आणि त्यातूनच महान्यूज (http://mahanews.gov.in) अस्तित्वात आले. या माध्यमाद्वारे शासनाचं प्रसिद्ध खातं 'लोकल टू ग्लोबल' झालं.

महान्यूज या वेब पोर्टलने माध्यमातून जगभरातील मराठी बांधवांना महाराष्ट्र शासनाशी जोडण्याचे काम सुरू केले. आज जगभरातील लाखो वाचकांच्या संगणकावरील बुकमार्कमध्ये महान्यूज हमखास दिसते. आजवर दीड कोटीहून अधिक हिट्स महान्यूजला मिळाल्या आहेत रोज हजारो हिट्सची यात भर पडत आहे, ही साइट 'युजर फ्रेंडली' असावी असा तत्कालीन महासंचालक तथा सध्याच्या विभागाच्या सचिव मनीषा म्हैसकर यांचा आग्रह होता. वेबसाइट सुरू करण्याच्या पहिल्या दिवसापासून त्यासाठी त्यांनी महान्यूज टीमला प्रोत्साहित केले. ऑनलाईन मीडियावरील मजकूर शॉर्ट, स्वीट आणि क्रिस्पी असावा, जास्तीत जास्त आशय थोडक्या शब्दात वेबपोर्टलवर यावा यासाठी त्यांनी प्राधान्य दिलं. त्यामुळे महान्यूज सुरू झाल्यानंतर अल्पावधीत लोकप्रिय झालं. महान्यूजने बजावलेल्या कामगिरीमुळे त्यास राज्यस्तरावरील दोन बक्षिस मिळाली आहेत. राज्य मराठी विकास संस्थेने घेतलेल्या संकेतस्थळ स्पर्धेत महान्यूजला शासकीय संकेतस्थळ प्रवर्गातील प्रथम पारितोषिक आणि या वर्षी १ मे रोजी २०१४ रोजी राज्य शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाचा गोल्ड पुरस्कार मिळाला. याच कार्यक्रमात मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनीही आपल्या भाषणात महान्यूजचं महत्त्व अधोरेखित केलं होतं.

महान्यूज पोर्टलवरती 'नोकरी शोधा' नावाचं एक सदर आहे. त्यात राज्य व केंद्र शासनाच्या विविध रोजगाराच्या संधींची माहिती आहे. आजच्या घडीलाही हजाराहून अधिक नोकरीच्या जागांविषयी पोर्टलवर माहिती आहे. 'नीट अँड क्लिन साइट' असंच महान्यूजचं वर्णन करावं लागेल. 'सरकारी' हा शब्द उच्चारला की त्या शब्दालाच एक वेगळा रंग असतो. प्रतिमा असते. पण महान्यूजचं पोर्टल बऱ्याच प्रमाणात त्याला अपवाद आहे. महान्यूजच्या साइटवर दररोज नवनवी माहिती अपडेट होताना दिसते आहे आणि बरीचशी माहिती वेगळीही आहे.

महान्यूजवर आज किमान दहा लेख आम्ही अपडेट करतो. यशकथा, प्रेरणा, योजना, नेट भेट, फर्स्ट पर्सन या वेगवेगळ्या सदरांमधून नेहमी सहज न मिळणारी माहिती नेमकी मिळते.


**– नंदकुमार वाघमारे**




मांडणी इ. वर सखोल चर्चा होऊन महासंचालनालयाचं नवीन हक्काचं व्यासपीठ साकारलं, 'जय महाराष्ट्र!' कोणत्याही महाराष्ट्रीयाच्या मनात 'जय महाराष्ट्र' असाच उदघोष उमटावा, अशीच महाराष्ट्राची महती. त्यामुळेच 'जय महाराष्ट्र' या नावावर शिक्कामोर्तब तर झालं, पण कार्यक्रम 'लाइव्ह' अर्थात थेट मुलाखतीचा 'फोन-इन' स्वरूपाचा असावा असंही मॅडमनी सुचवलं. खरं तर हेच या कार्यक्रमापुढचं सर्वात मोठं आव्हान, आणि हेच सर्वात वेगळं वैशिष्ट्यही ठरलं. मुलाखातीत सहभागी व्यक्तींच्या कार्याचा आढावा घेणारी एक छोटी ध्वनिचित्रफीत तसेच त्याच्या खात्याच्या कामकाजाचा आढावा घेणारी आणखी एक चित्रफीत व त्या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तीची प्रतिक्रिया यांचाही समावेश करावा म्हणजे त्या मुलाखती अधिक माहितीपूर्ण आणि वेगळ्या होतील. ही सूचनाही मॅडमनी केली होती. कार्यक्रमात राज्याचे मंत्रिगण, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, उललेखनीय कार्य करणारे अधिकारी यांना त्यांच्या-त्यांच्या खात्याबद्दल मुलाखतकाराच्या बरोबरीनं राज्यातील जनताही दूरध्वनीवरून थेट प्रश्न विचारू शकेल असं कार्यक्रमाचं स्वरूप होतं. कार्यक्रमाच्या माध्यामातून लाखो लोकांपुढे काही वैयक्तिक लाभाचे विषयाला सोडून प्रश्न जाणार नाहीत ना अशी भीती होती. परंतु सहभागी वक्त्यांची अभ्यापूर्ण तयारी आणि प्रेक्षकांचा सुजाणपणा या दोन्हींमुळे कार्यक्रमाच्या या प्रदीर्घ वाटचालीत असा अनावस्था प्रसंग कधीच ओढावला नाही.

राज्याची विविध खाती, नवीन योजना, प्रकल्प याबाबत राज्यातल्या जनतेपर्यंत अगदी नियोजनबद्ध पध्दतीने माहिती कार्यक्रमातून देता येत होती, शिवाय लोकांच्या मनातले प्रश्न, शंका यांनाही उत्तर मिळत होती. त्यामुळे या कार्यक्रमानेही अल्पावधीतच अमाप लोकप्रियता मिळवत दूरदर्शनच्या 'टॉप टेन' कार्यक्रमांमध्ये मानाचं स्थान मिळवलं. कार्यक्रमाची दखल सर्व प्रसारमाध्यमांनी प्रामुख्यानं घेतली. दूरचित्रवाणी माध्यमाचा उपयोग ज्ञान, माहिती, प्रबोधन यासाठी अत्यंत प्रभावीपणे करता येतो, हेच 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमानं दाखवून दिलं आहे.


# ग्लोबल कनेक्ट




शासनाचे मुखपत्र असलेल्या लोकराज्यमुळे मराठी भाषिक जनतेपर्यंत शासनाच्या योजना, कार्यक्रम पोहचवणे शक्य झाले. असे असले तरी राज्यातील अमराठी जनता, कार्पोरेट क्षेत्र, उद्योग, व्यवसाय किंवा पर्यटनाच्या दृष्टीने महाराष्ट्रात आलेले परदेशी पाहुणे यांच्यापर्यंत महाराष्ट्राची कामगिरी पोहचवण्यासाठी वेगळ्या माध्यमाची गरज होती. ही गरज महाराष्ट्र अहेड या इंग्रजी नियतकालिकाने भागवली.

मार्च २००९ मध्ये तत्कालीन महासंचालक आणि सचिव मनिषा म्हैसकर यांच्या मार्गदर्शनाखाली माहिती जनसंपर्क महासंचालनालयाने महाराष्ट्र अहेड हे इंग्रजी मासिक प्रकाशित करण्यास सुरुवात केली. या मासिकालाही वाचकांनी लोकराज्यप्रमाणेच आपलेसे केले. महाराष्ट्राची समृद्ध संस्कृती, पर्यटन स्थळे, पारंपरिक सण-उत्सव यांची ओळख झाली आहे. याशिवाय महाराष्ट्राने उद्योग क्षेत्रात घेतलेली भरारी, विविध उद्योगांना आवश्यक पायाभूत सुविधा, औद्योगिक धोरण यांची सांगोपांग माहिती महाराष्ट्र अहेडने वेळोवेळी औद्योगिक जगताला पुरवली आहे. अलीकडच्या काळातील महाराष्ट्र अहेडच्या महसूल, दुष्काळ, कोकण, उच्च शिक्षण, लोकसभा निवडणूक यासारख्या विषयांना वाहिलेल्या अंकांनी संबंधित विषयाची खडान्खडा माहिती वाचकांपर्यंत पोहचवली. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील महाराष्ट्राचे कार्य वाचकांपर्यंत पोहचवण्याचे काम महाराष्ट्र अहेडने केले आहे.





लोकराज्य ऊर्दू

# ऊर्दू भाषकांसाठी

महाराष्ट्र शासनातर्फे ऑक्टोबर, २००७ पासून ऊर्दू लोकराज्य प्रकाशित करण्यात येत आहे. तद्पूर्वी सन १९७४ पासून कौमी राज हे मासिक प्रकाशित करण्यात येत होते. गेल्या अनेक वर्षापासून ऊर्दू भाषक अल्पसंख्याकांसाठी शासन ज्या योजना राबवीत आहे ते त्यांना तत्काळ माहीत होत नसल्यामुळे हा घटक वंचित राहत होता. देशामध्ये जितक्या ऊर्दू भाषक शाळा व महाविद्यालये आहेत त्यापेक्षा जास्त महाराष्ट्रात आहेत. मराठी भाषेनंतर महाराष्ट्रात सर्वाधिक बोलणारी व वाचणारी भाषा ऊर्दू आहे. या मासिकाद्वारे शासन ऊर्दू भाषक लोकांशी सुसंवाद साधत आहे. ऊर्दू लोकराज्य संबंधित अल्पसंख्याक घटकाला मुख्य प्रवाहात सामील करून घेण्याचे एक प्रभावी साधन आहे. या अंकात अल्पसंख्याक विभागामार्फत घेतले जाणारे निर्णय, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना ऊर्दू ॲकडमी तसेच हज कमिटीच्या कार्यासंदर्भातील माहिती ऊर्दू भाषकांपर्यंत पोहचवण्याचे कार्य ऊर्दू लोकराज्य करीत आहे .

श्रद्धांजली

# संघर्षयात्री



**सामान्य जनतेशी आणि कष्टकरी वर्गाशी नाळ जुळलेले लोकनेते  गोपीनाथ मुंडे यांचे अपघाती निधन झाले. लोकहितासाठी आयुष्य वाहून घेतलेल्या या झुंझार नेत्याच्या जाण्याने महाराष्ट्राचेच नव्हे तर देशाचे नुकसान झाले आहे. सार्वजनिक जीवनात कार्यरत असताना विविध क्षेत्रात आपला स्वतंत्र ठसा उमटवणाऱ्या  या संघर्षयात्रीला भावपूर्ण श्रद्धांजली.**

महाराष्ट्राची मुलुखमैदानी तोफ, सामान्य जनतेचा आवाज, लढवय्या नेता, केंद्रीय ग्रामविकास मंत्री आणि महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री खा.गोपीनाथ मुंडे यांचे अपघाती निधन अवघ्या महाराष्ट्रासाठी क्लेशदायक आहे. आयुष्यभर विविध संघर्षांचा सामना करीत, संकटांवर मात करीत लोकसेवेची नवनवी शिखरे गाठणाऱ्या या नेत्यावर अखेर काळाने घाला घातला आणि या लोकनायकाला आपल्यातून हिरावून नेले. काळ खूप निष्ठुर असतो म्हणतात. त्याची पुन्हा प्रचिती आली. महाराष्ट्राला विकासाच्या नव्या उंचीवर नेण्याचे स्वप्न पाहत असताना स्वत: अग्रेसर राहणाऱ्या नेत्याच्या धडाडीला पूर्णविराम मिळाला.

मराठवाड्याच्या बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील नाथ्रा या खेडेगावी गोपीनाथजींचा जन्म एका गरीब कुटुंबात झाला. वारकरी परंपरा लाभलेलं हे कुटुंब. अखंड वारी करणाऱ्या आई–वडिलांच्या प्रभावातून गोपिनाथजींनी  वयाच्या १४ व्या वर्षापासून सलग सात वर्षे पायी चालत पंढरपूरची वारी केली. संत भगवानबाबा हे त्यांचं आराध्य दैवत. गोपिनाथजींना बालपणापासूनच सामाजिक कार्याची आवड होती. विद्यार्थीदशेत असतानाच त्यांच्यातील नेतृत्वगुण आकारास येत होते.

पुढे प्रमोद महाजन व गोपीनाथ मुंडे यांच्या एकत्रित प्रवासाने महाराष्ट्र व देशाच्या राजकारणात एक नवा प्रवाह निर्माण केला. गोपिनाथजींची राजकीय कारकीर्द उत्तरोत्तर बहरत गेली. महाविद्यालयीन जीवनापासूनच त्यांचा पिंड आंदोलकाचाच राहिला. प्रारंभी मराठवाडा विकास आंदोलनात त्यांनी मोलाची भूमिका बजावली. आणीबाणीत सोळा महिने कारावास भोगला. मराठवाडा विद्यापीठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे म्हणून रस्त्यावर उतरून संघर्ष केला. १९८० साली रेणापूर मतदारसंघातून विधिमंडळात प्रवेश केल्यानंतर त्यांचे नेतृत्व अधिक धारदार झाले. दुष्काळी परिषद, ज्वारी परिषद, दूध आंदोलन अशा प्रश्नांवर त्यांनी अनेक मोर्चे काढले. मुंबईत २ लाख शेतकऱ्यांच्या मोर्चाचे नेतृत्व केले. शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीची चळवळ यशस्वी करून दाखविली. विधानसभेत विरोधी पक्षनेता म्हणून त्यांचे कार्य कायम स्मरणात राहणार आहे. 'शिवनेरी ते शिवतीर्थ' ही संघर्षयात्रा अपूर्व अशीच होती. महाराष्ट्रात युतीची सत्ता आल्यानंतर शासनकर्ते म्हणूनही त्यांनी आपली छाप सोडली. उपमुख्यमंत्री, गृहमंत्री व ऊर्जामंत्री म्हणून त्यांची कारकीर्द संस्मरणीय ठरली. मुंबईमधील अंडरवर्ल्डची दहशत संपविण्यात त्यांनी घेतलेल्या कणखर भूमिकेचा महत्त्वाचा वाटा आहे. पुढे राष्ट्रीय पातळीवर त्यांचे नेतृत्व बहरत गेले. लोकसभेत ते विक्रमी मतांनी निवडून गेले. देशाच्या संसदेतही त्यांचा बुलंद आवाज घुमत राहिला. लोकलेखा समितीचे अध्यक्ष, लोकसभेतील उपनेते अशी मानाची पदे त्यांनी मिळविली.

जिल्हा परिषद सदस्य, आमदार, विरोधी पक्षनेता, उपमुख्यमंत्री, खासदार आणि केंद्रीय मंत्री अशी ही यशाची चढती कमान त्यांच्या कठोर परिश्रमाची आणि जनसामान्यांच्या विश्वासाची निदर्शक होती.

संघर्ष करीत पुढे जात राहणे हा गोपिनाथजींच्या स्वभावाचा स्थायिभाव होता. ग्रामीण बाज असलेलं प्रभावी वक्तृत्व, कणखरपणा, तळागाळातल्या समस्यांची जाणीव, दांडगा जनसंपर्क आणि विशेष म्हणजे सामान्य माणसाविषयी असलेला कळवळा, त्यांच्या उत्थानाची आस यामुळे त्यांचे नेतृत्व सर्वमान्य झाले होते. उपजत असलेल्या दिलदारपणामुळे ते प्रत्येकालाच आपले वाटत असत. त्यामुळेच त्यांच्याभोवती सदैव कार्यकर्त्यांचा गराडा पडलेला असे. जनसामान्यांच्या या प्रेमापोटी प्रत्येक संकटावर मात करीत नवे स्वप्न पाहण्याची प्रेरणा त्यांना मिळत असे. नुकतेच लोकसभा निवडणुकीत अपूर्व यश मिळवून त्यांनी आपले निर्विवाद नेतृत्व सिद्ध केले होते. केंद्रीय ग्रामविकास मंत्रिपदावर विराजमान होत आधुनिक ग्रामीण भारताचे स्वप्न साकारण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले होते आणि इतक्यात काळाने त्यांच्यावर घाला घातला. सामान्यजनांच्या हितासाठी झुंजणारा जननायक आपल्यातून हिरावून नेला. मात्र जनमानसात कोरल्या गेलेल्या त्यांच्या स्मृती नव्या समाजनिर्मितीसाठी निरंतर प्रेरणा देत राहतील.

**– किरण केंद्रे**




सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे निर्मित

# शासन आणि जनता यांच्यात संवाद दृढ करणारे...

ऐकायलाच हवा
दिलखुलास
संवाद...
@२०००

सर्वत्र : सर्वोत्तम
लोकराज्य
४ लाख खप
४० लाख वाचक

जय महाराष्ट्र
लाखो दर्शकांची थेट-भेट घडवून देणारे...
नाबाद...६६७ भाग

MAHARASHTRA
Ahead

لوک راجیہ
ऊर्दु लोकराज्य

बातमी खात्रीची
माहिती प्रगतीची
वेध भविष्याचा
महान्यूज
@ १ कोटी ४५ लाख

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
https://dgipr.maharashtra.gov.in

## माध्यमं संवादाची : जनतेच्या विश्वासाची

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MH/MR/South - 210/2012-14
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, July 2014.
Date of Publication : 10th of every Month

## सर्वांत पुढे महाराष्ट्र माझा




महाराष्ट्राचे नं. १ मासिक

# लोकराज्य

लोकराज्य LOKRAJYA

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

प्रति / To :

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक प्रल्हाद दत्तात्रय जाधव, महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई - ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : प्रल्हाद दत्तात्रय जाधव